# कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार | दि. १४ नोव्हेंबर २०२६ | अंक १५८ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in







## अमूलचे दूध चार रुपयांनी महागले

**मुंबई :** देशभरात महागाईचा वाढता फटका सर्वसामान्यांना बसत असतानाच आता दुधाच्या दरातही वाढ झाली आहे. मदर डेअरीनंतर देशातील आघाडीची दूध उत्पादक कंपनी अमूलनेही दरवाढीचा निर्णय घेतला आहे. अमूल गोल्डच्या दरात प्रतिलीटर ४ रुपये, तर अमूल फ्रेशच्या दरात २ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे अमूल गोल्डचा दर ७० रुपयांवरून ७४ रुपये प्रतिलीटर झाला आहे. दुधाच्या दरवाढीमुळे दररोज दूध खरेदी करणाऱ्या कुटुंबांच्या मासिक खर्चात वाढ होणार आहे. चहा, कॉफी तसेच घरातील इतर गरजांसाठी दूध वापरणाऱ्या ग्राहकांना याचा फटका बसणार आहे.

# टोरंटची पुन्हा दंडेलशाही

## जनसुनावणी गुंडाळून मोजणीचा घाट

## पोहोच रस्त्यासाठी २२६ शेतकऱ्यांना नोटिसा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

सायडोंगर येथील जंगलतोडीवरून टोरंट पॉवरचा हायड्रोपंप्ड प्रकल्प वादात असतानाच आता पोहोच रस्त्यासाठी जमिनींच्या मोजणीचा घाट घालण्यात आला आहे. शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आणि जनसुनावणी रद्द झाल्यानंतरही प्रशासनाने २५ नोव्हेंबरला संयुक्त मोजणी निश्चित केली आहे. भालिवडी, पोटल, आंबोट, पाली आणि सायडोंगर या पाच गावांतील तब्बल २२६ शेतकऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे टोरंटविरोधातील संघर्ष पुन्हा पेटण्याची चिन्हे आहेत.



टोरंटच्या सायडोंगर प्रकल्पासाठी कर्जत-वैजनाथ प्रमुख जिल्हा मार्गावरून सुमारे सहा किलोमीटरचा पोहोच रस्ता प्रस्तावित आहे. या रस्त्यासाठी एप्रिल २०२६ मध्ये भूसंपादनाची अधिसूचना काढण्यात आली होती. ७ ऑक्टोबर रोजी कर्जत तहसील कार्यालयात झालेल्या जनसुनावणीत शेतकऱ्यांनी प्रश्नांची उत्तरे मिळत नसल्याचा आक्षेप घेत सुनावणी रद्द करण्याची मागणी केली होती. त्यानंतर जिल्हा भूसंपादन अधिकारी श्रीकांत गायकवाड यांनी सुनावणी गुंडाळली होती.

यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी मोजणी करू दिली नव्हती. आता भूमीअभिलेख विभागामार्फत पाच गावांतील १३ सर्व्हे क्रमांकांची संयुक्त मोजणी केली जाणार आहे. यासाठी भूमापक सचिन थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी प्रकल्पालाच विरोध केला असताना मोजणी पुढे रेटली जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. २५ नोव्हेंबरला प्रशासन आणि शेतकरी आमनेसामने येण्याची शक्यता आहे.

**मोजणीचे चलन किती? माहिती गुलदस्त्यात!**

संयुक्त मोजणी 'अतितातडीची' म्हणून केली जाणार आहे. मात्र, यासाठी सरकारी चलनापोटी किती रक्कम भरली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. १३ सर्व्हे क्रमांकांच्या मोजणीसाठी मोठे शुल्क आकारले गेले असण्याची शक्यता असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याबाबत माहिती दिली जात नाही.

"कर्जत येथे झालेल्या जनसुनावणीत स्थानिकांच्या प्रश्नांची उत्तरे मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी सुनावणी रद्द करण्याची मागणी केली. त्यानंतर जिल्हा भूसंपादन अधिकारी सुनावणीच्या ठिकाणाहून निघून गेले. मात्र, पुढील सुनावणी न घेता आता थेट मोजणी केली जात आहे. मग हे सरकार नेमके जनतेचे आहे की श्रीमंतांचे, असा प्रश्न आम्हाला पडला आहे.
– ॲड. कैलास मोरे"

## वे|घ|क

### पुन्हा एकदा चक्रीवादळाचा इशारा

**नवी दिल्ली :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याची तीव्रता वाढून १६ नोव्हेंबरपर्यंत चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर अनेक राज्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. १३ ते १९ नोव्हेंबरदरम्यान आंध्र प्रदेश, तामिळनाडू, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि अंदमान-निकोबार बेटांवर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. काही भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचे वारे वाहण्याचाही अंदाज आहे. तसेच जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि राजस्थानमध्येही पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना सावधानतेचा इधारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

### बस-ट्रक अपघात; २३ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** आसाममधील काझीरंगा येथे राष्ट्रीय महामार्गावर मिनीबस आणि ट्रेलर ट्रकची समोरासमोर भीषण धडक होऊन २३ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत अनेक प्रवासी जखमी झाले असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. गोलाघाट जिल्ह्यातील रोंगाजान परिसरात, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७१५ वर हाथीकुली टी इस्टेटजवळ हा अपघात झाला. जोरहाटहून गुवाहाटीच्या दिशेने जाणारी मिनीबस वेगात असताना ट्रेलर ट्रकला धडकली. बसमध्ये ३५ ते ४० प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

### सीएनजी, पीएनजीचे दर वाढले

**पुणे :** महागाईचा आणखी एक फटका सर्वसामान्यांना बसला आहे. पुणे, नाशिक आणि धुळे जिल्ह्यांत सीएनजी आणि घरगुती पीएनजीच्या दरात वाढ करण्यात आली आहे. १२ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून हे नवे दर लागू झाले आहेत. गॅस खरेदी आणि आयात खर्च वाढल्याने दरवाढ केल्याचे महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने (एमएनजीएल) स्पष्ट केले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सीएनजीचा दर किलोमागे १.२५ रुपयांनी वाढून ९९ रुपये झाला आहे. तर घरगुती पीएनजीचा दर प्रति स्टँडर्ड क्युबिक मीटर १.५० रुपयांनी वाढून ५३ रुपये झाला आहे. नाशिकमध्ये सीएनजीचा दर ९९.७५ रुपये प्रति किलो, तर पीएनजीचा दर ५१.७५ रुपये प्रति घनमीटर झाला आहे.

## मास्कधारी हल्लेखोरांचा विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा शहरातील कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. अंधार आणि निर्मनुष्य रस्त्याचा फायदा घेत मास्कधारी दोन हल्लेखोरांनी १७ वर्षीय विद्यार्थ्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले. मानेवर आणि डोक्यावर गंभीर जखमा झाल्याने विद्यार्थ्याची प्रकृती चिंताजनक असून, हल्ल्यानंतर दोन्ही हल्लेखोर पसार झाले. गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास अष्टमी परिसरातील दर्गा रस्त्यावर हा थरार घडला.



- १७ वर्षीय तरुणाच्या मानेवर, डोक्यावर धारदार शस्त्राने वार
- प्रकृती चिंताजनक, हल्लेखोर फरार

सरजील फरीद नवरंगे (रा. अष्टमी, खालचा मोहल्ला, ता. रोहा) असे जखमी विद्यार्थ्याचे नाव आहे. गुरुवारी रात्री तो अष्टमी नाक्यावरील हातगाडीवर नाश्ता करण्यासाठी गेला होता. यावेळी दोन अनोळखी तरुण पाठलाग करत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने अष्टमी पेट्रोल पंपाच्या दिशेने जात रेल्वे स्टेशन परिसरातील दर्गा रस्ता गाठला. मात्र, तेथे अंधार आणि निर्मनुष्यपणाचा फायदा घेत मास्कधारी हल्लेखोरांनी त्याला गाठले आणि मानेवर व डोक्यावर धारदार शस्त्राने वार केले. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

गंभीर जखमी सरजीलला प्रथम खासगी रुग्णालयात, त्यानंतर रोहा उपजिल्हा •➤पान २ वर

# नदीपात्रात भिंत उभारून पुराला निमंत्रण

## शेकापचे अनिल ढवळे आक्रमक, कारवाई न झाल्यास मोर्चाचा इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

टोलेजंग टॉवर उभारण्याच्या नादात पनवेलमध्ये नद्या-नाले बुजविण्याचा सपाटा सुरू असून, आता थेट नदीपात्रातच भिंत उभारून नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण केल्याचा प्रकार पळस्पे फाटा येथे समोर आला आहे. मॅरेथॉन आणि साईवर्ल्ड सिटी पॅराडाईज ग्रुपकडून सीआरझेड नियमांचे उल्लंघन करून नदीपात्रात बांधकाम करण्यात आल्याचा आरोप होत आहे. या बांधकामामुळे पळस्पे गावावर पुराचे संकट ओढवण्याची भीती व्यक्त करत नदीपात्रातील भिंत तातडीने तोडण्याची मागणी शेकाप शेतकरी सभा रायगड जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पनवेलच्या तहसीलदारांना निवेदन दिले असून, कारवाई न झाल्यास माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीव्र मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.






पनवेलचा विस्तार झपाट्याने होत असताना उंच इमारतींच्या बांधकामासाठी नैसर्गिक नाले आणि नदीपात्रांमध्ये भराव टाकण्याचे प्रकार वाढत आहेत. परिणामी, पावसाळ्यात नदीपात्र अरुंद होऊन परिसरातील गावांना पुराचा फटका बसत आहे. दरवर्षी पूरस्थिती निर्माण झाल्यानंतर पंचनामे केले जातात; मात्र कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत महसूल विभाग उदासीन असल्याचा आरोप ढवळे यांनी केला आहे.

प्रबळगडातून उगम पावणारी तसेच इरसाळगड, •➤पान २ वर

# टेकाळीत गुरचरण जमिनीवर अतिक्रमण

## सुरेंद्र कवळेंच्या तक्रारीची जिल्हा प्रशासनाकडून दखल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

समुद्रकिनाऱ्यावरील आवास परिसरातील मौल्यवान जमिनींवर धनदांडग्यांचा डोळा असतानाच टेकाळी (आवास) येथील गुरचरण जमिनीवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. शासकीय जमिनीचे खोदकाम, भराव आणि संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यात आल्याची तक्रार गावातील सुरेंद्र कवळे यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे केली होती. या तक्रारीची जिल्हा प्रशासनाने दखल घेत अलिबागच्या तहसीलदारांना चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता तहसीलदार विक्रम पाटील काय भूमिका घेणार, याकडे लक्ष लागले आहे.



**तहसीलदारांना चौकशीचे आदेश**

मांडवा बंदरालगत असलेल्या आवास परिसरातील जमिनीला सोन्याचे मोल आले आहे. सेलिब्रिटींसह धनदांडगी मंडळी या परिसरात जमिनी खरेदी करून आलिशान घरे उभारत आहेत. मात्र, याच भागातील टेकाळी येथील गट क्रमांक १८९ ही गुरचरण जमीन अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याचा आरोप आहे.

तक्रारदार सुरेंद्र कवळे यांच्या म्हणण्यानुसार, महसूल अभिलेखात ही जमीन गुरचरण म्हणून नोंद असून, अटी व शर्तींवर आवास ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली आहे. गावातील जनावरांच्या चराईसाठी आणि सामायिक वापरासाठी असलेल्या या जमिनीवर कोणत्याही सक्षम •➤पान २ वर

# पेण अर्बनच्या ठेवीदारांना दिलासा

## ६१.४० कोटींच्या वितरणाला न्यायालयाची मंजुरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

गेल्या १५ वर्षांपासून आपल्या हक्काच्या पैशांसाठी संघर्ष करणाऱ्या पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना अखेर काहीसा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या आदेशानुसार १ लाख ३१ हजार ९७६ ठेवीदारांना ६१.४० कोटी रुपयांचे वितरण करण्यास मंजुरी दिली आहे. मात्र, केंद्र सरकारच्या पाच लाख रुपयांच्या विमा संरक्षणाबाबत न्यायालयाने कोणताही निर्णय दिलेला नाही. त्यामुळे ठेवींच्या परताव्याचा मार्ग काहीसा मोकळा झाला असला, तरी संपूर्ण रक्कम आणि विमा संरक्षणासाठी पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीचा लढा सुरूच राहणार आहे.




"१५ वर्षे रस्त्यावर उतरून गोरगरीब ठेवीदारांचे कष्टाचे पैसे परत मिळावेत यासाठी आम्ही संघर्ष केला. पक्षाच्या नेत्यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडेही सातत्याने पाठपुरावा केला. न्यायालयाच्या निर्णयामुळे काही प्रमाणात यश मिळाले असले, तरी ते पुरेसे नाही. पाच लाखांच्या विमा संरक्षणासह सर्व ठेवीदारांना न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. – सुनील गोगटे, सदस्य, पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समिती"

२०११ मध्ये आर्थिक संकटात सापडलेल्या पेण अर्बन बँकेमुळे हजारो ठेवीदारांचे आयुष्यभराची पुंजी अडकली. अनेक वर्षे आंदोलने, न्यायालयीन लढा आणि शासनदरबारी पाठपुरावा केल्यानंतर हा निर्णय झाला आहे. न्यायालयाने मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार छोट्या ठेवीदारांना प्राधान्य देण्यात आले आहे. मात्र, उर्वरित •➤पान २ वर

## समान नागरी कायद्यावर २१, २२ नोव्हेंबरला जनसुनावणी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

समान नागरी कायद्याबाबत नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी कोकण विभागात २१ व २२ नोव्हेंबर रोजी जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. संबंधित गट, संस्था आणि नागरिकांनी उपस्थित राहून आपली मते मांडावीत, असे आवाहन विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या माध्यमातून ही सुनावणी होणार आहे. विवाह, घटस्फोट, लिव्ह-इन संबंध, भरण-पोषण, पालकत्व, वारसाहक्क आदी विषयांवर नागरिकांची •➤पान २ वर

# १२ फेब्रुवारीलाच विलिनीकरण झालं असतं!

## खा. सुनील तटकरेंचा गौप्यस्फोट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणावरून पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे. अजित पवार हयात असते, तर १२ फेब्रुवारी रोजीच राष्ट्रवादीचे विलिनीकरण झाले असते, असा खळबळजनक दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला आहे. अजितदादांनी आपल्याला विलिनीकरणाची पूर्वकल्पना दिली होती, असे सांगतानाच भुजबळांचा केलेला विलिनीकरणाच्या बैठकांचा दावा खरा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तटकरेंच्या या विधानामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांतील विलिनीकरणाच्या चर्चेला पुन्हा वेग आला आहे.



अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात राष्ट्रीवादीच्या विलिनीकरणाबाबत चर्चा झाली होती, असा दावा छगन भुजबळ •➤पान २ वर






**जर्मनीचा फ्रेडमन, रशियाची ॲना उद्धरमध्ये दाखल** | **शेती, स्थानिक वास्तुकलेचा घेताहेत अनुभव**

# परदेशी तरुणांना ग्रामीण संस्कृतीची भुरळ

**। पाली । प्रतिनिधी ।**

शहरी झगमगाटापेक्षा ग्रामीण मातीचा सुगंध आणि पारंपरिक जीवनशैलीचा अनुभव घेण्यासाठी थेट युरोपमधील तरुणाई रायगडच्या गावाकडे आकर्षित होत आहे. सुधागड तालुक्यातील उद्धर येथे जर्मनीचा फ्रेडमन आणि रशियाची ॲना हे दोन तरुण दाखल झाले असून, स्थानिक वास्तुकला, पर्माकल्चर शेती आणि ग्रामीण संस्कृतीचा ते अभ्यास करत आहेत.

जागतिक स्तरावर शाश्वत शेतीचे महत्त्व वाढत असताना भारतीय पारंपरिक शेती पद्धती सम जून घेण्यासाठी हे तरुण उद्धर येथे आले आहेत. येथील 'आत्मतृप्ती पर्माकल्चर'चे संचालक तुषार केळकर यांच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्क साधून त्यांनी हा अभ्यास दौरा आयोजित केला. प्रत्यक्ष मातीत काम करण्यासह ग्रामीण भागातील जीवनशैली अनुभवण्याचा त्यांचा उद्देश आहे.

सात दिवसांच्या वास्तव्यात फ्रेडमन आणि ॲना शेतीतील विविध कामांमध्ये सहभागी होत आहेत. भात कापणी, गवत काढणे, स्वयंपाक करणे, रांगोळी काढणे अशा कामांचा आनंद घेत ते ग्रामस्थांशी संवाद साधत आहेत. ग्रामीण पद्धतीचे जेवण, स्थानिक खाद्यसंस्कृती आणि ग्रामस्थांचे आदरातिथ्य यांचीही त्यांना विशेष भुरळ पडली आहे.



कृषी पर्यटनाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती आणि शाश्वत शेतीचे महत्त्व जागतिक स्तरावर पोहोचत असल्याचे हे उदाहरण आहे. परदेशी तरुणांच्या या सहभागामुळे स्थानिक तरुणांनाही शेती आणि ग्रामीण जीवनाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी मिळत आहे.



# करोडोंचे ई-सिगारेट जप्त

## ■ जेएनपीएमध्ये डीआरआयची कारवाई

**। उरण । प्रतिनिधी ।**

**देशाच्या सागरी प्रवेशद्वारातून बेकायदा मालाची घुसखोरी करण्याचा तस्करांचा डाव महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) उधळून लावला आहे. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या (जेएनपीए) बंदरात डीआरआयने धडक कारवाई करत चार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या तब्बल १३ हजार ई-सिगारेट्स जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे बंदर परिसरातील बेकायदा व्यापाराचे जाळे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.**



ई-सिगारेटच्या बेकायदा आयातीविरोधात डीआरआयने देशभरात विशेष मोहीम उघडली आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये महाराष्ट्रातील विविध बंदरे, हवाई मालवाहतूक केंद्रे आणि अंतर्देशीय कंटेनर डेपो येथे कारवाई करत सुमारे १३५ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या अंदाजे ३ लाख ५५ हजार ई-सिगारेट्स जप्त करण्यात आल्याची माहिती केंद्रीय अर्थ मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. महाराष्ट्रासह गुजरात, दिल्ली आणि पश्चिम बंगालमध्येही डीआरआयने तस्करीविरोधात कारवाया केल्या आहेत.

ई-सिगारेट, विदेशी चलन, अमली पदार्थ आणि वन्यजीवांच्या अवयवांची तस्करी करणाऱ्या टोळ्यांवर डीआरआयने आपली नजर रोखली आहे. तस्करांनी कितीही क्लृप्त्या लढवल्या तरी गुप्त माहितीच्या आधारे त्यांचे धंदे उघड करण्याची मोहीम सुरू आहे.

दरम्यान, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्लीहून भोपाळला जाणाऱ्या एका प्रवाशाला डीआरआयने अडवून त्याच्या सामानाची तपासणी केली. त्यावेळी ६.६४२ किलो वजनाचा पांढऱ्या स्फटिकासारखा संशयित पदार्थ आढळून आला. त्याची पुढील तपासणी करण्यात आली आहे.

आसाममध्येही वन्यजीव तस्करीचा डाव उधळण्यात आला. तेथे सुमारे ३.७ किलो वजनाचे हत्तीचे दोन सुळे जप्त करण्यात आले. वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार हत्तीच्या सुळ्यांचा व्यावसायिक व्यापार प्रतिबंधित आहे.

याशिवाय ६ नोव्हेंबरच्या पहाटे विदेशी चलनाच्या तस्करीविरोधात कारवाई करत डीआरआयने सात जणांना ताब्यात घेतले. त्यांच्या अंगझडती आणि सामानाच्या तपासणीत अमेरिकन डॉलर व ब्रिटिश पाउंडसह सुमारे ३ कोटी १२ लाख रुपये किमतीचे विदेशी चलन आढळून आले. सीमा शुल्क कायदा आणि विदेशी चलनविषयक नियमांनुसार सातही जणांना अटक करण्यात आली.

देशाच्या आर्थिक सुरक्षेला आणि कायदेशीर व्यापाराला सुरुंग लावणाऱ्या तस्करीच्या धंद्याविरोधात डीआरआयने कारवाईचा फास आवळला आहे. जेएनपीए बंदरात झालेली चार कोटींची ई-सिगारेट जप्ती ही त्याच मोहिमेतील महत्त्वाची कारवाई ठरली आहे. बंदराच्या आडून बेकायदा व्यापार करणाऱ्यांना आता कायद्याचा हिसका बसणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विवाहाच्या आमिषाला तरुणी बळी

## ■ युवतीला ५ लाख ५२ हजारांचा सायबर गंडा!

**। उरण । प्रतिनिधी ।**

लग्नासाठी योग्य जोडीदार शोधण्याच्या नादात ऑनलाइन विवाह संकेतस्थळावर विश्वास ठेवणे उरणमधील एका ३० वर्षीय तरुणीला चांगलेच महागात पडले आहे. परदेशात राहणारा उच्चशिक्षित तरुण असल्याचे भासवून सायबर भामट्यांनी विवाहाचे स्वप्न दाखवले आणि विविध शुल्कांच्या नावाखाली तब्बल ५ लाख ५२ हजार रुपयांना गंडा घातला. प्रेमाच्या आणि विवाहाच्या गोड गप्पा मारून आर्थिक लूट करणाऱ्या या सायबर टोळीने तरुणीच्या विश्वासालाच सुरुंग लावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उरणमधील या तरुणीने विवाहासाठी एका ऑनलाइन मॅट्रिमोनी संकेतस्थळावर आपली नोंदणी केली होती. याच संकेतस्थळावर अविराज देशपांडे या नावाने एका भामट्याने तिच्याशी संपर्क साधला. आपण ब्रिटनमध्ये (यूके) राहात असल्याचे सांगून त्याने तरुणीचा विश्वास संपादन केला. विवाहाचा प्रस्ताव पुढे करत परदेशातील ऐश्वर्य आणि आर्थिक संपन्नतेचे आमिष दाखवण्यात आले.

यानंतर या भामट्याने तरुणीला परदेशातून महागड्या वस्तूंचे पार्सल पाठविल्याचे सांगितले. मात्र, हे पार्सल जम्मू-काश्मीरमधील सीमाशुल्क विभागात अडकल्याचा बनाव रचण्यात आला. त्यानंतर गुरसेल नावाच्या व्यक्तीने तरुणीशी संपर्क साधून पार्सल सोडविण्यासाठी विविध शुल्क भरावे लागतील, असे सांगितले. विवाहाच्या भूलथापा आणि परदेशी तरुणाच्या प्रलोभनाला बळी पडलेल्या तरुणीने पैसे भरण्यास सुरुवात केली.

इतक्यावरच या भामट्यांची लूट थांबली नाही. दिल्लीतील सीमाशुल्क विभागातील अधिकारी असल्याचे भासवून कृतीका राय नावाच्या व्यक्तीनेही तरुणीशी संपर्क साधला. अविराजकडे यूकेमधील दोन लाख पौंडचा डिमांड ड्राफ्ट असून त्याच्या नोंदणीसाठी ५५ हजार ५०० रुपये भरावे लागतील, असे सांगण्यात आले. त्यानंतर वेगवेगळी कारणे पुढे करून तरुणीकडून वारंवार पैसे उकळण्यात आले.

विवाहाच्या आशेने तरुणीने भामट्यांच्या सांगण्यावरून पैसे पाठवले; मात्र पार्सल, डिमांड ड्राफ्ट आणि शुल्कांच्या नावाखाली सुरू असलेला हा सगळा प्रकार फसवणुकीचा असल्याचे तिच्या लक्षात आले. तोपर्यंत तिचे तब्बल ५ लाख ५२ हजार रुपये लुटले गेले होते. या प्रकरणी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून सायबर भामट्यांचा शोध सुरू आहे.

ऑनलाइन विवाह संकेतस्थळे, परदेशी नोकरी, महागडी भेटवस्तू आणि पार्सलच्या नावाखाली सायबर लुटीचे नवनवे फंडे वापरले जात आहेत.

# महिला सुरक्षा रामभरोसे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

## ■ नायगावमधील घटनेवरून खासदार वर्षा गायकवाड यांचा संताप

## ■ रेल्वे सुरक्षा यंत्रणेवर उपस्थित केले प्रश्न

नायगाव रेल्वे स्थानकावर तरुणीचा विनयभंग करून तिला रेल्वे रुळांवर फेकल्याच्या घटनेने मुंबईतील महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. लोकल प्रवासातही महिला सुरक्षित नसल्याचा आरोप करत रेल्वे पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा काय झोपल्या होत्या का, असा संतप्त सवाल मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला.

मुंबईची लोकल आता लाईफलाईनऐवजी डेथलाईन ठरत असल्याची टीका त्यांनी केली. लोकलमध्ये चाकूने तरुणाची हत्या, स्थानकांवर हल्ले आणि महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडत असतानाही सुरक्षा व्यवस्था अपुरी असल्याचे त्यांनी म्हटले. नायगावच्या घटनेत पीडित तरुणीचा एक हात कोपरापासून कापावा लागला असून, रेल्वेने तिला भरीव आर्थिक मदत देऊन उपचारांचा संपूर्ण खर्च करावा, तसेच आरोपीला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. मुंबईकरांच्या प्रश्नांवर रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बैठका आणि पत्रव्यवहार करूनही सुधारणा होत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

# जेएनपीटी निवडणुकीवरून कामगार संघटना न्यायाल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

## ■ ऑफिसर्स असोसिएशनच्या सहभागावर उपायुक्त ठाम

## ■ संघटनांची मागणी फेटाळली

जेएनपीएच्या दोन कामगार ट्रस्टींच्या १४ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत जेएनपीटी ऑफिसर्स असोसिएशनला सहभागी होण्याची परवानगी देण्याचा निर्णय मुंबईचे कामगार उपायुक्त संजय दाबी यांनी कायम ठेवला आहे. गुरुवारी (१२) झालेल्या बैठकीत त्यांनी चार काम गार संघटनांची फेरविचाराची मागणी फेटाळली.

या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती न्हावा-शेवा बंदर कामगार (अंतर्गत) संघटनेचे कार्याध्यक्ष गणेश घरत यांनी दिली.

ऑफिसर्स असोसिएशन मागील १३ वर्षांपासून कामगार आंदोलन किंवा बंदरातील निवडणूक प्रक्रियेत सहभागी झालेली नाही. कांडला बंदरातही असोसिएशनला ट्रस्टी निवडणुकीत सहभागी होता येणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हाच निकष जेएनपीएत लागू करावा, अशी कामगार संघटनांची मागणी होती. मात्र, उपायुक्तांनी आपला निर्णय कायम ठेवत निवडणूक चिन्हांचेही वाटप केले.

या निर्णयामुळे जेएनपीएचे वरिष्ठ अधिकारीही मतदान प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार असल्याने कामगारांच्या हिताचा प्रश्न उपस्थित झाला आहे. निर्णयाविरोधातील न्यायालयीन लढ्यात अन्य संघटनाही सहभागी होणार असल्याचे जेएनपीटी वर्कर्स कामगार युनियनचे सरचिटणीस व माजी कामगार ट्रस्टी रवींद्र पाटील यांनी सांगितले.

# पती-पत्नीला जबर मारहाण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

भाऊबीज साजरी करण्यासाठी गेलेल्या पत्नीला शिवीगाळ व मारहाण केल्याचा जाब विचारणाऱ्या पतीवर दगडाने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना माणगाव तालुक्यातील राठोड चाळ, दत्तनगर येथे घडली. याप्रकरणी दोघांविरोधात माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ नोव्हेंबर रोजी रात्री आठच्या सुमारास फिर्यादी पत्नीसमवेत आरोपींकडे भाऊबीज साजरी करण्यासाठी गेले होते. यावेळी आरोपींनी त्यांच्या पत्नीला शिवीगाळ करून मारहाण केली.

# जुना खोपटा पूल अखेर खुला

**। उरण । प्रतिनिधी ।**

विकासकामांचे श्रेय लाटण्यासाठी राजकीय नेत्यांम ध्ये चढाओढ सुरू असताना जुना खोपटा येथील पूल मात्र कोणताही गाजावाजा न करता, राजकीय सोहळ्याचा बडेजाव न मिरवता दिवाळीच्या शुभमुहूर्तावर नागरिकांसाठी खुला करण्यात आला. ग्रामस्थ, वाहनचालक आणि परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा असलेला हा पूल अखेर वाहतुकीसाठी खुला झाल्याने स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या पुलाच्या उभारणीसाठी आमदार महेश बालदी यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. सुरुवातीला या कामासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. डिसेंबर २०२५ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. मात्र काम सुरू असताना पुलाच्या बांधकामासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे काम अर्धवट राहण्याची शक्यता निर्माण झाली होती.

मात्र आमदार महेश बालदी यांनी पुन्हा शासनदरबारी पाठपुरावा करून आणखी पाच कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे या पुलासाठी एकूण दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आणि रखडलेल्या कामाला गती मिळाली. अखेर पुलाचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर दिवाळीच्या मुहूर्तावर तो जनतेसाठी खुला करण्यात आला.

राजकारणात उद्घाटनाच्या फलकांसाठी आणि श्रेयाच्या जाहिरातींसाठी मोठी धावपळ केली जाते. मात्र जुना खोपटा पुलाच्या बाबतीत कोणताही मोठा गाजावाजा न करता नागरिकांच्या सोयीला प्राधान्य देण्यात आले, ही बाब विशेष ठरली आहे. पुलामुळे परिसरातील नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होणार असून दैनंदिन प्रवासाला दिलासा मिळणार आहे.

दहा कोटींच्या निधीतून साकारलेला हा पूल ग्रामस्थांसाठी दिवाळीची भेट ठरला आहे. आता या पुलाची देखभाल, सुरक्षितता आणि वाहतुकीसाठी आवश्यक व्यवस्था सक्षम ठेवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेने पार पाडावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. शेवटी विकासाच्या कामाला भाषणांचा गाजावाजा नको, तर प्रत्यक्ष कामाचा दर्जा आणि जनतेला मिळणारा दिलासा महत्त्वाचा. जुना खोपटा पुलाने दिवाळीत ग्रामस्थांना हाच दिलासा दिला आहे.

# 'दि.बा. पाटील' नामकरणाचा केंद्राने आदर करावा

**। उरण । प्रतिनिधी ।**

## ■ शेकाप तालुका चिटणीस रवी घरत यांचे प्रतिपादन

## ■ रायगड तोफच्या 'देवमाणूस' दिवाळी अंकाचे प्रकाशन




नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी ही भूमीपुत्रांची जनभावना आहे. महाराष्ट्र विधिमंडळानेही एकमताने ठराव मंजूर करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे. त्यामुळे केंद्राने जनभावनेचा आदर करून विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे, असे आवाहन शेकापचे उरण तालुका चिटणीस रवी घरत यांनी केले.

सामाजिक कार्यकर्ते यशवंत ठाकूर यांच्या पुढाकाराने रायगड तोफच्या 'देवमाणूस' या विशेष अंकाचे प्रकाशन रवी घरत यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. यावेळी उरण तालुका शेकापप्रणीत सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष डी. आर. ठाकूर अध्यक्षस्थानी होते. सुहास घरत, यशवंत ठाकूर, काशिनाथ भोईर, दत्ता घरत, म नोहर पाटील, प्रकाश पाटील, रमेश कोळी, भ.पो. म्हात्रे आणि स.ही. पाटील आदी उपस्थित होते.

दि.बा. पाटील यांनी या भूमीतील जनतेसाठी मोठा संघर्ष केला. याच भूमीत उभ्या राहिलेल्या विमानतळाला त्यांचे नाव देणे ही भूमीपुत्रांची अपेक्षा आहे. दि.बा. पाटील पाच वेळा आमदार आणि दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले होते, याची आठवण रवी घरत यांनी करून दिली. अध्यक्ष डी.आर. ठाकूर आणि दत्ता घरत यांनीही विमानतळ नामकरण करून जनभावनेचा आदर करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन यशवंत ठाकूर यांनी केले, तर उपस्थितांचे स्वागत रायगड तोफचे संस्थापक संपादक रामचंद्र म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाला प्रकल्पग्रस्त भूमीपुत्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २५ नोव्हेंबरला युवा महोत्सव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

## ■ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाची माहिती

युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, भारतीय संस्कृतीचे जतन व्हावे आणि राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने मुंबई शहर जिल्हास्तरीय युवा महोत्सव २५ नोव्हेंबरला आयोजित करण्यात आला आहे. चर्नी रोड येथील मारवाडी कमर्शियल स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात हा महोत्सव होणार आहे.

महोत्सवात समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, पथनाट्य, चित्रकला आणि कविता लेखन या स्पर्धा होणार आहेत. १५ ते २९ वयोगटातील मुंबई शहर जिल्ह्यातील रहिवासी किंवा जिल्ह्यात शिक्षण घेणारे युवक-युवती सहभागी होऊ शकतात. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क नसून विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. विजेत्यांना रायगड येथे होणाऱ्या विभागीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळेल. इच्छुकांनी २३ नोव्हेंबरपर्यंत गुगल फॉर्मद्वारे ऑनलाइन नोंदणी करावी. युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने केले आहे.

## पान १ वरुन

# मास्कधारी हल्लेखोरांचा विद्यार्थ्यांवर जीवघेणा हल्ला

रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, महिनाभरापूर्वी मोहल्ल्यातील एका तरुणाच्या भाच्याला सरजीलने मारहाण केली होती. त्यावेळी संबंधित तरुणाने 'मी किंवा अन्य कोणामार्फत तुला मारहाण करीन,' अशी धमकी दिली होती. याच जुन्या वादातून सूडभावनेने हल्ला झाल्याचा संशय सरजीलने पोलिसांकडे व्यक्त केला आहे. पोलिसांकडून हल्लेखोरांचा शोध सुरू असून, या घटनेने रोहा परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# टेकाळीत गुरचरण जमिनीवर अतिक्रमण

प्राधिकरणाची परवानगी न घेता खोदकाम, भराव आणि संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यात आले आहे. शासकीय सुट्टीच्या दिवशीही दिवस-रात्र अनधिकृत बांधकाम सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

आर्थिक हितसंबंध आणि राजकीय प्रभावाचा वापर करून या शासकीय जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले असून, त्यामुळे जमिनीचे मूळ स्वरूपच नष्ट झाले आहे. गावाच्या सामायिक वापरासाठी एक इंचही जमीन शिल्लक राहिलेली नाही, अशी गंभीर बाब कवळे यांनी तक्रारीत मांडली आहे.

याप्रकरणी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे तक्रार करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल विभागाचे तहसीलदार चंद्रसेन पवार यांनी अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांना पत्र पाठविले आहे. अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता महसूल विभाग प्रत्यक्ष कारवाई करणार की हे प्रकरण कागदोपत्रीच राहणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# १२ फेब्रुवारीलाच विलिनीकरण झालं असतं!

यांनी केला होता. त्यावर तटकरेंनी शिक्कामोर्तब केले. भुजबळ यांच्यावर एशियन हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाली होती. त्यावेळी मी त्यांना भेटायला गेलो होतो. त्याआधीच अजितदादा आणि जयंत पाटील यांची भेट झाली होती. विलिनीकरणाची बैठकही झाली होती. भुजबळ यांनी रुग्णालयातूनच या चर्चेत सहभाग घेतला असावा. त्यामुळे त्यांनी केलेल्या दाव्यात तथ्य आहे, असे तटकरे म्हणाले.

**योग्यवेळी आणखी बोलणार**

अजित पवार यांच्या निधनानंतर आपण विलिनीकरणाबाबत का बोललो नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र, कोणत्या वेळी काय बोलायचे, याची मला समज आहे. मी तेव्हा बोललो नाही, आता बोलत आहे, यात काहीही तथ्य नाही. योग्यवेळी आणखी बोलेन, असे सूचक विधान तटकरे यांनी केले.

**उदय सामंतांना सुनावले**

शिवसेना शिंदे गटाचे नेते उदय सामंत यांनी केलेल्या टीकेलाही तटकरेंनी प्रत्युत्तर दिले. उदय सामंत हे राष्ट्रवादीतील माझे एकेकाळचे सहकारी आहेत. मी काय बोलावे आणि काय बोलू नये, हे त्यांनी सांगण्याची गरज नाही. आमचे पक्ष वेगळे आहेत. आम्ही त्यांच्या पक्षाबाबत बोलत नाही. लोकशाही आघाडी सरकारमध्ये सामंत यांना मंत्री करण्यात आमचाही थोडाफार वाटा होता. नसेल तर त्यांनी सांगावे, असा टोला तटकरेंनी लगावला.

# समान नागरी कायद्यावर २१, २२ नोव्हेंबरला जनसुनावणी

मते जाणून घेतली जाणार आहेत. ही सुनावणी कोकण भवन, सीबीडी बेलापूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात होईल.

जिल्हानिहाय वेळापत्रक :

२१ नोव्हेंबर मुंबई शहर (सकाळी ११ ते १२), मुंबई उपनगर (१२.३० ते १.३०), पालघर (दुपारी ३ ते ४), सिंधुदुर्ग (४.३० ते ५.३०). २२ नोव्हेंबर ठाणे (सकाळी ११ ते १२), रायगड (१२.३० ते १.३०), रत्नागिरी (दुपारी ३ ते ४).

नागरिकांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात निर्धारित वेळेच्या एक तास आधी उपस्थित राहावे. आयुक्त कार्यालयातील सुनावणी प्रत्यक्ष, तर जिल्हाधिकारी कार्यालयातील सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे होईल. ऑनलाइन मते नोंदविण्यासाठी शासनाच्या www.ucc.maharashtra.gov.in या पोर्टलवर ३७ मुद्द्यांवर माहिती सादर करता येणार आहे.

# पेण अर्बनच्या ठेवीदारांना दिलासा

ठेवीदारांच्या संपूर्ण रकमेचा प्रश्न अद्याप कायम आहे.

दरम्यान, बँकेच्या मालमत्तांमधूनही ठेवीदारांचे पैसे वसूल होण्याची आशा आहे. ईडीने जप्त केलेल्या २९ स्थावर मालमत्ता १४ जानेवारी २०२५ रोजी विशेष न्यायालयाच्या आदेशाने एमपीआयडी प्राधिकरणाकडे परत करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या मालमत्तांचे मूल्यांकन आणि विक्रीची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे.

**परतावाचे गणित**

ठेवीची रक्कम ठेवीदार संख्या प्रस्तावित परतावा
१ ते २५ हजार ९५,९०० १०० टक्के
२५ हजार ते ५ लाख ३४,१९२ ८ टक्के
५ ते १० लाख १,३४९ १० टक्के
१० लाखांपेक्षा अधिक ५३५ प्रत्येकी १ लाख
एकूण १,३१,९७६ ६१.४० कोटी

**संघर्ष समितीच्या प्रमुख मागण्या**

- न्यायालयाने मंजूर केलेल्या रकमेचे तातडीने वितरण करावे.
- बँकेच्या सर्व मालमत्तांचे मूल्यांकन व विक्रीची कालमर्यादा जाहीर करावी.
- पात्र ठेवीदारांना पाच लाखांच्या विमा संरक्षणाचा लाभ मिळवून द्यावा.
- उर्वरित ठेवी परत करण्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करावा.
- गैरव्यवहारातील दोषींवर कारवाई करून ठेवीदारांचे नुकसान भरून काढावे.

# नदीपात्रात भिंत उभारून पुराला निमंत्रण

भाताण आणि वांगणेश्वरच्या खोऱ्यातून वाहणाऱ्या नद्यांचा संगम होऊन धाकली नदी तयार होते. याच नदीकिनारी मॅरेथॉन आणि साईवर्ल्ड सिटी हे विकासक ३० ते ३२ मजली इमारती उभारत आहेत. या बांधकामासाठी नदीपात्र अडवून भराव टाकण्यात आल्याचा आरोप आहे. नदी-नाल्यांमध्ये सांडपाणी सोडून नदी प्रदूषित केल्याचेही ढवळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

या बांधकामामुळे पावसाळ्यात पळस्पे गावात पाणी शिरते, तर शिवकर परिसराकडे जाणारा रस्ताही पाण्याखाली जात असल्याने गावांचा संपर्क तुटण्याचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे नदीपात्रातील भिंत आणि बेकायदेशीर बांधकामे तातडीने निष्कासित करावीत, अशी मागणी अनिल ढवळे यांनी केली आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**जाहीर नोटीस**

आमचे पक्षकार 'सीमा नरेश शिंदे' यांच्याकडून खालील वर्णनीत 'भूखंड खरेदी करण्यासंबंधी करार झाला आहे व पुढील व्यवहारिक प्रक्रिया पूर्ण करण्याच्या विचारात आहेत. तरी, खालील 'भूखंडा' विषयी कोणाही व्यक्ती/व्यक्तींनी/संस्था/बँक/भागीदारी संस्था/वारस/गहाणदार/बांधकाम व्यवसायिक यांचे कुठलेही हितसंबंध असल्यास संबंधित व्यक्ती/व्यक्तीं/संस्था/बँक/भागीदारी संस्था/वारस/गहाणदार बँक/संस्था/बांधकाम व्यवसायिक यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत योग्य पुराव्यासह लेखी हरकती असल्यास आवश्य नोंदवाव्यात. अन्यथा आमचे पक्षकार सदरच्या भूखंडचा व्यवहार संपूर्ण शीर्षक स्पष्ट असल्याचे समजून पुर्ण करण्यात येईल याची गंभीर नोंद घ्यावी.

**भूखंडाचे वर्णन**

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| अनु क्र. | भूखंड क्र. | हे.आर.पॉ (चौ.फुट) | स्थळ |
| १ | १६५/१/ए/५ | २४७० | गाव रीस, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य, इंडिया. |

दिनांक : १३ नोव्हेंबर, २०२६
स्थळ : पनवेल

सही/-
**ADV.PRADEEP INGOLE,**
B.Arch, LL.B.,D.V.(Real Estate).
office : 'Legal 10' 102, Shree Sahayya Elite, Beside Prachin Hospital, Thana Naka, Panvel, Dist. Raigad -410 206.
Mob No : 9890291800/ 9967475306
Email: leal.10tech@gmail.com

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकाना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री.नंदु वाळकू मोहिते व इतर रा.उक्रुल तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दुनकुऱ्या गौरू मराडे रा.वडवली तर्फे वरेडी तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे. मिळकतीचे वर्णन

**मौजे -वडवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | ० | २-२४-१०<br>पो.ख. ०-१५-७०<br>एकुण क्षेत्र २-३९-८० या<br>पैकी लिहून देणार यांचे क्षेत्र<br>०-७०-०० ची विक्री | १७.०६<br><br><br><br>५.३३ |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्गाभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल साठेकरार/खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दिनांक : १४/११/२०२६

अशिला तर्फे ॲडव्होकेट
**ॲड हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अपा. युको बँक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०

# वरसोलीत वानराची दहशत

## ।। पाळीव जनावरांवर हल्ले ।। ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

नागाव आक्षी परिसरातील बिबट्याच्या दहशतीनंतर अलिबाग तालुक्यातील वरसोलीमध्ये एका वानराने दहशत निर्माण केली आहे. कधी घराच्या छतावर, कधी खिडकीत, तर कधी वेगवेगळ्या गाड्यांवर बसून नागरिकांच्या अंगावर धावून जाणाऱ्या वानराने गावातील बाबदेव आणि परिसरातील पाळीव जनावरांवर हल्ले करून त्यांना जखमी केल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये एका आठ वर्षाच्या वासराचा मृत्यू झाला असून म्हैस गंभीर जखमी झाल्याचे समजते. वरसोलीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी नागरीकांकडून होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वरसोली येथील बापदेव आळी परिसरात गेल्या आठवड्यापासून वानराचा वावर आहे. झाडांवर लपून बसणे, त्यानंतर संधी मिळताच गुरांच्या गोठ्यात शिरून बांधलेल्या जनावरांना हल्ला करणे हा प्रकार सुरु आहे. पाळीव प्राण्यांच्या तोंडावर, नाकाजवळ तसेच शरीराच्या इतर भागांवर मोठमोठे चावे घेत आहे. या हल्ल्यांमुळे दहशतीचे व भीतीचे वातावरण पसरले आहे.

वरसोलीमधील प्रशांत दत्तात्रेय वर्तक यांच्या म्हशीला नुकतेच जन्मलेल्या अवघ्या आठ दिवसाचे म्हशीचे वासरू या वानराच्या हल्ल्यात ठार झाल्याचे बोलले जात आहे. या घटनेनंतरही वानराचा उपद्रव थांबलेला नाही. गुरुवारी सकाळी देखील वानराने पुन्हा हल्ला केला. गोठ्यांतील म्हशींना लक्ष्य करत त्यांच्या तोंडावर आणि नाकाजवळ मोठमोठे चावे घेतले. गोठ्यातील एक म्हैस आणि दोन वासरांवरही हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. पाळीव जनावरांवर हल्ले करणाऱ्या या वानराच्या आक्रमक वर्तनामुळे आता मानवी सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे परिसरात चिंतेचे वातावरण असून, संबंधित वन विभाग आता काय उपाययोजना करणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### जखमी जनावरांवर उपचार सुरू

वानराच्या हल्लात जखमी झालेल्या पाळीव जनावरांवर पशुसंवर्धन विभागामार्फत उपचार सुरू करण्यात आले आहेत. या जनावरांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

# जीवना बंदर परिसरात सांडपाणी रस्त्यावर

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन शहरातील जीवनाबंदर परिसरात बंदराकडे जाणाऱ्या रस्त्यावरती मोठ्या प्रमाणात सांडपाणी वाहत असल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. सांडपाणी रस्त्यावर आल्यामुळे अनेक दुचाकीस्वार देखील घसरून पडल्याचे प्रकार घडले आहेत. शुक्रवारी (दि.१३) नोव्हेंबर रोजी सकाळी काही महिलांनी त्या ठिकाणी सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे काही काळ रस्ता अडवून धरला होता. मोठमोठी लाकडाचे ओडके आणून रस्त्यात ठेवली होती. रस्त्यावर येणारे सांडपाणी व जीवनाबंदर जेट्टीचे बांधकाम करणाऱ्या कंपनीच्या मोठ्या मालगाड्यांची सततची वाहतूकमुळे तिथे चिखलाचे साम्राज्य पसरले आहे.



### ■ वाहतूकीमुळे चिखलाचे साम्राज्य

जीवनाबंदर परिसरात अनेक घरे डोंगरावर आहेत. डोंगरावरून सांडपाणी जाण्यासाठी मार्गिका तयार केलेल्या आहेत. परंतु रस्त्या खालून पाईपलाईन टाकून सांडपाणी समुद्राच्या बाजूला सोडणे गरजेचे आहे. श्रीवर्धन नगरपरिषद जीवनाबंदर येथील नागरिकांकडून देखील सर्व प्रकारचे कर वसूल करत असते. मात्र, या परिसरामध्ये नगरपरिषदेकडून साफसफाई होत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांमधून केला जात आहे.

सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळेत्या ठिकाणी पसरलेल्या दुर्गंधीमुळे नागरिकांना नाक मुठीतच घेऊन त्या ठिकाणाहून जावे लागत आहे. तरी श्रीवर्धन नगरपरिषदेने त्या ठिकाणी सांडपाण्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.

## निवडक



### साळाव-मुरुड रस्त्यावर वाहतूक कोंडी

**कोर्लई** : राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्याच्या काँक्रिटीकरणात दोन्ही बाजूंनी खणलेले रस्ते कामे करण्यात घिसाडघाई वाहनचालकांची डोकेदुखी ठरत आहे. दिवाळी सणाच्या सुट्ट्या, पर्यटनात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे तासंतास खोळंबा होत आहे. राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्याच्या काँक्रिटीकरणात कामे चांगली करण्यात येत असली तरी काशीद युटर्न, दांडा, नांदगाव, मजगाव, मजगाव गावठाण तसेच विहूर ते नबाबाचा राजवाडा दरम्यान वळणावर रस्त्याच्या कामात दोन्ही बाजूला खणलेले रस्ते, खडी वाहनचालकांची डोकेदुखी ठरत असून वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे, वेळप्रसंगी याठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळाने यात लक्ष घालून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व प्रवासी वर्गातून केली जात आहे.

### 'निवृत्तीवेतनधारकांनी डिजिटल जीवन प्रमाणपत्र सुविधेचा लाभ घ्या'

**अलिबाग** : निवृत्तीवेतनधारकांना हयातीचा दाखला सादर करण्यासाठी आता बँक किंवा कोषागार कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. अँड्रॉइड मोबाईलवर "Jeevan Pramaan' डाऊनलोड करून ओटीपी आणि फेस ऑथेंटिकेशनच्या माध्यमातून घरबसल्या डिजिटल हयातीचा दाखला अर्थात जीवन प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. जिल्ह्यात १८ हजार ६०० कोषागार निवृत्तीवेतनधारक असून डिजिटल जीवन प्रमाणपत्राचे काम शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी दि.१४ ते दि.३० नोव्हेंबर दरम्यान बँक, महा ई सेवा केंद्र, जिल्हा कोषागार कार्यालय व उपकोषागार कार्यालयात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या सुविधेचा सर्व निवृत्तीवेतनधारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. निवृत्तीवेतनधारकांकडे पीपीओ क्रमांक, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, बँक खाते क्रमांक आणि EM-IL ID आवश्यक आहे. डिजिटल प्रमाणपत्र सादर करताना नाव, आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक आणि पीपीओ क्रमांक अचूक नोंदविणे आवश्यक आहे. निवृत्तीवेतनधारकांकडे पीपीओ क्रमांक, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, बँक खाते क्रमांक आणि EM-IL ID आवश्यक आहे. डिजिटल प्रमाणपत्र सादर करताना नाव, आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक आणि पीपीओ क्रमांक अचूक नोंदविणे आवश्यक आहे. संस्थेचा प्रकार (organization) म्हणून state government /UT निवडावे, मंजुरी देणारे प्राधिकरण म्हणून State government Maharashtra निवडावे , वितरण संस्था म्हणून "Maharashtra State Treasury' आणि संबंधित कोषागार म्हणून "R-IG-D / R-IG-RH DTO यांची योग्य निवड करावी. अधिक माहिती व सहाय्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालय, संबंधित उपकोषागार कार्यालय किंवा आपल्या बँकेशी संपर्क साधावा. डिजिटल जीवन प्रमाणपत्राच्या माध्यमातून चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आणि निवृत्तीवेतनधारकांची प्रक्रिया सुलभ करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या सुविधेचा लाभ घेऊन देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान ५ यशस्वी करावे.

### मूर्ती चोर २४ तासांत जेरबंद

**पनवेल** : खारघर परिसरातील हनुमान मंदिर आणि गणपती मंदिरातील मूर्ती चोरीच्या घटनांचा अवघ्या २४ तासांत उलगडा करण्यात खारघर पोलिसांना यश आले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करून पोलिसांनी किशन राधेश्याम गंगावणे (वय ३८) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत मूर्ती चोरीचे दोन आणि अन्य चार असे एकूण सहा गुन्हे उघडकीस आले आहेत. खारघर पोलीस ठाण्यात गणपती मंदिरातील मूर्ती चोरीची नोंद करण्यात आली होती. या घटनांची गंभीर दखल घेत पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्यातून संशयिताची ओळख पटवून पोलिसांनी त्याचा शोध घेतला आणि त्याला ताब्यात घेतले. आरोपी किशन (वय ३८) हा खारघर सेक्टर १० मधील कोपरा गावच्या स्मशानभूमीजवळ राहत असून, त्याचे मूळ गाव शिवनी शिवापूर, तालुका मंगरूळपीर, जिल्हा वाशिम असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीकडून खारघर पोलीस ठाण्यातील सहा गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अवघ्या २४ तासांत मंदिरातील मूर्ती चोरीच्या घटनांचा छडा लावून अन्य चार गुन्ह्यांचीही उकल करण्यात आल्याची माहिती खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांनी दिली.

# खारघरमध्ये फटाक्यांमुळे ४१ ठिकाणी आग

| पनवेल | प्रतिनिधी |

दिवाळीच्या उत्सवात फटाक्यांच्या आतषबाजीने खारघर परिसरात आगीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली. ६ ते १० नोव्हेंबरदरम्यान अवघ्या पाच दिवसांत खारघर अग्निशमन केंद्राला आगीच्या ४९ घटनांचे कॉल प्राप्त झाले. त्यापैकी ४१ घटना फटाक्यांमुळे घडल्या, तर आठ घटना अन्य कारणांमुळे लागलेल्या आगीच्या होत्या. या घटनांमध्ये बेलपाडा येथील दोन गॅरेज जळून खाक झाली, तर अनेक सोसायट्यांमधील घरे आणि इमारतींनाही आगीची झळ बसली.

फटाक्यांमधून उडणाऱ्या ठिणग्यांमुळे मोकळ्या भूखंडांवरील सुकलेले गवत, इमारतींच्या

### ■ बेलपाड्यात दोन गॅरेज जळून खाक



गॅलरी, खिडक्या आणि छतांवर आग लागण्याचे प्रकार घडले. कोपरा गावातील सेक्टर १०, गेट क्रमांक ६ जवळील एका घराला आग लागली. सेक्टर ३४ मधील हाइड पार्क सोसायटीच्या 'ए' विंगमधील सदनिकेच्या खिडकीजवळील लाकडी फळीने पेट घेतला. पटेल पॅराडाइजमधील सदनिकेच्या खिडकीला लावलेल्या हिरव्या जाळीलाही आगीची झळ बसली. महावीर अपार्टमेंटच्या सी विंगमधील दहाव्या मजल्यावरील विद्युत वाहिन्यांच्या डक्टमध्येही आग लागली.

दरम्यान, १० नोव्हेंबरच्या रात्री सेक्टर ३ मधील बेलपाडा हिल व्हील सोसायटीतील दोन गॅरेजना आग लागून ती जळून खाक झाली. या घटनांमुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविल्याने मोठी दुर्घटना टळली.

दिवाळीच्या काळात आगीच्या घटनांचा वाढलेला आकडा पाहता खारघर अग्निशमन केंद्रातील अधिकारी आणि जवानांची चांगलीच धावपळ उडाली. प्रत्येक कॉलला तत्काळ प्रतिसाद देत जवानांनी संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी प्रयत्न केले.

सुकलेले गवत आणि फटाके फोडताना घेतली न जाणारी खबरदारी यामुळे आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली. अशी माहिती अग्निशमन दलाचे अधिकारी सौरभ पाटील यांनी दिली. दिवाळीचा आनंद साजरा करताना सुरक्षिततेचे भान न ठेवल्यास मोठ्या दुर्घटनेला सामोरे जावे लागू शकते, हे या घटनांनी अधोरेखित केले आहे.

# कळंबोलीकडे जाणाऱ्या कंटेनरचा अपघात




| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

एनएच-४ ते जेएनपीटी महामार्गावर कळंबोलीच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर शुक्रवारी (दि.१३) रोजी सकाळीसुमारास कंटेनरचा अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कंटेनर रस्त्यावर आडवा झाल्याने महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. सकाळच्या गर्दीच्या वेळी हा अपघात झाल्याने कामावर जाणारे नागरिक आणि वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक आणि वाहतूक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कंटेनर रस्त्यावर आडवा झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.या महामार्गावरून कळंबोली, पनवेल तसेच जेएनपीटीच्या दिशेने दररोज मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची ये-जा सुरू असते. गेल्या काही दिवसांत या परिसरात दोन ते तीन अपघात घडल्याची माहिती समोर येत असल्याने या मार्गावर अपघातांची मालिका सुरू झाली आहे का, असा प्रश्न वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळेत अवजड वाहनांचा अपघात झाल्यास संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर त्याचा परिणाम होत आहे.

आणखी किती अपघात झाल्यानंतर महामार्ग प्रशासन जागे होणार? अवजड वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी, अपघातप्रवण ठिकाणी सुरक्षा उपाययोजना करण्यासाठी वाहतूक पोलीस आणि संबंधित महामार्ग प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.



● मुरुड खोरा बंदरात सायंकाळी ओहोटी असताना वाळूत विविध आकाराचे पट्टे तयार होतात. भरती ओहोटीपासून तयार होणारे हे पट्टा सुंदर दिसतात. त्यामुळे पर्यटकांना आकर्षित करतात. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

### स्कूटीच्या धडकेत ज्येष्ठ नागरिक जखमी

**पनवेल** : एसटी डेपोसमोरील महाराजा स्वीट दुकानाजवळ भरधाव स्कूटीने धडक दिल्याने ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातात गोकुळ काळोजी भोईर (वय ६५) हे जखमी झाले आहेत. यावेळी स्कूटीची धडक भोईर यांना बसल्याने त्यांना किरकोळ दुखापत झाली. जखमी भोईर यांच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांच्या जबाबावरून पनवेल शहर पोलीस ठाण्यात स्कूटी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### द्रुतगती मार्गावर पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल** : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कोनगावजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एका पादचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसल्याने पनवेल तालुका पोलिसांनी नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोनगाव परिसरात हा अपघात झाला. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चौलमध्ये कार्यकर्तृत्व पुरस्कार सोहळा

| रेवदंडा | प्रतिनिधी |

चौल-बेलाई येथे अमृत महोत्सवी वयोमान पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान तसेच समाजभान जपणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांना कार्यकर्तृत्व पुरस्कार प्रदान करण्याचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. नारायण नाईक प्रतिष्ठान आणि उत्कर्ष महिला मंडळ, चौल-बेलाई यांच्या संयुक्त विद्यमाने कै. नारायण (भाऊ) नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुरुवारी (दि.१२) नोव्हेंबर रोजी वस्तुत्व लॉन अँड रिसॉर्ट, चौल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या सोहळ्यात अलिबाग जेएसएम. महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक व लेखक शाम जोगळेकर यांना 'जीवनगौरव' पुरस्कार २०२६, रवींद्र पाटील यांना 'कृषिमित्र' पुरस्कार, अमित गवळे यांना लोकहितकारी पत्रकारिता पुरस्कार, अतुल हेमंत गुरव यांना वृक्षमित्र राजाभाऊ राईलकर 'पर्यावरण स्नेही' पुरस्कार, प्रमिला शरद गावडे यांना समाजकार्य गौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

तसेच चौल ज्येष्ठ नागरिक संघातील वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ३० ज्येष्ठ सदस्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास ज्येष्ठ कवयित्री सिरत सातपुते, माजी उपसरपंच सदाशिव मोरे, भगवान नाईक, अनंत घरत, प्रकाश पाटील, प्रकाश काबाळे, रमेश नाईक आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभाकर नाईक, महेंद्र नाईक, मंगेश नाईक, नंदकुमार नाईक, ललिता म्हात्रे, राजश्री नाईक, भक्ती रानवडे, हरिश्चंद्र म्हात्रे, मदन ठाकूर, सुधाकर राऊळ, जयवंत कंटक आणि हर्षला म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रितम सुतार यांनी केले.

**वाहतूक कोंडीचा ताप कायम** | **मंदिर परिरात सुबक रांगोळ्या**

# बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांचा महापूर

| पाली / बेणसे | प्रतिनिधी |

दिवाळीच्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक आणि भाविकांनी अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीकडे मोठी धाव घेतली आहे. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने दाखल होत असून पाली नगरी भाविकांच्या गर्दीने फुलून गेली आहे.

शाळा-महाविद्यालयांच्या सुट्ट्या अद्याप सुरू असल्याने मंदिर परिसरात भाविकांची मोठी रेलचेल पाहायला मिळत आहे. या गर्दीचा सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर झाला असून हॉटेल व्यावसायिक, दुकानदार आणि छोट्या व्यावसायिकांच्या व्यवसायाला चांगली चालना मिळाली आहे. मात्र, वाढत्या वाहनसंख्येमुळे पालीतील वाहतूक कोंडीची समस्या पुन्हा ऐरणीवर आली आहे.



बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी दररोज मोठ्या संख्येने भाविक पालीत दाखल होत आहेत. दिवाळी आणि भाऊबीजेच्या पार्श्वभूमीवर मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून फुलांची मनमोहक सजावट आणि मंदिर परिसरातील सुबक रांगोळ्या भाविकांचे लक्ष वेधून घेत आहेत. मंदिरासमोरील तलावाचीही दिव्यांच्या रोषणाईने सजावट करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसराला उत्सवी आणि भक्तीमय स्वरूप प्राप्त झाले आहे.

भाविकांच्या वाढत्या गर्दीचा विचार करून बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर्शनासाठी आवश्यक सोयी-सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे.

> देवस्थानच्या वतीने चोख व्यवस्था भाविकांच्या वाढत्या गर्दीचा अंदाज घेऊन देवस्थान ट्रस्टच्या वतीने योग्य व्यवस्थापन आणि नियोजन करण्यात आले आहे. भाविकांच्या निवासासाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त दोन आधुनिक भक्तनिवास उपलब्ध आहेत. दर्शनासाठी रांगेत उभे राहणाऱ्या भाविकांसाठी शेड उभारण्यात आली आहे. वाहनांसाठी देवस्थानच्या दोन भव्य मोफत पार्किंगची सुविधा उभारण्यात आली आहेत.
> -जितेंद्र गद्रे,
> अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

### आदिवासी महिलांनाही रोजगाराची संधी

दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे पालीत वाढलेल्या भाविकांच्या गर्दीचा फायदा स्थानिक आदिवासी महिलांनाही होत आहे. मंदिराबाहेर अनेक आदिवासी महिला गावठी भाज्या, ॲस्टर व झेंडूची फुले, कंदमुळे आदी वस्तू विक्रीसाठी घेऊन बसलेल्या दिसतात. मंदिरात दर्शनासाठी येणारे भाविक आवर्जून या महिलांकडून खरेदी करत असल्याने त्यांना चांगला रोजगार उपलब्ध होत आहे. धार्मिक पर्यटनामुळे स्थानिक महिलांच्या हातालाही काम मिळत आहे.

## अमेरिका आणि भारत

अमेरिकेत अनेक बदमाष भांडवलदार कंपन्या आणि त्यांचे तितकेच बदमाष मालक आहेत. या मालकांना पाठीशी घालणारे ट्रम्पसारखे राजकारणीही आहेत. तरीही तिथली पोलिस व न्याययंत्रणा, तिथली वृत्तपत्रे या सगळ्यांना पुरुन उरत असतात. त्यांच्या भानगडी बाहेर निघत असतात. मुख्य म्हणजे अशी प्रकरणे बाहेर आली की संबंधितांना शिक्षा होते, तुरुंगात जावे लागते, पदे सोडावी लागतात. अमेरिका आणि भारत हे दोन्ही मोठे लोकशाही देश असले तरी तिथे हा मोठा फरक आहे. अमेरिकेत सध्या एनव्हिडिया कंपनीचे प्रकरण गाजते आहे. या कंपनीचे मालक व मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणजे सीईओ जेन्सन हुआंग यांना अशाच एका प्रकरणात गुरुवारी राजीनामा द्यावा लागला. एनव्हिडिया ही कंपनी अजस्त्र आहे. तिच्या सर्व शेअर्सची बाजारातील आजची जी सुमारे ४.३ लाख कोटी डॉलर्स आहे. हुआंग यांच्या भानगडीमुळे हे मूल्य खाली आले आहे. अन्यथा, ते बराच काळ पाच लाख कोटी डॉलर्सहूनही अधिक होते. भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पादन सध्या सुमारे ४.१ लाख कोटी डॉलर्सच्या आसपास आहे. म्हणजेच भारताच्या जीडीपीहून या कंपनीची बाजारातील किंमत अधिक आहे. अर्थात बाजारातील किंमत आणि प्रत्यक्ष राष्ट्रीय उत्पादन यांची तुलना करावी का हा वेगळा मुद्दा आहे. पण कंपनीचा अजस्त्रपणा त्यावरून कळू शकेल. ही कंपनी संगणकांमध्ये लागणाऱ्या चिप्सचे उत्पादन करते. अलिकडे आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआयने सर्व आर्थिक गणिते उलटीपालटी केली आहेत. या एआयच्या निर्मितीमध्ये महत्वाचे असते ते ग्राफिक प्रोसेसिंग युनिट्स. जगभरातील एआयमधील ८० ते ९० टक्के जीपीयू ही एनव्हिडियाने तयार केलेली असतात. त्यातील अतिशक्तिशाली चिपचे उत्पादन ही त्यांची हुकुमत आहे. अगदी चीनलादेखील त्यांच्याशी अजून पूर्णतः स्पर्धा करणे जमलेले नाही. किंबहुना, त्यातूनच ही सगळी भानगड उपटली आहे. चीनला चिपच्या निर्यातीवर अमेरिकेत बंदी असूनही एनव्हिडियाकडून असा पुरवठा झाला असे निष्पन्न झाले आहे. त्यामागे हुआंग यांचे एका महिलेशी असलेले प्रकरण कारणीभूत आहेत.

### एआयवरील ताब्यासाठी धडपड

२०२१नंतर एआय क्षेत्राने एकदम उसळी घेतली. विशेष म्हणजे यामधील सर्व प्रमुख कंपन्या अमेरिकी होत्या. आज सर्वत्र वापर होणाऱ्या चॅट जीपीटी निर्मिती करणारी ओपन एआय, क्लॉड या एआयची निर्मिती करणारी एंथ्रोपिक आणि एनव्हिडिया यांनी यातील वेगवेगळ्या तंत्रज्ञानात भरारी घेतली. शिवाय मायक्रोसॉफ्ट, गुगल, एपल, अमेझॉन आणि मस्कची स्पेस एक्स वगैरे कंपन्याही यात उतरल्या. सध्या जगातील सर्व प्रकारच्या उत्पादन क्षेत्रात व तंत्रज्ञानातही चीनने अमेरिकेला पाठीमागे टाकल्याचे वातावरण होते. एआयच्या भरारीनंतर ते वातावरण बदलले. चीनने डीपसीक एआय निर्माण करून जगाला हादरा दिला. पण अतिशक्तिशाली एआयच्या निर्मितीमध्ये व चिप किंवा जीपीयू तयार करण्यामध्ये अमेरिकी कंपन्या पुढे आहेत हे स्पष्ट झाले. त्यातून एनव्हिडिया किंवा एंथ्रोपिक या कंपन्यांच्या शेअर्सचे मूल्य आकाशदेखील फाडून वर गेले. आज या कंपन्यांना हजारो कोटींचे तोटे आहेत, त्यांच्यावर तितकेच प्रचंड कर्ज आहे, तरीही या कंपन्यांच्या शेअर्सना प्रचंड मागणी आहे. कारण येत्या काळात या कंपन्यांच्या उत्पादनांनी जग बदलून जाणार असून त्यांची मक्तेदारी तयार होणार आहे असे एक सार्वत्रिक मत तयार झाले आहे. कोविडनंतरच्या काळात चीनकडून होणाऱ्या आयातीवर बंदी घालावी असा एक प्रवाह जगभर होताच. एआयच्या आगमनानंतर चिप वगैरेंचे तंत्रज्ञान किंवा सामग्री चीनला निर्यात करता कामा नये या विचाराने उसळी घेतली. डोनाल्ड ट्रम्प यांनी २०२२ मध्ये तशी बंदी घातली. त्यामुळे चीनची चांगलीच कोंडी झाली. पण अशा कोणत्याही बंदीनंतर तस्करी करणाऱ्यांचे फावत असते. त्यानुसार अमेरिकेतून चोरून किंवा कोणत्या अन्य मार्गांनी हे तंत्रज्ञान व वस्तू आयात करता येतील का अशा वाटा शोधल्या गेल्या. एनव्हिडियातील भानगड त्यातूनच झाली.

### ट्रम्प यांचे मित्र, तरीही पाळत

जेन्सन हुआंग हे एनव्हिडियाचे संस्थापक व सीईओ. मायकेल जॅक्सनसारखे वलय त्यांच्याभोवती आहे. एआयमुळे कर्करोग, स्मृतीभंश वगैरे रोगांवर मात केली जाऊ शकते, म्हातारपण दूर ठेवून भविष्यात कदाचित अमरत्वही प्राप्त होऊ शकते अशा काहींच्या कल्पना आहेत. त्यामुळे त्या कंपनीच्या चालकाला असे सेलिब्रिटीचे स्टेटस मिळावे हे स्वाभाविक आहे. हुआंग हे कायम लेदर जाकिट घालून वावरतात. त्यांच्या जाकिटाचा मध्यंतरी लिलाव केला तर त्यालाही लाखो डॉलर्स मिळाले. तरुणतरुणी आपल्या हातांवर त्यांच्या सह्या घेतात. हे हुआंग ट्रम्प यांच्याही भलतेच जवळचे आहेत. मे महिन्यात ट्रम्प चीनच्या दौऱ्यावर गेले तेव्हा हुआंग ट्रम्प यांच्यासोबतच्या शिष्टमंडळात नव्हते. त्यांना खास विमान पाठवून बोलावले गेले. चिपच्या निर्यातीवर अमेरिकेने बंदी घातल्यावर चीनने थेट याच हुआंग यांनाच जाळ्यात खेचण्याचे कारस्थान आखले. हुआंग यांचा जन्म तैवानची राजधानी तैपेई इथला आहे. तैवान हा चीनचा शत्रू आहे. चीनपेक्षा तो स्वतंत्र अस्तित्व राखू इच्छितो. चीन मात्र तैवानला आपलाच हिस्सा आहे असे मानतो. तर अशा या हुआंग यांना वश करण्यासाठी एलेक्स हुआंग या चिनी तरुणीचा वापर करण्यात आला असा आरोप आहे. एलेक्स ही महिला पूर्वी चिनी सरकारी टीव्हीवर पत्रकार होती. नंतर तिने एचएसबीसी वगैरे बँकांमध्ये मोठ्या पदांवर काम केले. ती चीन सरकारसाठी हेर म्हणून काम करीत होती वा आहे असा आरोप आहे. जेन्सन यांच्याशी तिने प्रेमाचे संबंध जोडावेत व एनव्हिडियाकडून चिप मिळवाव्यात असा कट आखला गेला असा आरोप आहे. एलेक्स ही मेगास्पीड नावाच्या कंपनीसाठी काम करीत होती. त्या कंपनीने एनव्हिडियाकडून साडेसात अब्ज डॉलर किमतीच्या चिप मिळवल्या. मलेशियाच्या कंपनीने त्या खरेदी केल्या व त्या चिनी कंपन्यांना देण्यात आल्या असा संशय आहे. कोणतेही उत्पादन मिळाले की त्याचे विश्लेषण करून त्याच्यासारखे चिनी उत्पादन तयार करणे ही चीनची खासियत आहे. त्यामुळे लवकरच या चिपच्या आधारे चीनम ध्येही अत्याधुनिक शक्तिशाली चिप तयार होण्याची शक्यता आहे. अर्थात यात अतिप्रगत तंत्रज्ञान गुंतलेले असल्याने ते सोपे नाही. पण चीनचा आजवरचा झपाटा पाहता ते त्याला अशक्यही नाही. याचमुळे आता अमेरिकी सरकार जागे झाले आहे. जेन्सन हुआंग हे एकीकडे ट्रम्प यांचे दोस्त म्हणून मिरवत असले तरी अमेरिकी प्रशासनाने हुआंग यांच्यावर पाळत ठेवणे सोडले नव्हते. त्यातूनच त्यांचे प्रेमसंबंध आणि त्यातून झालेली हेरगिरी उघडकीस आली. न्यूयॉर्क टाईम्सने याबाबत ऑक्टोबर महिन्यापासून अनेक बातम्या दिल्या. तरीह ट्रम्प हे हुआंग यांचे समर्थन करीत राहिले. हुआंग यांना या ही महिला हेरगिरी करते आहे याची कल्पना नव्हती असे ट्रम्प व बाकीचे लोक म्हणतात. पण आपल्याकडून चूक झाली हे हुआंग यांना कळले आहे. त्यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. ट्रम्प यांना हा मोठा धक्का आहे. भारतात मोदींचे मित्र अदानी यांच्यावर हेरगिरीचे नसले तरी भ्रष्ट व्यवहाराचे बरेच आरोप आजवर झाले आहेत. पण त्यांची चौकशीही झालेली नाही. शिक्षा वगैरे तर खूपच दूरची गोष्ट. हा अमेरिका आणि भारत यांच्यातला महत्वाचा फरक आहे.

विचार

# उत्सवाचा उन्माद आणि मृत्यूचा सापळा

***कोलकात्यातील दुर्गापूजा मंडपात उसळलेल्या गर्दीमुळे घडलेली चेंगराचेंगरीची दुर्घटना केवळ अकस्मात घडलेला अपघात नसून व्यवस्थेच्या बेपर्वाईने ओढवून घेतलेला मानवनिर्मित अनर्थ आहे. दरवर्षी उत्सवाचे भव्यदिव्य स्वरूप, अफाट गर्दी आणि प्रशासकीय ढिसाळपणा यातून निरपराध लोकांचे बळी जातात. चौकशी समित्या नेमून तयार होणारे अहवाल धूळ खात पडतात आणि सुरक्षिततेच्या मूळ मुद्द्याकडे डोळेझाक होते.***



अजय तिवारी

धार्मिक श्रद्धा, सामाजिक उत्साह आणि कलेचा अभूतपूर्व मिलाफ म्हणून पश्चिम बंगालमधील दुर्गापूजेचा उत्सव जगभरात ओळखला जातो. कोट्यवधी भाविक या काळात कोलकात्याच्या रस्त्यांवर उतरतात. मंडपांची भव्यता, रोषणाई आणि देवीच्या दर्शनाची ओढ यामुळे शहर रात्रंदिवस जागे असते; परंतु याच उत्सवाच्या झगमगाटामागे दडलेला मृत्यूचा सापळा पुन्हा एकदा कोलकात्यातील एका नामांकित मंडपात उघडा पडला. अचानक वाढलेल्या गर्दीमुळे उसळलेली चेंगराचेंगरी, हवेअभावी गुदमरलेले वृद्ध आणि लहान मुले, तुडवले गेलेले नागरिक आणि अखेर निष्पाप जीवांची पडलेली प्रेते हे चित्र कोणत्याही सुसंस्कृत समाजाला शरमेने मान खाली घालायला लावणारे आहे. प्रश्न केवळ एका मंडपातील दुर्घटनेपुरता मर्यादित नाही, तर प्रत्येक मोठ्या सणावेळी माणसांचा जीव कवडीमोल मानणाऱ्या आपल्या सामाजिक आणि प्रशासकीय मानसिकतेचा हा अत्यंत भीषण पैलू आहे. दुर्गापूजा मंडपातील चेंगराचेंगरीच्या कारणांचा शोध घेतला, तर एक साचेबद्ध, वारंवार समोर येणारा नमुना स्पष्ट दिसतो. पहिला आणि मुख्य मुद्दा म्हणजे 'अवास्तव स्पर्धा'. अमुक एका मंडपाची प्रतिकृती जगातील सर्वोत्तम वास्तूवर आधारित आहे, देवीच्या दागिन्यांचे मूल्य कोट्यवधींचे आहे किंवा तेथील प्रकाशयोजना डोळे दिपवणारी आहे, असा आक्रमक प्रचार समाजमाध्यमांवरून आणि जाहिरातींमधून केला जातो. परिणामी, एकाच वेळी हजारो, लाखो लोक एका छोट्या गल्लीतील मंडपाच्या दिशेने धाव घेतात. काहीशे लोकांची क्षम ता असणाऱ्या रस्त्यांवर लाखांची गर्दी लोटल्यावर पायाभूत सुविधांचा पुरता बोजवारा उडतो आणि अशा भयानक दुर्घटना घडतात.

दुसरे कारण म्हणजे प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या मार्गांचे सदोष नियोजन. बहुतांश मंडपांम ध्ये प्रवेशद्वाराची भव्यता दाखवण्यासाठी भरपूर जागा वापरली जाते; परंतु बाहेर पडण्याचा मार्ग मात्र अरुंद, आडवळणी आणि अडथळ्यांनी भरलेला असतो. एका बाजूने गर्दीचा लोंढा भाविकांना आत ढकलत असतो आणि दुसऱ्या बाजूला बाहेर पडायला जागा नसते. अशा वेळी मंडपाच्या आत निर्माण होणारा प्रचंड दबाव, उष्णता आणि ऑक्सिजनची कमतरता यामुळे घबराट पसरते. कोणी तरी पडल्याची किंवा आग लागल्याची एक खोटी अफवा उठली तरी लोक स्वतःचा जीव वाचवण्यासाठी सैरावैरा धावू लागतात आणि त्यातून चेंगराचेंगरीची विनाशकारी मालिका सुरू होते. यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गर्दी नियंत्रणाची जबाबदारी कोणाच्या हातात असते, हेच उलगडत नाही. प्रत्यक्षात गर्दीचे मानसशास्त्र समजून घेणे, गर्दीच्या घनतेचे मोजमाप करणे आणि आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवणे हे अत्यंत तांत्रिक आणि वैज्ञानिक कौशल्य आहे; मात्र आपल्याकडे ही महाकाय जबाबदारी उत्सव मंडळांचे स्वयंसेवक आणि स्थानिक क्लबच्या कार्यकर्त्यांवर सोपवली जाते. या स्वयंसेवकांमध्ये उत्साहाची कमतरता नसते; पण त्यांच्याकडे गर्दी नियंत्रणाचे कसलेही औपचारिक प्रशिक्षण, अनुभव किंवा साधनसामग्री नसते. हातात शिट्टी आणि लाठी घेऊन उभे असलेले चार-पाच स्वयंसेवक दहा हजारांच्या अनिर्बंध गर्दीला नियंत्रित करू शकत नाहीत. उलट, संकटसमयी हेच स्वयंसेवक स्वतः घाबरून पळून जातात किंवा गोंधळ निर्माण करतात. अशा वेळी समन्वयाच्या अभावातून निष्पाप भाविक भरडले जातात.

भारतात धार्मिक स्थळांवर किंवा सार्वजनिक उत्सवांमध्ये चेंगराचेंगरी होण्याची ही पहिलीच वेळ नाही. भूतकाळातील घटनांची यादी अंगावर काटा आणणारी आहे. २००५ मध्ये महाराष्ट्रातील वाईजवळील मांढरदेवीच्या यात्रेत नारळ आणि तेल सांडल्याने घसरगुंडी होऊन झालेल्या चेंगराचेंगरीत सुमारे ३०० हून अधिक भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. २००८ मध्ये जोधपूरच्या चामुंडा देवी मंदिरात सुमारे २२० भाविक चेंगराचेंगरीमध्ये मरण पावले. त्याच वर्षी हिमाचल प्रदेशमधील नैनादेवी मंदिरात भूस्खलनाच्या अफवेमुळे १४० हून अधिक लोकांना प्राण गमवावे लागले होते. २०११ मध्ये केरळमधील सबरीमला येथे मकरज्योती दर्शनानंतर उसळलेल्या गर्दीत शंभराहून अधिक अय्यप्पा भक्त मारले गेले. २०१३ मध्ये मध्य प्रदेशातील दतिया येथील रतनगढ मंदिरात पुलावरील अफवेमुळे शंभरहून अधिक निष्पाप बळी गेले. अगदी अलिकडच्या काळात हाथरस येथील सत्संगात किंवा मुंबईत रेल्वेपुलावर झालेली चेंगराचेंगरी, वैष्णोदेवी मंदिर संकुलातील दुर्घटना अशा अनेक घटना देशाच्या स्मरणात अजूनही ताज्या आहेत. प्रत्येक दुर्घटनेनंतर एक ठरलेली 'सरकारी पद्धत' समोर येते. मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान शोक व्यक्त करतात, मृतांच्या नातेवाइकांना दोन-पाच लाख रुपयांची आर्थिक म दत जाहीर केली जाते, विरोधक राजीनाम्याची मागणी करतात आणि शेवटी एका निवृत्त न्यायाधीशांची किंवा वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची चौकशी समि ती स्थापन केली जाते. काही महिन्यांनी ही समिती शेकडो पानांचा अहवाल सादर करते.

समितीच्या अहवालांमध्ये अत्यंत स्पष्ट आणि अंमलबजावणीयोग्य अशा सूचना असतात. त्यात गर्दीची कमाल मर्यादा निश्चित करणे, एकाच वेळी लोकांचा भार एकाच बिंदूवर पडणार नाही हे लक्षात घेऊन बॅरिकेडिंग करणे, प्रवेश आणि निर्गमन मार्गांचे गुणोत्तर वैज्ञानिक नियमांनुसार ठेवणे, पुरेशी प्रकाशयोजना, सीसीटीव्ही देखरेख आणि ध्वनिक्षेपकावरून सातत्याने दिल्या जाणाऱ्या शांततापूर्ण सूचना, प्रत्येक मोठ्या उत्सवासाठी स्वतंत्र आपत्कालीन वैद्यकीय केंद्र आणि रुग्णवाहिकांची निर्धोक वाट, मंडप बांधणीसाठी अग्निशामक आणि संरचनात्मक सुरक्षिततेचे काटेकोर ऑडिट आदींचा समावेश असतो. दुर्भाग्य असे, की चौकशी समित्यांचे हे अहवाल लाल फितीच्या कारभारात आणि सरकारी कपाटांच्या अंधारात धूळ खात पडून राहतात. म ाढरदेवी दुर्घटनेनंतर न्या. राजन समितीने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची शंभर टक्के अंमलबजावणी आजही सर्व यात्रांमध्ये होताना दिसत नाही. कोणतीही दुर्घटना घडल्यावर काही दिवस प्रशासकीय पातळीवर खळबळ उडते, नियमांची भाषा बोलली जाते; परंतु सण संपला किंवा जनमानसातील संताप ओसरला, की पुन्हा सर्व काही 'जैसे थे' होते. नियमांची पायमल्ली करणाऱ्या आयोजकांवर कठोर कायदेशीर कारवाई होत नाही. राजकीय वरदहस्त आणि मतांचे राजकारण यामुळे स्थानिक उत्सव मंडळांच्या दबावापुढे स्थानिक प्रशासन, महापालिका आणि पोलीस गुडघे टेकतात. सुरक्षिततेच्या परवानग्या केवळ कागदोपत्री स्वाक्षऱ्यांपुरत्या मर्यादित राहतात.

या साऱ्यात सर्वात मोठी समस्या आहे ती कोणत्याही घटनेतून बोध न घेण्याच्या उदासिन वृत्तीची. ही वृत्ती केवळ राज्यकर्त्यांची किंवा पोलिसांचीच आहे असे नाही, तर सर्वसामान्य नागरिक म्हणून आपणही त्याला तितकेच जबाबदार आहोत. आपल्या समाजात 'सार्वजनिक शिस्त' या संकल्पनेचा प्रचंड दुष्काळ आहे. रांगेत उभे राहणे, स्वतःच्या पाळीची वाट पाहणे, समोरील व्यक्तीला धक्का न मारणे, वृद्ध आणि बालकांना मार्ग करून देणे या मूलभूत नागरी कर्तव्यांचा आपल्याला विसर पडतो. दर्शनाची घाई, सेल्फी काढण्याचा अट्टाहास, 'व्हीआयपी' संस्कृतीचा हव्यास आणि 'मला आधी कसे मिळेल' ही चढाओढ गर्दीतील ताण वाढवते. लाऊडस्पीकरवरून एखादी सूचना दिली जात असताना सर्रास दुर्लक्ष केले जाते. आपण स्वतःच्या आणि इतरांच्या जिवाची किंमत समजायला तयार नाही. धार्मिक उत्सव आणि परंपरा या मानवी जीवनात उत्साह, सद्भावना आणि सामाजिक ऐक्य आणण्यासाठी असतात. निष्पाप रक्ताचे सडे शिंपडण्यासाठी नाहीत. ईश्वराचे दर्शन घेण्यासाठी निघालेला भाविक व्यवस्थेच्या बेपर्वाईमुळे प्रेत बनून घरी परतणार असेल, तर अशा उत्सवी भव्यतेला आणि दिखाऊपणाला काहीही अर्थ उरत नाही. कोलकात्यातील ही चेंगराचेंगरी ही व्यवस्था, आयोजक आणि समाजासाठी आणखी एक धोक्याची घंटा आहे. आता केवळ शोक व्यक्त करून किंवा मृतांच्या वारसांना नुकसानभरपाई देऊन चालणार नाही. उत्सव मंडळांना अमर्याद गर्दी गोळा करण्यापासून रोखणारे कायदे हवेत.

यापुढे गर्दी नियंत्रण हा पोलिसांच्या अतिरिक्त कामाचा भाग न राहता व्यावसायिक, प्रशिक्षित आपत्ती व्यवस्थापन पथके तैनात केली गेली पाहिजेत. क्षम तेपेक्षा जास्त गर्दी खेचून सुरक्षिततेचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या आयोजकांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल झाले पाहिजेत. जबाबदारी निश्चित होत नाही आणि निष्काळजीपणाला कठोर शिक्षा मिळत नाही, तोपर्यंत अशा मानवनिर्मित हत्याकांडांची पुनरावृत्ती थांबणार नाही. गेलेल्या बळींमधून आपण कधी तरी शहाणपण शिकणार आहोत, की पुढच्या सणात आणखी काही निष्पापांच्या मृत्यूची वाट पाहणार आहोत, याचे उत्तर समाजाने आणि व्यवस्थेने तातडीने शोधण्याची गरज आहे.

चर्चा आजची

# अल्प पटसंख्येमुळे जिल्हा परिषदेच्या शाळा संकटात



अंतरा पारंगे

आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी शहरी भागात आपल्या मुलांना इंग्रजी शाळांमध्येच घालण्याचा पालकांचा मोठ्या प्रमाणात कल असतो. मात्र हा कल आता शहरी भागापुरता मर्यादित राहिला नसून ग्रामीण भागातही याचे प्रमाण वाढले आहे. आणि हे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील घटलेल्या पटसंख्येवरून दिसून येत आहे. इंग्रजी शाळेला अधिक पसंती मिळत असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्या कमी होत चालली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मराठी शाळासमोर बंद होण्याचे संकट उभे राहिल्याचे दिसून येत आहे.

एकेकाळी जिल्हा परिषदेच्या या मराठी शाळा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून जात होत्या. मात्र आज आपल्या मुलांना खासगी इंग्रजी शाळांमध्ये घालण्याचा पालकांचा कल वाढत चालल्याने विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने घटत असून अनेक जिल्ह्यांतील शाळांमध्ये पटसंख्या वीसपेक्षा कमी झाल्याचे चित्र आहे.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्याचा कल आता केवळ शहरी भागांपुरता मर्यादित राहिला नसून ग्रामीण भागातही इंग्रजी शाळांना पसंती दिली जात आहे. सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, यासाठी सरकारी पातळीवर विविध प्रकारच्या योजना राबवण्यात येत असल्या तरी, ग्रामीण भागात याचा फारसा परिणाम दिसून आलेला नाही. याउलट इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढत असल्यामुळे इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील ग्रामीण भागात वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांच्या पटसंख्येत देखील घट झाल्याचे दिसून येत आहे. इंग्रजी शाळेला अधिक पसंती मिळत असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी ही धोक्याची घंटा मानली जात आहे.

इंग्रजी शाळेकडे असणारा ओढा हा भाषेमुळे असावा. कारण इंग्रजी शिकल्याने पुढे अनेक संधी निर्माण होतात, मराठीतून शिकून पुढे संधी मिळत नाहीत, हे मराठी लोकांच्या डोक्यात घट्ट रुजले आहे. म्हणून मध्यमवर्गीय सोडा गरीब घरातील मुलांनाही त्यांचे पालक कसोशीने प्रयत्न करून, दिवस रात्र राबून परिस्थिती नसतानाही इंग्रजी शाळेत टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. तेव्हाचा काळ वेगळा होता. आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. स्पर्धा नव्हती. आम्हाला अशी संधी नव्हती. तर मग आता तुमची आर्थिक परिस्थिती बदलवून देणारी शाळा कोणती? तेव्हा मराठी शाळांना खरंतर पर्यायच नव्हता. आणि आज पर्याय झालेल्या इंग्रजी शाळांमध्ये राज्याची मातृभाषा मराठीची अवस्था काय आहे. तर तिथे एक मराठी विषय शिकवला जातो, तोही अनिवार्य आहे म्हणून! त्या मराठी विषयाला पण इतका सोपा समजला जातो की तो विषय कोणीही शिक्षक शिकवून घेईल.

स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी आपल्यापैकी बहुतेक जण आज आपल्या पाल्यांना मराठी शाळांमध्ये शिकवण्यास अजिबातच इच्छुक नाहीत. कारण काय तर मराठी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा कमी प्रतीचा असतो हा त्यांचा गैरसमज. खर तर आपल्या मुलांना कोणत्या शाळेत घालावे हा पालकांचा निर्णय असतो. शासन पालकांवर मराठी माध्यमात मुलांना घाला म्हणून जबरदस्ती करू शकत नाही. आजही शासन-अनुदानित मराठी शाळांमध्ये वर्षाचे शुल्क अत्यल्प आहे. तरीही मराठी पालक आपल्या मुलांना हजारो रुपये भरून इंग्लिश माध्यमांच्या शाळांमध्ये घालतात. मुलांनी इंग्रजी भाषेच शिक्षण घेतलेच पाहिजे. पण इंग्रजी भाषेसाठी त्याला फक्त इंग्लिश शाळांमध्ये घालने चुकीचे आहे. जिल्हा परिषद शाळा या ग्रामीण समाजाच्या शैक्षणिक विकासाचा कणा आहेत. या शाळांमधून ग्रामीण आणि दुर्गम भागातील हजारो मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध होते. शाळेची पटसंख्या कमी आहे, हा निकष प्रमाण मानला तर ग्रमीण भागासह आदिवासी क्षेत्रातील शाळा बंद होतील. परिणामी गरजू, गरीब बालकांना शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येईल. कारण इतक्या लहान वयातील गरिबांची मुलं बाहेर शिक्षणाकरीता जाऊ शकत नाही. आणि विशेष म्हणजे त्यांना ते परवडणारही नाही.

जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढावी, यासाठी शासनस्तरावरुन विविध कार्यक्रम राबवण्यात येतात. यासोबतच शाळांमध्ये विद्यार्थी टिकून राहावा, यासाठी विद्यार्थ्यांना गणवेशापासून ते पाठ्यपुस्तक व माध्यान्ह भोजन आदी पुरवण्यात येते. मात्र, यानंतरही जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढण्याचे नाव घेत नाही. तर अनेक मराठी शाळांनी डिजिटल साधनांचा वापर सुरू केला आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विज्ञान प्रदर्शन, क्रीडा उपक्रम यामुळेही काही शाळांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. सेमी-इंग्रजीचा पर्याय देऊन काही शाळा पालकांचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र तरीही पालकांचा कल इंग्रजी शाळांकडे झुकलेला दिसत आहे.

लोकसंसद

## महाराष्ट्रात वाढती सायबर गुन्हेगारी चिंताजनक!

एकीकडे डिजिटल क्रांतीमुळे आर्थिक व्यवहार सोपे आणि सुलभ झाले असताना दुसरीकडे सायबर गुन्हेगार याचा मोठ्या प्रमाणात गैरफायदा घेऊन लोकांना लुटत आहेत. महाराष्ट्र सायबर विभागाच्या नोंदींनुसार २०२६ च्या ऑगस्ट महिन्याअखेरीस महाराष्ट्रात सायबर गुन्हेगारांनी लोकांची २,११९.६९ कोटी रुपयांची फसवणूक केली. म्हणजेच सायबर चोरांनी सर्वसामान्यांच्या कष्टाच्या पैशावर दररोज सरासरी ८.७२ कोटींचा डल्ला मारला. विशेष म्हणजे यात केवळ अशिक्षित तसेच तंत्रज्ञान अज्ञानी लोकच अडकतात असे नाही, तर सुशिक्षित आणि उच्चपदस्थ नागरिकही डिजिटल अरेस्ट, शेअर बाजारातील जादा परताव्याचे आमिष, बनावट कस्टमर केअर नंबर, केवायसी अपडेटचे बनावट मेसेज आणि फसव्या लिंक्सला बळी पडत आहेत. अशा चिंताजनक परिस्थितीत सायबर गुन्हेगारीचा वाढता आलेख पाहता आपली तपास यंत्रणा आणि संबंधित कायदे अधिक कडक करण्याची गरज आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात अद्ययावत तंत्रज्ञानाने सज्ज असा सायबर कक्ष कार्यान्वित करण्याची गरज आहे. आर्थिक फसवणूक झाल्यानंतर 'गोल्डन अवर'मध्ये म्हणजे पहिल्या काही तासांतच बँक खाती गोठवण्याची प्रक्रिया अधिक वेगवान होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सरकारने शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक स्तरावर सायबर सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबवणे गरजेचे आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# क्रांतीगुरू वस्ताद लहुजी साळवे!

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास लिहिताना अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांचे योगदान आपण अभिम ानाने सांगतो. मात्र, या क्रांतिकारकांना शस्त्रविद्येचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये देशभक्तीची ज्योत पेटविणारे क्रांतीगुरू वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. १४ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिन. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे ही आपली जबाबदारी आहे.

वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत), तर आईचे नाव विठाबाई होते. लहुजींचा जन्म शूरवीरांच्या घराण्यात झाला होता. त्यांच्या पूर्वजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात पराक्रम गाजविला होता. त्यांचे वडील राघोजी साळवे हे पेशव्यांच्या काळात शिकारखान्याशी संबंधित प्रमुख पदावर कार्यरत होते. लहानपणापासूनच लहुजींना शस्त्रविद्या आणि युद्धकलेचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे ते घोडेस्वारी, दांडपट्टा, तलवारबाजी, भालाफेक, बंदूक चालविणे आणि गनिमी कावा अशा विविध युद्धकौशल्यांत पारंगत झाले. त्यांच्या अंगी असलेले धैर्य, शौर्य आणि लढाऊ वृत्ती यामुळे ते पुढे वस्ताद म्हणून प्रसिद्ध झाले. ५ नोव्हेंबर १८१७ रोजी इंग्रज आणि पेशव्यांच्या सैन्यामध्ये खडकी येथे घनघोर युद्ध झाले. या युद्धात लहुजींचे वडील राघोजी साळवे सहभागी झाले होते. या संघर्षात त्यांना वीरमरण आले, असे त्यांच्या चरित्रात नमूद केले जाते. वडिलांच्या निधनाने लहुजींच्या मनावर मोठा आघात झाला. इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध लढण्याचा निर्धार त्यांनी केला. आपल्या वडिलांच्या बलिदानातून प्रेरणा घेत त्यांनी देशासाठी जगण्याची आणि देशासाठीच मरण्याची प्रतिज्ञा केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यालाही त्यांनी मोलाचे सहकार्य केले. स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन आणि सामाजिक समतेच्या कार्यात त्यांनी फुले दाम्पत्याला पाठिंबा दिला. महात्मा फुले यांच्या कार्याला विरोध होत असताना लहुजी आणि त्यांच्या अनुयायांनी त्यांना संरक्षण दिले. त्यामुळे लहुजींच्या व्यक्तिमत्त्वातील सामाजिक बांधिलकीही अधोरेखित होते.

इंग्रजांच्या अन्यायकारक सत्तेविरुद्ध देशभर असंतोष वाढत असताना लहुजी साळवे यांनी तरुणांमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत करण्याचे काम सुरू ठेवले. त्यांच्या तालमीतून अनेक तरुणांनी युद्धकलेचे प्रशिक्षण घेतले. उमाजी नाईक आणि वासुदेव बळवंत फडके यांसारख्या क्रांतिकारकांच्या कार्याला त्यांनी सहकार्य केले, असे ऐतिहासिक संदर्भांत नमूद केले जाते. १८५७ च्या स्वातंत्र्यसमराच्या पार्श्वभूमीवरही त्यांच्या कार्याचा उल्लेख आढळतो. लहुजी साळवे यांनी आयुष्यभर देशभक्ती, स्वाभिमान आणि सामाजिक समतेचा विचार जपला. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमवाडी परिसरात त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा देणारे एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. आज आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करून

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ नोव्हेंबर

१) श्रीम. कांती कृष्णानंद नायक, अलिबाग
१४-११-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

आजचे अन्नदाते



**स्व. सौ कलावती भवानजी देढिया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**

**कै. गणपत हरी घरत, स्मरणार्थ अलिबाग**

**मृणाली म्हात्रे, अलिबाग**

# जेएनपीए परिसरात वाहतूक कोंडी

## ■ सामान्य प्रवाशांचे प्रचंड हाल, याड्र्सबाहेर १२ ते २४ तास वाहनांच्या रांगा

**। उरण । प्रतिनिधी ।**

जेएनपीए बंदर परिसरातील एम्प्टी कंटेनर याड्र्समध्ये गेल्या काही दिवसांपासून वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून, येथील याड्र्सबाहेर १२ ते २४ तासांपर्यंत लांबच लांब ट्रॅफिक जाम लागत असल्याचे चित्र समोर आले आहे. या भीषण वाहतूक कोंडीमुळे कंटेनर चालक, मालवाहतूकदार व सामान्य प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.




जेएनपीटी आणि लगतच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर असलेल्या एम्प्टी कंटेनर याड्र्समध्ये वाहनांची ने-आण करताना योग्य नियोजन व शिस्तीचा पूर्णपणे अभाव दिसून येत आहे. बंदर व कंटेनर हाताळणी प्रणालीतील विस्कळीत कारभारामुळे वाहनचालकांना तासनतास रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे. अन्न, पाणी आणि मूलभूत सुविधांविना तासंतास कोंडीत अडकून पडल्यामुळे चालकांना मानसिक व शारीरिक त्रासाचा सामना करावा लागत आहे.

याड्र्समधील ढिसाळ व्यवस्थापनाचा मोठा फटका उरण व जेएनपीटी परिसरातील स्थानिक रस्ते वाहतुकीलाही बसत आहे. महामार्गांवर व अंतर्गत रस्त्यांवर कंटेनरच्या लांबच लांब रांगा लागल्यामुळे स्थानिक नागरिक व दिवाळीनिमित्त प्रवासासाठी बाहेर पडणाऱ्या प्रवाशांची मोठी कोंडी होत आहे. या समस्येमुळे मालवाहतूक व्यवसायाचे मोठे आर्थिक नुकसान होत असून वेळेवर कंटेनर न पोहोचल्यामुळे औद्योगिक व लॉजिस्टिक क्षेत्रालाही फटका बसत आहे.

तालुक्यातील जेएनपीए बंदर, विविध औद्योगिक कंपन्या आणि वाढत्या व्यावसायिक हालचालींमुळे उरण परिसरात वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बंदराशी संबंधित अवजड वाहने, कंटेनर ट्रेलर, मालवाहू ट्रक तसेच खासगी वाहनांची मोठी वर्दळ रस्त्यांवर असते. मात्र, वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांची क्षमता पुरेशी नसल्याने अनेक ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

विशेषतः बंदराकडे जाणारे मार्ग, औद्योगिक क्षेत्रातील रस्ते तसेच शहर आणि ग्रामीण भागाला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. याचा फटका स्थानिक नागरिक, नोकरदार वर्ग, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना बसत आहे.

अनेकदा वाहतूक कोंडीमुळे प्रवासासाठी अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागत असून, मालवाहतुकीवरही परिणाम होत आहे. संबंधित यंत्रणांचे अद्यापही मौन एकीकडे नागरिक आणि चालक तासनतास ट्रॅफिकमध्ये अडकलेले असताना, जेएनपीटी प्रशासन व संबंधित यंत्रणा अद्यापही या प्रकरणावर मौन बाळगून असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### पर्यायी मार्गांची आवश्यकता

उरण तालुक्यात औद्योगिक आणि बंदरविकासाबरोबरच पायाभूत सुविधांचा विकास होणे आवश्यक आहे. वाढत्या वाहतुकीचा विचार करून प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण, पर्यायी मार्गांची निर्मिती आणि अवजड वाहनांसाठी स्वतंत्र वाहतूक नियोजन करणे गरजेचे आहे. तसेच वाहतूक पोलिसांची प्रभावी यंत्रणा कार्यान्वित करून कोंडीच्या ठिकाणी योग्य नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. बंदर आणि औद्योगिक विकासाला पूरक रस्ते व्यवस्था उभारणे ही काळाची गरज बनली आहे.

## माणुसकी प्रतिष्ठानतर्फे आकाश कंदिलांचे वाटप

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि आपुलकीचा सण मात्र, सणाचा हा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा यासाठी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था आणि माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सौरभ पाटील यांच्या सौजन्याने अलिबाग येथील गजरे विक्रेते बांधवांना आकाशकंदिलांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी



उज्ज्वला चव्हाण, डॉ.नितीन गांधी, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.



**अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील शिवप्रेमी अजिंक्य राजेंद्र म्हात्रे याने बनविलेला मुरुड जंजिरा किल्ल्यातील शंभू सेतू (छायाचित्र. सचिन पाटील)**

## पर्सची चोरी

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

खिशातून पर्स जबरदस्तीने हिसकावून घेऊन पळून गेल्याप्रकरणी अज्ञाता विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १२ ऑक्टोबर रोजी फिर्यादी अश्विनी मोकाशी आणि त्यांचे वडील हे पनवेल बस डेपो येथून पेण येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत होते. यावेळी अज्ञाताने फिर्यादी यांच्या वडिलांच्या पॅन्टच्या मागील खिशातील पर्स काढत असल्याचे त्यांना जाणवले. त्यांनी पर्स हातात काढून घेत असताना अज्ञाताने त्यांना धक्का दिला आणि हातातील पर्स जबरदस्तीने हिसकावून घेऊन तो पळून गेला.

## महिलांचे खड्ड्यात बसून आंदोलनाचे आयोजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथे असलेल्या रेल्वे पुलाच्या आजुबाजूला असलेल्या रस्त्यावरील खड्डे आणि साइड पट्ट्या भरण्यात यावेत अन्यथा १६ नोव्हेंबरपासून खड्ड्यात बसून आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीने सार्वजनिक बांधकाम खात्याला दिला आहे.

शनिवार-रविवार होणाऱ्या ट्रॅफिकमधून बाहेर पडण्यासाठी नागरीक बाजूच्या साइड पट्टीवरून जीव मुठीत घेऊन जात असतात. अशा परिस्थितीमध्ये अनेक छोटे-मोठे अपघातही



झालेले आहेत. परंतु यापुढे अशा अपघातग्रस्त वातावरणातून जाण्याची नागरिकांवर वेळ येऊ नये व वर्षानुवर्ष अशा असुरक्षित वाहतूक व्यवस्थेस सामोरे जावे लागू नये यासाठी आपण योग्य व त्वरित पावले उचलावीत अशी मागणी महिला आघाडीने केली आहे. अन्यथा खड्ड्यात बसून निषेध करण्यात येईल असा इशारा महिला आघाडीने कर्जत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनांना निवेदन देताना चित्रा ठाकरे, प्रमिला बोराडे, मंदा हाडप, दर्शना भोईर आदी महिला उपस्थित होत्या.

## माथेरानला पर्यायी वाहतुक व्यवस्थेची मागणी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये वास्तव्यास असणाऱ्या भूमिपुत्रांना आणि येणाऱ्या पर्यटकांना इथल्या वाहतूक व्यवस्थेच्या त्रासामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यासाठी इथल्या वाहतूक व्यवस्थेत वाढ झाल्याशिवाय इथले पर्यटन बहरणार नाही. तसेच स्थानिक भूमिपुत्र सर्वंकष दृष्टीने सक्षम होऊ शकत नाही. याकामी पर्यटन मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांनी या स्थळाकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी आता जोर धरू



लागली आहे. जोपर्यंत माथेरानला पर्यायी व्यवस्था निर्माण होत नाही तोपर्यंत हे स्थळ अन्य स्थळांच्या तुलनेत खूपच पिछाडीवर जाणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सर्वतोपरी विकासासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## बांधकाम उंचीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सिडकोची धडपड

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरातील बांधकामांवर उंचीच्या मर्यादांचा परिणाम होत असताना सिडकोने या प्रश्नावर महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नवी मुंबईतील विविध भूखंडांसाठी विमानतळ प्राधिकरणाकडून बांधकामाची अनुमत उंची निश्चित करून घेण्यासाठी तसेच अतिरिक्त उंचीची परवानगी मिळविण्यासाठी अपील करण्याकरिता सिडकोने सल्लागार नेमण्याची निविदा प्रसिद्ध केली आहे. (दि.९) नोव्हेंबर रोजी ही निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून, १० डिसेंबर २०२६ ही निविदा सादर करण्याची अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. या कामासाठी सिडकोच्या नियोजन विभागामार्फत प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर विमानांच्या सुरक्षित उड्डाण आणि उतरविण्याच्या दृष्टीने परिसरातील बांधकामांच्या उंचीवर मर्यादा निश्चित केल्या जातात. त्यामुळे काही भूखंडांवर अपेक्षित उंचीचे बांधकाम करताना अडचणी निर्माण होऊ शकतात.

## पनवेलमध्ये अंत्यसंस्कार सुविधांचा विस्तार

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने दोन नवीन गॅस शवदाहिन्या उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पालिकेने सुमारे १ कोटी ७० लाख २३ हजार रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. या कामामुळे अमरधाममधील अंत्यसंस्कार सुविधांमध्ये वाढ होण्याची अपेक्षा आहे.

अमरधाम स्मशानभूमीतील प्लॉट क्रमांक १०६ येथे या दोन



गॅस शवदाहिन्यांचे बांधकाम, पुरवठा आणि उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी पालिकेच्या अभियांत्रिकी विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. निविदेनुसार संबंधित कंत्राटदाराला काम पूर्ण करण्यासाठी २७० दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

दरम्यान अमरधाम स्मशानभूमीतील गॅस शवदाहिनीच्या सुविधांबाबत यापूर्वीही पालिकेने निविदा काढली होती. सप्टेंबर महिन्यात नादुरुस्त गॅस शवदाहिनी बदलण्यासंदर्भात स्वतंत्र निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामुळे आता नव्याने दोन गॅस शवदाहिन्या उभारण्याची गरज का निर्माण झाली आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि अंत्यसंस्कारासाठी उपलब्ध सुविधांची गरज लक्षात घेता या प्रकल्पाचे महत्त्व वाढले आहे. मात्र, निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष काम कधी सुरू होते आणि निर्धारित मुदतीत ते पूर्ण होते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**सफाई कर्मचाऱ्यांनी बजावली चोख कामगिरी** | **पाच दिवसांत ४४३ मेट्रिक टन कचरा गोळा**

# दिवाळीत मुंबईत कचऱ्याचे डोंगर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईकर दिवाळीचा सण कुटुंबीयांसोबत आनंदात साजरा करत असताना दुसरीकडे मुंबई महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी मात्र, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र कर्तव्यावर होते. दिवाळीच्या पाच दिवसांत शहरात नेहमीच्या तुलनेत तब्बल ४४३ मेट्रिक टन अतिरिक्त कचरा निर्माण झाला. ७ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत महापालिकेने एकूण ३६ हजार ४४५.०६ मेट्रिक टन घनकचऱ्याचे संकलन करून त्याची वाहतूक केली.

दिवाळीच्या काळात फटाक्यांचा कचरा, भेटवस्तूंचे खोके, पॅकेजिंग साहित्य तसेच बाजारपेठा आणि सार्वजनिक



ठिकाणी निर्माण होणाऱ्या अतिरिक्त कचऱ्यामुळे स्वच्छता यंत्रणेवर मोठा ताण आला होता. मात्र, सफाई कामगार, वाहनचालक, मदतनीस, पर्यवेक्षक आणि कचरा वाहतूक विभागातील कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी चोख बजावली.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार, या पाच दिवसांत ६ हजार ७८७ वाहनफेऱ्यांद्वारे कचऱ्याची वाहतूक करण्यात आली. ऑक्टोबर महिन्यातील दररोजच्या सरासरी ७ हजार २००.४० मेट्रिक टन कचरा संकलनाचा विचार करता, पाच दिवसांत ३६ हजार २ मेट्रिक टन कचरा अपेक्षित होता. प्रत्यक्षात त्यापेक्षा सुमारे ४४३ मेट्रिक टन अधिक कचरा जमा झाला.

सणाच्या काळातही कर्तव्य बजावणाऱ्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या समर्पणाचे महापालिका प्रशासनाने कौतुक केले आहे. दरम्यान, नागरिकांनी ओला आणि सुका कचरा वेगळा करावा, कचरा अधिकृत कर्मचाऱ्यांकडेच द्यावा तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे आणि जाळणे टाळावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे. ७ नोव्हेंबरला सर्वाधिक कचरा दिवाळीच्या कालावधीत ७ नोव्हेंबर रोजी सर्वाधिक ७ हजार ८१०.२६ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

### स्वच्छता कर्मचाऱ्यांचे कौतुक

७ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत महापालिकेने एकूण ३६ हजार ४४५.०६ मेट्रिक टन घनकचऱ्याचे संकलन करून त्याची वाहतूक केली. दिवाळीच्या काळात रस्ते सफाई, घरोघरी कचरा संकलन, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि कचऱ्याची नियोजित केंद्रांपर्यंत वाहतूक या सेवा अखंडित सुरू ठेवण्यात आल्या.

## निवडक

### मुलींचे स्वसंरक्षण प्रशिक्षण शाळांमध्ये कधी?

**मुंबई :** मुलींच्या सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्याच्या योजना आखल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. कराटे, ज्युदो यांसारख्या प्रशिक्षणासाठी दरवर्षी लाखो रुपयांच्या निधीची तरतूद करूनही अनेक शाळांमधील विद्यार्थिनी या प्रशिक्षणापासून वंचित आहेत. शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यातील शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मुलींना कराटे आदी स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यासाठी स्वतंत्र योजना राबविली जाणार आहे., गेल्या काही वर्षांत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याच्या



तक्रारी आहेत. प्रशिक्षकांची उपलब्धता, नियमित प्रशिक्षण सत्रे आणि निधीचा विनियोग याबाबतही स्पष्टता नसल्याने योजनेचा लाभ प्रत्यक्ष किती विद्यार्थिनींपर्यंत पोहोचतो, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मुलींच्या सुरक्षिततेचा महत्त्वाचा विषय सरकारी परिपत्रके आणि कागदोपत्री योजनांपुरताच मर्यादित राहिला आहे. दिवाळीच्या सुट्टीनंतर मुंबईतील शाळांमध्ये या प्रशिक्षणाची अंमलबजावणी करण्यावर शिक्षण विभागाने लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याची मागणी पालकांची आहे.उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचीही स्वसंरक्षण प्रशिक्षणाबाबत उपेक्षा होत असल्याचा मुद्दा पुढे आला आहे. मुंबई आणि परिसरातील विद्यापीठे तसेच उच्च व तंत्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थिनींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची मागणी कॉप्स संघटनेने केली होती. या मागणीची दखल घेत उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.



### लायन्स क्लबतर्फे वारकऱ्यांचा गौरव

**कोलाड :** कोलाड लायन्स क्लबच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य सेवाभावी उपक्रम राबवण्यात आला. खांब ते पंढरपूर या पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकरी संप्रदायातील भाविकांना क्लबच्यावतीने गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे, खांब ते पंढरपूर या पायी दिंडीची तब्बल ४५ वर्षांची गौरवशाली परंपरा असून, आजही वारकऱ्यांकडून ही परंपरा अत्यंत निष्ठेने आणि अविरतपणे सुरू ठेवण्यात आली आहे. या वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल कोलाड लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच, भविष्यातही अशाच प्रकारचे समाजोपयोगी आणि सेवाभावी उपक्रम सातत्याने राबवण्याचा संकल्प आयोजकांकडून यावेळी करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. श्याम लोखंडे, नरेश बिरगावले, नंदकुमार कळमकर, अलंकार खांडेकर, राजेंद्र कोप्पू, संदीप माने, पूजा लोखंडे, सदानंद जाधव, कृष्णकांत धनवी, अजय पार्टे , प्रकाश थिटे, अप्पा जाधव, नथुराम जाधव, राम लोखंडे, राधिका लोखंडे, शुभांगी महाडीक, चंद्रकात जाधव, तुकाराम महाडिक, होनाजी कोल्हटकर, शांताराम महाडीक, वारीतील सर्व भाविकांनी परिश्रम घेतले.



### पुई स्टॉपचा गतिरोधक ठरतोय धोकादायक

**कोलाड :** मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील पुई स्टॉप जवळ बसविण्यात आलेले गतिरोधक हे वेगाची नशा अपघाताचे कारण ठरत आहे. या गतिरोधकामुळे दिवाळीच्या सात दिवसात तीन-चार अपघाता झाले आहेत. या अपघातात सुदैवाने कोणतेही जिवीत हानी झाली नाही. परंतु येथील अपघात टाळण्यासाठी येथे रस्त्याला सिग्नल लावण्यात यावे व याशिवाय गतिरोधकाला पांढरे पट्टे लावणे गरजेचे आहे. अन्यथा यामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे. मुंबई-गोवा महामार्गांवरील पुई स्टॉप जवळ अपघात टाळण्यासाठी गतिरोधक बसविणे गरजेचे होते. महामार्गावरील पुई स्टॉप जवळ रस्त्याच्या दोन्ही बाजूला गतिरोधक होते. या गतिरोधकामुळे अपघातात दोन ते तीन जणांचे बळी गेले यामुळे एका बाजूचे गतिरोधक काढून टाकण्यात आले आहेत परंतु कोलाड बाजूकडून मुंबई बाजुकडे जाणारी वाहने पुई येथील महिसदरा पुलावरून पुई स्टॉप कडे जाताना स्टॉप जवळ उतार असल्यामुळे व गतिरोधकाला पांढरे पट्टे नसल्याने येथील गतिरोधक दिसत नाही. यामुळे वाहन चालकांना वाहनांना नियंत्रण मिळवणे कठीण जात असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून गतिरोधकाला पांढरे पट्टे लावण्यात यावे तसेच इतर उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

### तळ्यात किल्ले बांधणी स्पर्धा उत्साहात

**तळा :** छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गड-किल्ल्यांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी त भव्य किल्ले बांधणी व सुबक रांगोळी स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. या उपक्रमाला बालगोपाळ, तरुण वर्ग आणि महिला भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. किल्ले बांधणी स्पर्धेत तब्बल २० संघांनी सहभाग



घेऊन रायगड, प्रतापगड, राजगड यांसारख्या किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारल्या. यात जोगवाडी संघाने प्रथम क्रमांक, वेद विनायक महाडकर व्दितीय तर म्हसोबा आळी तृतीय क्रमांक पटकावला. रांगोळी स्पर्धेत १५ स्पर्धकांनी कलात्मक रांगोळ्या साकारल्या. यात समृद्धी क्षीरसागर हिने प्रथम, रिया अडसूळ हिने द्वितीय, कृपा पाटील हिने तृतीय तर सुजाता जाधव यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेचे परीक्षण विनोद कोलवणकर, आकाश शिंदे यांनी केले. सर्व स्पर्धकांना छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रद्युम्न ठसाळ, लीलाधर खातू, राकेश वडके, धनंजय बडे यांचे सहकार्य लाभले.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक-सुलेख बाळाराम बैकर यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी,

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे चौल, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेल्या खालील एकूण ०२.०७.४० हे.आर.चौ.मी. क्षेत्राच्या शेतजमिनी त्यांवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसहः

(१) गट क्रमांक १६८७/१, एकूण क्षेत्रफळ ००.६८.९० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.६१.५० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०७.४० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. ९.००, ही संपूर्ण शेतजमीन;

(२) गट क्रमांक १६८८, एकूण क्षेत्रफळ ००.४६.७० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.४१.८० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०४.९० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. ६.३९, ही संपूर्ण शेतजमीन; आणि

(३) गट क्रमांक १६८६/३२, एकूण क्षेत्रफळ ०१.०७.२० हे.आर.चौ.मी. पैकी विद्यमान मालकांच्या नावे खाते क्र. ४४५५ अन्वये दाखल असलेले ००.९१.८० हे.आर.चौ.मी. क्षेत्र (लागवडीयोग्य क्षेत्र ००.९१.८० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र निरंक), आकारणी रु. १४.०८, ही शेतजमीन.

ठिकाण : मुंबई
दिनांक १४ नोव्हेंबर २०२६

क्वाड्रा लीगल करीता
सही/-
**विक्रांत झुंजारराव**
(+९१ ९८३३६२५१९५)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. धनंजय लादुमल ओसवाल रा. परळी सुधागड रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कानसळ, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| १०६ | १-४४-०० | ०-२५ |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १४/११/२०२६

सही / -
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

दिनांक : १३/११/२०२६

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशील यांच्याबरोबर चालु आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

| मौजे | सर्व्हे नं./ गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| तलवडे, ता. अलिबाग | २७२/१ | जिरायत ०.२०.१० वरकस ०.५४.०० पो. ख. ०.०५.९० एकुण क्षेत्र ०.८०.०० | ४.४९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विकी व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशील सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १३/११/२०२६

सही/-
**ॲड. प्रविण मधुकर ठाकूर**
जिल्हा व सत्र न्यायालय
रायगड-पनवेल/अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक-सुलेख बाळाराम बैकर यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी,

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे चौल, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेल्या खालील एकूण ०२.०७.४० हे.आर.चौ.मी. क्षेत्राच्या शेतजमिनी त्यांवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसहः

(१) गट क्रमांक १६८७/१, एकूण क्षेत्रफळ ००.६८.९० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.६१.५० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०७.४० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. ९.००, ही संपूर्ण शेतजमीन;

(२) गट क्रमांक १६८८, एकूण क्षेत्रफळ ००.४६.७० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.४१.८० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०४.९० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. ६.३९, ही संपूर्ण शेतजमीन; आणि

(३) गट क्रमांक १६८६/३२, एकूण क्षेत्रफळ ०१.०७.२० हे.आर.चौ.मी. पैकी विद्यमान मालकांच्या नावे खाते क्र. ४४५५ अन्वये दाखल असलेले ००.९१.८० हे.आर.चौ.मी. क्षेत्र (लागवडीयोग्य क्षेत्र ००.९१.८० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र निरंक), आकारणी रु. १४.०८, ही शेतजमीन.

ठिकाण : मुंबई
दिनांक १४ नोव्हेंबर २०२६

क्वाड्रा लीगल करीता
सही/-
**विक्रांत झुंजारराव**
(+९१ ९८३३६२५१९५)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री. लक्ष्मण आंबो घरे वगैरे २० रा-उमरोली, तालुका - कर्जत, जिल्हा-रायगड. यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी करण्याची ठरविलेली असुन सदरची जमीन ही सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे दाखल आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

| गावाचे नांव | सर्व्हे/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| उमरोली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड. | ९/८ | ०-८०-०० यापैकी श्री.लक्ष्मण आंबो घरे वगैरे २० यांचे मालकीचे खरेदी करण्याचे ठरविलेले क्षेत्र- हे.आर.पॉ. ०-४०-० | ०-५२ |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, साठे करार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आंत खालील सही करणार यांजकडे सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही हक्क हितसंबध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक - १३/११/२०२६

सही /-
**ॲड.अविष्कार अरुण अभंगे**
रा नेमीनाथ हाईटस्, मुद्रे बुद्रुक, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड. - ४१०२०१.
मोबाईल नंबर -८०८७३४९०१८

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र. ८१२

फॉम झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना.

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेणशहर के विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २९/०६/२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १०/०९/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. शोमेर मेखयाल पेणकर मु-वडगाव, ता. पेण, जि. रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ०७/०५/२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ३४,७५,६४२/- व दिनांक १२/०६/२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १२ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ वा उपनियम (११ डी १) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून

श्री. शोमेर मेखपाल पेणकर यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन
गाव बेलवडे खुर्द ता. पेण सर्वे क्र. २२/ब/१ क्षेत्र ०.७५.७०

येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण च्या दिनांक ०७/०५/२०२५ रोजी येणे रक्कम रूपये ३४,७५,६४२/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. शोमेर मेखपाल पेणकर**

१. श्री. शोमेर मेखपाल पेणकर यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन गाव बेलवडे खुर्द सा पेण सर्वे क्र. २२/ब/१ क्षेत्र ०.०५.७०
स्थळ : पेण
दिनांक : १३/११/२०२६

सही/-
**ए.एन. भगत**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
द्वारा रायगड जिल्हा मध्यवती सहकारी बँक लि अलिबाग

**अलिबाग को-ऑप. अर्बन बँक लि., अलिबाग**
मुख्य कार्यालय: महर्षी कर्वे रोड, अलिबाग, जि. रायगड.
फोन नं. ०२१४१ - २२४४६४
ई-मेल : alibagho@acubl.in

**जाहिर सुचना (सर्व ग्राहक व सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व ग्राहक व सभासदास कळविण्यात येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे तसेच Prevention of Money Laundering Act, 2002 (As amended) च्या तरतुदींनुसार बँकेकडे KYC ची अद्ययावत कागदपत्रे ग्राहकांनी सादर करणे आवश्यक आहे.

**KYC/Re-KYC/CKYC** : रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे, खाते उघडतांना अद्ययावत बँकेकडे केलेल्या कागदपत्रे करणे बँकेस अनिवार्य कागदपत्रांची विहीत कालावधीची मुदत संपली असेल, तर आपण दिलेल्या पत्त्यावर, पत्राद्वारे व आपल्या मोबाईल क्रमांकावर आपणांस SMS द्वारे संपर्क साधण्यात येईल. आपण KYC (Know Your Customer) / OVD (Official Valid Documents) पुर्ततेसाठी आपणांस कळविले पासून ३० दिवसांचे आत अद्ययावत कागदपत्रे नजीकच्या शाखेत सादर करावीत. सदर कालावधीत आपण कागदपत्रे सादर न केल्यास नाईलाजास्तव खात्यावरील व्यवहार थांबवावे लागतील.

**Inoperative/Dormant/खात्यांसाठी** : कोणत्याही कारणाने खाते सलग एक वर्षे वापरले नसेल तर सदर खाते म्हणुन गणले जाते आणि दोन वर्षांनी आढावा घेऊन ते केले जाते. सदर खाते पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी, अद्ययावत KYC कागदपत्रे सादर करून व्यवहार करणे आवश्यक आहे.

सलग तीन वर्षे ठेव खात्यामध्ये शिल्लक शुन्य रक्कम असणाऱ्या खात्यांचा आढावा घेऊन, अशी खाती बंद करण्यात येतील. आपले खाते जर अशा गटात येत असेल तर त्वरीत आपल्या शाखेशी संपर्क साधावा.

**Updation of Mobile No./ E-mail ID/Nominee** : सध्या सायबर फसवणुकीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. सुरक्षिततेच्या कारणांसाठी आपण १) आपल्या खात्यास आपलाच ई-मेल व मोबाईल क्रमांक नोंदवावा २) Message / SMS द्वारे संपर्कामुळे अप्रिय घटना टाळता येऊ शकतील, याकरीता आपला अद्ययावत Mobile क्रमांक बँकेकडे नोंदवावा. ३) कायद्यामधील बदलामुळे आता एका ऐवजी चार व्यक्तींची नामांकने प्रत्येक खात्यास नोंदविता येतात. या सुविधेचा लाभ घ्यावा.

**लॉकरधारक** : आपण जर लॉकर सुविधेचा लाभ घेत असाल तर कृपया लॉकर भाडे करार नव्याने करून दिल्याची खात्री करावी आणि सदर लॉकर वर्षातुन किमान दोन वेळा वापरावे.

**DICGC** : ठेव खात्यातील रू. ५.०० लाखापर्यंतच्या रक्कमेस DICGC द्वारे विमा संरक्षण असून याकरीता आपल्या खात्याची KYC अद्ययावत असणे आवश्यक आहे.

**सायबर सुरक्षा** : कृपया तुमचे SMS/Email/OTP फोनद्वारे अथवा तोंडी कोणासही शेअर्स करू नये. बँक कधीही तुम्हाला अशी माहिती विचारत नाही. याबाबत आपण नेहमी सतर्क रहावे.

Money Mule Account : आपले खाते स्वत:च वापरा. आर्थिक अमिषाला बळी पडु नका. आपल्याला अधिक चांगल्याप्रकारे सेवा देण्याची संधी द्यावी. कृपया वरील बाबींची पुर्तता करून बँकेस सहकार्य करावे. अधिक माहितीकरीता नजीकच्या शाखेमध्ये अथवा बँकेच्या Toll Free 1800-233-4465 या क्रमांकावर संपर्क साधावा.

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

दिनांक : १४/११/२०२६
शाखा : अलिबाग, थेरोंडा फाटा, नेरळ, खोपोली, कर्जत, मुरुड, सानपाडा, चाणजे, चेंढरे, पाली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे पोशिर, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १. मारुती आंबो माळी २. भास्कर माधव माळी ३.अनिल माधव माळी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|
| १५७ | ०-१४-७० | ०-२५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १४/११/२०२६

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळमजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारा कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १७/८ | एकूण क्षेत्र ०-२१-७० हे.आर | २.५० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :-१४/११/२०२६ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १११/६ | एकूण क्षेत्र ०-५७-३० हे.आर | १.५० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :-१४/११/२०२६ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ११०/९ | एकूण क्षेत्र ०-८८-०० हे.आर | ०.४२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :-१४/११/२०२६ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ११२/१० | एकूण क्षेत्र ०-४३-०० हे.आर | ०.३० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :-१४/११/२०२६ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक राजेंद्र वसंत अंबुकर यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | १२८२ | ०-३३-३० जिरायत<br>०-०१-३० पो.ख.<br>०-३४-६० एकुण | ४.५७ |

**वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये राजेंद्र वसंत अंबुकर यांचा असणारा अविभक्त हिस्सा या नोटीसीचा विषय आहे.**

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेव




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाची कामं हातात घ्यायला हवी. आर्थिक उलाढालीत वाढ होईल. अपेक्षापूर्तीचं समाधान लाभेल.
- **वृषभ** : घेतलेल्या निर्णयावर ठाम रहा. कौटुंबिक बाबतीत अनपेक्षित घटना संभवतात. पुरेशी काळजी घ्या.
- **मिथुन** : वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. गेलेल्या संधी पुन्हा लाभतील.
- **कर्क** : कार्यक्षेत्रात छोट्या-मोठ्या अडचणी येतील. दीर्घकालीन गुंतवणूक लाभदायक ठरेल. चिंता नसावी.
- **सिंह** : आर्थिक स्थैर्य वाढीस लागेल. सत्कर्माचं उत्तम फळ प्राप्त होईल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **कन्या** : आर्थिक आमिषांना बळी पडू नका. मनाविरूध्द घटना संभवतात. घरगुती वाद वेळीच टाळावेत.
- **तूळ** : आर्थिक आवक समाधानकारक राहील. उत्साहानं कार्यरत रहाल. खाण्या-पिण्यावर नियंत्रण ठेवा.
- **वृश्चिक** : तडजोडीचं धोरण हिताचं ठरेल. नोकरी-व्यवसायात स्पर्धा वाढेल. अनावश्यक खर्च कमी करावा.
- **धनु** : आर्थिक नियोजन अचूक व्हावं. थोरामोठ्यांची मर्जी संपादन कराल. कला-गुणांचा विकास होईल.
- **मकर** : सरकारी प्रलंबित कामं मार्गी लागतील. वैवाहिक जीवनात सुसंवाद ठेवावा. प्रवासाचे योग आहेत.
- **कुंभ** : कार्यक्षेत्रात प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. आर्थिक आवक उत्तम राहणार आहे.
- **मीन** : आर्थिक बाबतीत चढ-उतार होतील. कठोर परिश्रमातून यश मिळवू शकाल. बाकी चिंता नसावी.

## १४ नोव्हेंबर

**राष्ट्रीय बाल दिन, जागतिक मधुमेह दिन**

१८८९ : भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिवस.
१९२४ : प्रख्यात कथकनर्तिका रोहिणी भाटे यांचा जन्म.
१९४२ : आसामी साहित्यिक, कवयित्री, संपादिका इंदिरा गोस्वामी यांचा जन्म.
१९७१ : 'मरीनर-९' हे अंतराळयान मंगळाच्या कक्षेत पोहोचलं.
२०१३ : वानखेडे स्टेडियमवर सचिन तेंडुलकरला हृद्य निरोप. सचिनचा कसोटी क्रिकेटला निरोप. सचिनवरील टपाल तिकीटाचं अनावरण.

## आरोग्यमंत्र — करा तणावावर मात

आजकाल बहुतेकांना वाढत्या ताण-तणावाचा सामना करावा लागत आहे. विविध क्षेत्रातील वाढती स्पर्धा, रोजची धावपळ, कामाचा वाढत्या व्याप तसंच कौटुंबिक समस्या, नैराश्य या तसंच अन्य काही कारणांमुळे ताण-तणाव वाढीस लागतात. या ताण-तणावाचा शारीरिक तसंच मानसिक आरोग्यावर विपरित परिणाम होतो. त्यामुळेच वाढत्या ताण-तणावापासून वेळीच सुटका होणं गरजेचं ठरतं. त्यासाठी काही सोप्या उपाययोजना करता येण्यासारख्या आहेत. त्या विषयी...



* आयुष्यात निराश, हताश झालेल्या व्यक्ती कशावरच विश्वास ठेवण्यास तयार नसतात. त्यांना सर्व गोष्टी निरर्थक वाटतात. असं होऊ नये यासाठी जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नेहमी सकारात्मक ठेवावा. तसंच पूर्ववत आत्मविश्वास निर्माण होईल यासाठी प्रयत्न करावेत.
* हसणं हा ताण-तणाव दूर करण्याचा अत्यंत सोपा उपाय आहे. त्यामुळे सतत हसतमुख राहण्याचा, आनंदी राहण्याचा प्रयत्न करा. यामुळे ताण-तणाव दूर ठेवणं शक्य होईल.
* इतरांची दु:खं, अडचणी यांचा विचार केल्यास त्या मानाने तुम्हाला तुमची दु:खं, अडचणी कमी वाटतील. त्यामुळे बिकट प्रसंगातही हसतमुखानं वाटचाल करणाऱ्यांचा आदर्श समोर ठेवा.
* वेळीच समुपदेशन आणि उपचारांद्वारेही ताण-तणावावर मात करता येते.

## टेक नॉलेज — गेमिंगच्या जगात

छोट्यांनो, ऑनलाईन गेम खेळताना खूप मजा येते. चला तर, मग गेमिंगच्या विश्वात डोकावू या.

* नाणी टाकून खेळता येणारा पहिला व्हिडिओ गेम १९७० मध्ये सादर करण्यात आला होता. कॉम्प्युटर स्पेस आणि पाँग हे गेम्स त्या काळात तुफान गाजले. * ग्रँड थेफ्ट ऑटो व्ही चं २०१३ मध्ये आलेलं व्हर्जन हा जगातला सर्वात महागडा गेम आहे. ९३१३ दशलक्ष रुपये खर्चून हा गेम तयार करण्यात आला. या गेमच्या प्रसिद्धीसाठीही बरेच पैसे खर्च करण्यात आले. त्यामुळे हा सर्वात महागडा गेम ठरला आहे. सुरूवातीच्या काही दिवसांमध्ये या गेमच्या डेव्हलपर्सनी जवळपास ७१०० कोटी रुपये नफा कमावला.
* मुलांच्या तुलनेत मुली जास्त व्हिडिओ गेम खेळतात. व्हिडिओ गेम विकत घेणाऱ्या मुलींचा आकडा ४६ टक्के आहे तर ४५ टक्के मुलं हा गेम खेळतात.
* 'रेसिडेंट इव्हिल' ही ऑनलाईन गेम्सची सर्वात लोकप्रिय फ्रँचायझी ठरली आहे. या गेममधल्या पात्रांसारखी खेळणी तयार करण्यात आली आहेत. तसंच याचे बरेच सीक्वेल्सही आले आहेत.

## भटकंती

* ऑक्टोबर ते एप्रिल या काळात लक्षद्विपला जाता येईल. या दिवसात इथलं वातावरण आल्हाददायक असतं आणि स्कुबा डायव्हिंगचा आनंद लुटता येतो.
* कर्नाटकमधलं तरानी बेट स्कुबा डायव्हिंगसाठी खूप प्रसिद्ध आहे. तरानी बेटांना पिजन आयलंडही म्हटलं जातं. हे ठिकाण वॉटरस्पोर्टससाठी प्रसिद्ध आहे.
* गोव्यातल्या ग्रँड आयलंडवरही स्कुबा डायव्हिंगचा आनंद लुटता येतो. इथल्या स्वच्छ पाण्यात समुद्री जीवनाचं छान दर्शन होतं.

## ब्युटी टॉक — कार्बन पील फेशियल

सध्या कार्बन पील फेशियल बरंच चर्चेत आहे. कार्बन पील फेशियलनंतर चेहरा ताजातवाना, नितळ आणि टवटवीत दिसू लागतो. यातल्या कार्बनमुळे चेहऱ्यावरचे धूळ, माती निघून जाते आणि त्वचा स्वच्छ दिसू लागते. यात चेहऱ्यावर कार्बनचा एक थर लावला जातो. यामुळे चेहरा आतून स्वच्छ होतो. या फेशियलदरम्यान अत्याधुनिक लेझर तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्यामुळे चेहरा उजळून निघतो. ब्लॅकहेड्स, तेलकट त्वचा, मुरूमं, सुरकुत्या अशा समस्या असणाऱ्या महिलांसाठी कार्बन फेशियल अगदी योग्य आहे. फेशियलच्या या प्रकारामुळे त्वचेला अगदी आतपर्यंत पोषण मिळतं. यामुळे त्वचा बराच काळपर्यंत ताजीतवानी, टवटवीत आणि उजळ दिसते. या फेशियलचे दोन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात चेहऱ्यावर लिक्विड कार्बनचा थर लावला जातो. दुसऱ्या टप्प्यात एक उपकरणाचा वापर केला जातो. हे उपकरण त्वचेतली घाण, प्रदूषित कण काढून टाकतं. त्वचेतले कार्बनचे कण काढून टाकण्यासाठी लेझर लाईट्सचा वापर केला जातो. हे फेशियल पूर्णपणे सुरक्षित आहे. कार्बन पील फेशियल केल्यानंतर काही दिवस उन्हात जाणं टाळावं.

## पंचांग

**शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
कार्तिक शु. ५, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : शूल,
सूर्योदय ६.४७, सूर्यास्त ५.५९

## फॉरवर्ड्स

**कारीगर हूं साहेब, शब्दों की मिट्टी से महफ़िल सजाता हूँ...**

**किसी को बेकार, किसी को लाजवाब नज़र आता हूँ...!**

## शांततादूताची लक्षवेधी कारकिर्द — करिअरवाटा

अलिकडच्या काळात जागतिक पातळीवर शांतता आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सातत्यानं ऐरणीवर येत आहे. अशा स्थितीत जगात शांतता-सुव्यवस्था नांदावी तसंच जनतेला सुखा-समाधानानं जीवन जगता यावं या हेतूनं जवळपास सारीच राष्ट्र प्रयत्नशील आहेत. तरिही कोणत्या ना कोणत्या कारणानं शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात येत आहे. विविध प्रकारची आंदोलनं, संघर्ष यामुळे वातावरण तर कलुषित होतंच. शिवाय त्यात जिवीत आणि वित्त हानी मोठ्या प्रमाणावर होते. वाढत्या दहशतवादी-नक्षलवादी कारवाया, हिंसाचार या बाबी आटोक्यात कशा आणायच्या हा जगापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर 'पीस अँड कॉन्फ्लिक्ट स्टडीज' हा विषय महत्त्वाचा मानला जातो. यामध्ये सरकारी संस्थांद्वारे शांततेसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना हातभार लावण्याबरोबर राजकीय संशोधक तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रातही कारकिर्द करता येते. या क्षेत्रातील वेतन संबंधित व्यक्तीचं पद, शिक्षण यावर अवलंबून असतं. असा अभ्यासक्रम द नेल्सन मंडेला सेंटर फॉर पीस अँड कॉन्फ्लिक्ट रिझॉल्युशन, जामिया मिलिया इस्लामिया यासह अन्य काही संस्थांमध्ये उपलब्ध आहे. सिक्किममधील मणिपाल विद्यापीठात एम.ए./पी.एच.डी. इन पीस अँड कॉन्फ्लिक्ट स्टडीज अँड मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.



## खेचाखेची — साफसफाई

**दिन्याची बायको** : चहा घ्या आणि पॅरासिटमॉल गोळी पण घ्या.
**दिनेश** : मला काही ताप नाही
**बायको** : मग डायजीन घ्या.
**दिनेश** : मला ॲसिडिटी पण नाही.
**बायको** : मग पुदिनहरा घ्या.
**दिनेश** : माझं पोट पण बरं आहे.
**बायको** : मग कॉम्बिफ्लाम घ्या. तुमचे हाता-पायाचे दुखणे थांबेल.
**दिनेश** : मी एकदम फीट आहे. समजलं?
**बायको** : मग आता यातील एकही कारण न सांगता तो लांब झाडू घ्या, स्टुलावर चढून सगळी जळमटं वगैरे काढा. दिवाळी येतीये. घर काही माझ्या एकटीचं नाहीये, समजलं का?

## वेगळं काही

उत्तर ध्रुवावर बर्फाचं साम्राज्य पहायला मिळतं. आयुष्यात एकदा तरी या स्थानाला भेट द्यावी असं अनेकांना वाटत असतं. तुम्हालाही उत्तर ध्रुवाला भेट देता येईल. पण त्यासाठी ५० हजार पाउंड खर्च करावे लागतील. स्वीडनमधली 'ओशियन स्काय' या कंपनीने २०२३ मध्ये प्रवाशांना उत्तर ध्रुवावर नेलं होतं. यासाठी अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त हायब्रिड विमान तयार करण्यात आलं. २०१७ मध्ये अशाच एका हायब्रिड विमानाची चाचणी घेण्यात आली होती. पण ही चाचणी अयशस्वी ठरली. त्यामुळे पुन्हा त्याची बांधणी केली. या विमानात फाईव्ह स्टार हॉटेलसारख्या सुविधा दिल्या गेल्या. या विमानाने नॉर्वेतल्या स्वालबार या द्विपसमुहावरून उड्डाण घेतलं.

## समुपदेशन — विचारपूर्वक निर्णय घे

माझं लग्न विसाव्या वर्षी झालं. परिचित कुटुंबातील मुलगा असल्याने वडिलांच्या सल्ल्यावरुन लग्न केलं. मात्र १९ वर्षांच्या सहजीवनात मी समाधानी नाही. आमच्यात अनेक बाबतीत विसंवाद आहे. पती आत्मकेंद्री असून त्याच्याकडे ध्येयं नाहीत. तो प्रत्येक बाबतीत निरस आहे. त्यामुळेच की काय, त्याच्या मित्राचा सहवास मला भावतो. आम्ही एकमेकांकडे आकर्षित होत आहोत. तो विवाहित आहे. आम्ही आधीची बंधनं जुगारुन एकत्र राहण्यास तयार आहोत. पण मला जनलज्जेचं भयही आहे. काय करू, माझं वागणं व्यभिचार आहे का?



– हे बघ, पतीशी बेबनाव, मतैक्य नसल्यामुळे परकेपणाची जाणीव बळावणं, एकमेकांप्रती प्रेम न उत्पन्न होणं या अनेक जोडप्यांना सतावणाऱ्या बाबी आहेत. पण संसार तोडणं इतकं सोपं नाही. शिवाय तू अन्य एका विवाहित पुरुषाच्या प्रेमात अडकत आहेस. तुम्ही एकत्र राहण्याचा विचार केला तर दोन संसार मोडणार आहेत. मुख्य म्हणजे तुम्हा दोघांना आधी घटस्फोट घेऊनच आधीच्या बंधनातून मुक्त व्हावं लागणार आहे. ही प्रक्रिया वेळखाऊ तसंच मनस्ताप देणारी आहे. इतक्या सगळ्या दिव्याला सामोरं जाण्याची तयारी असेल तरच पुढचा विचार करा.

## सुडोकू १७४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३ | ५ | | | | २ | ९ | |
| ८ | | | | ७ | ३ | | | |
| | | | | ९ | | ५ | ३ | |
| | | | | | ८ | १ | | २ |
| ६ | | | | २ | | | | ४ |
| ४ | | ७ | ६ | | | | | |
| | ६ | ८ | | ५ | | | | |
| | | | ३ | १ | | | | ६ |
| | १ | ९ | | | | ७ | २ | ३ |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १७३चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३ | १ | ५ | ४ | ९ | ८ | ६ | २ |
| ८ | ९ | ६ | २ | १ | ७ | ३ | ४ | ५ |
| ५ | २ | ४ | ८ | ३ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ८ | ५ | ६ | २ | ३ | १ | ९ | ७ |
| ६ | १ | ९ | ४ | ७ | ८ | ५ | २ | ३ |
| २ | ७ | ३ | ९ | ५ | १ | ४ | ८ | ६ |
| ९ | ५ | ७ | १ | ८ | २ | ६ | ३ | ४ |
| १ | ४ | २ | ३ | ६ | ५ | ९ | ७ | ८ |
| ३ | ६ | ८ | ७ | ९ | ४ | २ | ५ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १७४



**आडवे शब्द :-**

१) शनिवार
५) मयूर
७) एकंदरीने सर्व, निवड न करता
११) नड
१२) ढग
१४) त्या बाजूला
१५) खोडण्याचे साधन
१६) अंगठ्या जवळचे बोट
१७) आवर घालणारी वादी
१८) आखूड, अपुरा
१९) मोठी वाटी
२०) एक ऋतू
२२) पथ्थर
२३) आजच्या आधीचा दिवस
२४) पाणी
२७) सागरी वाहन
२८) संपूर्ण
३०) शरीरातील वात दूर करणारा
३३) रांग, ओळ
३४) पावसाची झड
३५) पर्वत
३६) ** ** ****, तया यातना कठिण
३८) तापापूर्वीची लक्षणे
३९) पुन्हा
४०) फुटाणे
४२) नेहमी
४३) हस्तेपरहस्ते
४४) गोमाता
४५) नरमांजर
४६) सारखा
४७) रत्न
४९) तिरळा
५१) प्रभात
५२) झकास, छान
५५) भारतीय सैनिक
५६) कदर करणारा
५९) कुंभाराची भट्टी
६०) हत्ती
६२) असुर
६४) एक पक्षी
६५) चांदणी
६६) चलाख, हुषार
६७) कणा
६९) ओढ्यावरील कच्चा पूल
७०) प्रजा
७१) वेदनेने भरलेले
७२) शिक्षक

**उभे शब्द :-**

१) देवीचा एक वार
२) किंमत
३) सवाद्य मिरवणूक
४) चंद्र
६) सुंदर, रूपवान नवराबायकोची जोडी
७) स्पष्ट, फटकळ
८) रंग बदलणारा प्राणी
९) केव्हा (हिं.)
१०) फळाचे साल
१३) चिखलाची जमीन
२१) धोबी
२३) वरण, भाजी, पिठले असे तोंडी लावणे
२५) बारीक सारीक
२७) मेहनत, कष्ट
२९) अन्न जळणे
३०) उत्तराधिकारी
३१) अंगातील मस्ती, जोम
३२) संतापी
३४) सत्वयुक्त
३६) अटीतील दोन शब्द
३७) ठेच लागणे
३९) उष:काल
४१) एकूणएक, सर्वजण
४५) एक लहान आकाराचे फळ
४६) बरोबर, सारखा
४८) सिद्ध
५०) रात्री चमचमणारा किटक
५१) घोंगडी विणणारी जमात
५३) नकला करणारा
५४) मासा
५७) औषध
५८) मोठी जाड सुई
५९) उपासना, प्रार्थना
६१) वंशावळ
६२) रात्रभर
६३) मोठा तलाव
६६) पुत्र, मुलगा
६७) अभिप्राय
६८) शरीर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि | रो | ध | न | ■ | आ | स | पा | स | ■ | आ | रा | म | दा | यी |
| व | ज | न | का | टा | ■ | र्दी | ■ | क | पा | ळ | ■ | ळ | ■ | ■ |
| ड | ■ | वा | र | क | री | ■ | स | ल | ■ | स | का | म | ■ | तु |
| णू | ■ | न | ■ | ण | ■ | आ | रा | ■ | र | ■ | ■ | ळ | ■ | ल |
| क | सा | ■ | न | खा | बो | टा | व | र | खे | ळ | वि | णे | ■ | सी |
| ■ | म | धु | क | र | ■ | पि | ■ | मा | ल | ■ | जा | ■ | दा | दा |
| स | दा | ■ | टी | ■ | छ | टा | क | ■ | ■ | अ | र | ण्य | वा | स |
| म | म | ता | ■ | क | ■ | क | र | क | री | त | ■ | ■ | न | ■ |
| ■ | दं | ■ | त | ल | वा | र | ■ | ष्ट | ■ | ए | क | ■ | ल | ता |
| कं | ड | ■ | ड | ■ | म | णे | र | ■ | ख | व | र | ■ | ■ | प |
| ■ | भे | ळ | ■ | म | ना | ■ | म | ■ | प्पा | ■ | वा | ळ | वं | ट |
| क | द | ■ | ड | रा | व | ड | रा | व | ■ | का | ल | ■ | द | ■ |
| ला | ■ | का | बा | ■ | ता | ■ | ट | ■ | सु | त | ■ | दा | न | व |
| का | ज | ळ | ■ | पा | र | वा | ■ | रा | म | ■ | र | द | ■ | र्ष |
| र | ■ | जी | व | न | ■ | सा | व | धा | न | ■ | वि | ला | प | ■ |

# कलासक्त



## 'शावा शावा'ची झलक

काही चित्रपटांमधील गाणी आणि त्यातील कलाकारांचे पेहराव काळाच्या पुढे जाऊनही प्रेक्षकांच्या स्मरणात राहतात. सणासुदीच्या दिवसांत तर अशा जुन्या लुक्सना पुन्हा उजाळा मिळतो. याच आठवणींना उजाळा दिला आहे अभिनेत्री अनन्या पांडे हिने. दिग्दर्शक करण जोहर यांच्या २००१ मधील 'कभी खुशी कभी गम' या चित्रपटातील राणी मुखर्जीचा लोकप्रिय लुक अनन्याने पुन्हा साकारला. प्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांच्या दिवाळी पार्टीसाठी तिने या चित्रपटातील 'शावा शावा' गाण्यातील चंदेरी रंगाच्या चमचमणाऱ्या लेहंग्याची आधुनिक ढंगातील आवृत्ती परिधान केली होती. विशेष म्हणजे, या चित्रपटासाठी राणी मुखर्जीचा मूळ पेहरावही मनीष मल्होत्रा यांनीच तयार केला होता.

५ नोव्हेंबरला झालेल्या या पार्टीच्या निमित्ताने अनन्या आणि तिची स्टायलिस्ट प्रियांका कापडिया यांनी इन्स्टाग्राम स्टोरीजवर राणी मुखर्जीच्या मूळ लेहंग्याचा फोटो कोलाज शेअर केला. त्यावर 'आजच्या रात्रीचा मूड' असा आशय असलेले 'मूड टुनाइट' हे कॅप्शन देत त्यांनी मनीष मल्होत्रा यांना टॅग केले. त्यामुळे अनन्याच्या या पेहरावामागील प्रेरणा आधीच स्पष्ट झाली होती. त्यानंतर तिने त्याच लेहंग्याची आधुनिक शैलीतील आवृत्ती परिधान केलेले व्हिडीओही शेअर केले. त्यात ती 'शावा शावा' या गाण्यावर नृत्य करताना दिसली. चंदेरी रंग, चमकदार सिक्विन्स आणि पारंपरिक लेहंग्याचा साज यामुळे तिचा हा लुक जुन्या आठवणी जागवणारा ठरला. 'कभी खुशी कभी गम'मध्ये राणी मुखर्जीची भूमिका मर्यादित असली, तरी तिच्या लुक्सची छाप आजही फॅशनप्रेमींवर कायम आहे. विशेषतः 'शावा शावा'मधील तिचा चंदेरी लेहंगा सणावाराच्या फॅशनसाठी आजही प्रेरणादायी ठरतो. अनन्याने तोच पेहराव हुबेहूब उतरवण्याऐवजी त्याला आधुनिक रूप दिले. जुन्या चित्रपटातील लोकप्रिय शैलीला नव्या पिढीच्या अंदाजात सादर करण्याचा हा प्रयत्न तिच्या दिवाळी पार्टीतील उपस्थितीचा खास भाग ठरला. त्यामुळे या लुकच्या निमित्ताने राणी मुखर्जीची आठवण आणि 'शावा शावा'ची लोकप्रियता पुन्हा एकदा चर्चेत आली.

## जुन्या गाण्याची मोहिनी

कृष्ण-धवल पडद्यावरची गाणी, त्यातील नृत्याची नजाकत आणि कलाकारांच्या अदाकारीची एक वेगळीच जादू असते. काळ बदलला, चित्रपटांचा बाज बदलला; पण जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीतील या आठवणी आजही रसिकांच्या मनात ताज्या आहेत. अभिनेत्री ऊर्मिला मातोंडकर हिने अशाच एका जुन्या गाण्याला आपल्या खास अंदाजात उजाळा दिला आहे. १९४९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'पतंगा' चित्रपटातील 'मेरे पिया गये रंगून' या लोकप्रिय गाण्यावर तिने नृत्य सादर केले. विशेष म्हणजे, या सादरीकरणासाठी तिने कृष्ण-धवल दृश्यरचना आणि त्या काळाची आठवण करून देणारी वेशभूषा निवडली. त्यामुळे तिची ही झलक केवळ नृत्यापुरती मर्यादित न राहता जुन्या चित्रपटसृष्टीला दिलेले एक सुंदर अभिवादन ठरली आहे.

'मेरे पिया गये रंगून' हे गाणे आपल्या ठेक्यामुळे आणि खुमासदार सादरीकरणामुळे आजही ओळखले जाते. जुन्या काळातील चित्रपटगीतांची खासियत म्हणजे त्यातील साधेपणा, संगीताची लय आणि सहज लक्षात राहणारी चाल. उर्मिलाने या गाण्याची निवड करताना त्याच जुन्या आठवणींना हात घातला आहे. कृष्णधवल चित्रफितीचा वापर आणि त्या काळाशी सुसंगत वेशभूषा यांमुळे तिच्या सादरीकरणाला वेगळे रूप मिळाले. आजच्या रंगीत, वेगवान आणि आधुनिक दृश्यभाषेच्या काळात अशा प्रकारची मांडणी प्रेक्षकांना जुन्या सिनेमांच्या विश्वात घेऊन जाते. गाण्याची ओळख जपतानाच त्याला नव्या पिढीसमोर आणण्याचा हा प्रयत्नही लक्षवेधी ठरतो.

ऊर्मिला मातोंडकर ही केवळ अभिनयासाठीच नव्हे, तर नृत्यातील सहजता आणि पडद्यावरच्या तिच्या उत्स्फूर्त उपस्थितीसाठीही ओळखली जाते. त्यामुळे जुन्या गाण्यावरचे तिचे हे सादरीकरण चाहत्यांसाठी खास ठरले आहे. जुन्या चित्रपटांमधील गाणी ही केवळ त्या काळाची आठवण नसून पुढच्या पिढ्यांनाही जोडणारा सांस्कृतिक ठेवा आहेत. एखादे गाणे नव्या रूपात सादर झाले की त्यामागच्या मूळ कलाकृतीची पुन्हा आठवण होते. उर्मिलाच्या या प्रयत्नातूनही तेच जाणवते. जुन्या गाण्यांची मोहिनी किती टिकाऊ असते, याची जाणीव करून देणारी ही झलक आहे.



## युद्धकथेचा नवा दृष्टिकोन



भारत आणि चीन यांच्यातील संघर्ष म्हटला की सीमेवरील तणाव, सैनिकांचे शौर्य आणि दोन्ही देशांमधील संबंध असे अनेक विषय डोळ्यांसमोर उभे राहतात. मात्र, युद्धाची गोष्ट सांगताना केवळ दोन देशांमधील संघर्षच महत्त्वाचा असतो का? सैनिकांचे आयुष्य, त्यांच्या कुटुंबांची प्रतीक्षा आणि युद्धाच्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या भावनिक गुंतागुंतीही तितक्याच महत्त्वाच्या असतात. अभिनेता सलमान खानच्या आगामी 'मातृभूमी : मे वॉर रेस्ट इन पीस' या चित्रपटातून हाच दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सुरुवातीला 'बॅटल ऑफ गलवान' असे नाव असलेल्या या चित्रपटाच्या कथेत मोठे बदल झाल्याची चर्चा होती. सरकारच्या दबावामुळे पटकथा बदलण्यात आल्याच्या वृत्तांनाही उधाण आले होते. मात्र, मुंबईत शुक्रवारी झालेल्या चित्रपटाच्या ट्रेलर प्रकाशन सोहळ्यात सलमानने या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

भारत सरकारने चित्रपटाची कथा बदलण्यासाठी कोणताही दबाव आणलेला नाही आणि हा चित्रपट चीनविरोधातही नाही, असे सलमानने स्पष्ट केले. चित्रपटात सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना कोणत्या परिस्थितीतून जावे लागते, याची बाजू मांडण्यात आली आहे. सैनिक एकमेकांचा आदर करतात; मात्र परिस्थिती निर्माण झाली की त्यांना आपल्या देशासाठी उभे राहावे लागते, असे त्याने सांगितले. दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांची सुरुवातीला चित्रपटाबाबत वेगळी कल्पना होती, असेही सलमानने मान्य केले; मात्र त्याबद्दल अधिक तपशील दिला नाही. हा चित्रपट कोणत्याही व्यक्तीची चरित्रकथा नसून, वडील सलीम खान यांनी एकदा सांगितलेल्या विचारातून त्याला प्रेरणा मिळाल्याचे सलमानने नमूद केले. युद्धात सुटलेली गोळी अखेरीस आईच्या हृदयापर्यंत पोहोचते, हा त्या विचाराचा आशय आहे.

## 'कौन बनेगा करोडपती'मधून अमिताभ यांचा किस्सा

'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमात प्रश्नांची उत्तरे शोधण्याबरोबरच अमिताभ बच्चन यांच्या गप्पा आणि त्यातून उलगडणारे आयुष्यातील किस्सेही प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीतील अनुभवांपासून ते महाविद्यालयीन दिवसांपर्यंतच्या आठवणी ते सहजपणे सांगतात. नुकत्याच माधुरी दीक्षित सहभागी झालेल्या विशेष भागात अमिताभ यांनी असाच एक जुना प्रसंग सांगितला. वयाच्या ८४व्या वर्षीही त्यांचा विनोदबुद्धीचा अंदाज कायम असल्याची झलक या गप्पांमधून पाहायला मिळाली. दिल्ली विद्यापीठातील मिरांडा हाऊस महाविद्यालयाला पहिल्यांदा भेट दिली, तेव्हाचा हा किस्सा त्यांनी सांगितला. अमिताभ यांनी दिल्लीतील किरोरी मल महाविद्यालयात शिक्षण घेतले होते. त्या काळात मिरांडा हाऊसला गेले असताना वसतिगृहाच्या सज्जातून मुलींनी त्यांच्यावर केलेल्या टिप्पणीने ते चांगलेच गोंधळले होते. या प्रसंगाचे वर्णन करताना अमिताभ म्हणाले, ''आम्ही पहिल्यांदा मिरांडा हाऊसमध्ये प्रवेश केला, त्या दिवशी वसतिगृहाच्या सज्जावर बसलेल्या मुली म्हणू लागल्या, 'अय हाय, क्या चाल है!''' त्यांच्या चालण्याच्या पद्धतीवर मुली टिप्पणी करत होत्या. सुरुवातीला या प्रकाराने त्यांना काय प्रतिक्रिया द्यावी, हेच समजले नाही. मात्र, या अनुभवातून त्यांना महिलांना अशा प्रकारच्या छेडछाडीला सामोरे जावे लागल्यावर कसे वाटत असेल, याची जाणीव झाली. ''जोपर्यंत एखादी गोष्ट स्वतःवर ओढवत नाही, तोपर्यंत तिची जाणीव होत नाही,'' अशा आशयाचे मतही त्यांनी व्यक्त केले. स्वतःला अशा प्रसंगाचा सामना करावा लागल्यावरच दुसऱ्याच्या मनातील भावना समजू शकतात, असे त्यांनी सांगितले.

अमिताभ यांच्या या आठवणी ऐकल्यानंतर माधुरी दीक्षित यांनी त्यांना सहज प्रश्न विचारला, ''मग तुम्ही काय केले?'' त्यावर अमिताभ यांनी नेहमीच्या मिश्किल शैलीत उत्तर दिले, ''भाग गये और क्या!'' म्हणजेच, दुसरे काय करणार, पळून गेलो! त्यांच्या या उत्तराने या प्रसंगातील विनोद अधिक खुलला.

## भाग गए, और क्या!



## 'रामायण'ची भव्यता

पौराणिक कथा पडद्यावर साकारताना केवळ कलाकारांचा अभिनय किंवा तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत नाही, तर त्या काळाचे आणि वातावरणाचे भव्य चित्र उभे करण्यासाठी पडद्यामागेही प्रचंड मेहनत घेतली जाते. रणबीर कपूरची प्रमुख भूमिका असलेल्या 'रामायण' चित्रपटाच्या निर्मितीमागील काही तपशील आता समोर आले आहेत. या चित्रपटाचे कलादिग्दर्शक रमेश आंधळे यांनी एका मुलाखतीत भव्य सेट्स, सोन्याचा मुलामा दिलेले सिंहासन, रथ आणि पुष्पक विमानाच्या निर्मितीविषयी माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, या चित्रपटासाठी तब्बल १५० मोठे सेट्स उभारण्यात आले. त्यापैकी बहुतांशी सेट्स मुंबईतील फिल्मसिटीमध्ये तयार करण्यात आले होते. चित्रपटाचे बहुतांशी चित्रीकरण ग्रीन स्क्रीनसमोर झाले असले, तरी दृश्यांना वास्तवाचा स्पर्श देण्यासाठी प्रत्यक्ष सजावट, वस्तू आणि मोठ्या आकाराच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या. रमेश आंधळे २०२४ मध्ये या प्रकल्पाशी जोडले गेले होते. या चित्रपटासाठी किमान १८ कलादिग्दर्शक काम करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

चित्रपटात यशने साकारलेल्या रावणाच्या सिंहासनाच्या निर्मितीसाठी चार महिने लागले. या सिंहासनावर २४ कॅरेट सोन्याचा मुलामा चढवण्यात आला असून, त्यासाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च करण्यात आले. शूर्पणखा ज्या रथातून रामाच्या कुटीपर्यंत पोहोचते, तो रथ तयार करण्यासाठी तीन महिने लागले. विशेष म्हणजे, तो केवळ देखावा नसून, प्रत्यक्ष चालवता येईल अशा पद्धतीने बनवण्यात आला. त्याच्या निर्मितीवर सुमारे दीड कोटी रुपये खर्च झाले. रावण आणि जटायू यांच्यातील युद्ध हे चित्रपटातील महत्त्वाचे आकर्षण आहे. हे दृश्य अधिक वास्तवदर्शी करण्यासाठी निर्मात्यांनी जटायूची २४ फूट उंच प्रतिकृती प्रत्यक्ष तयार केली. कलाकारांना तिच्यासोबत चित्रीकरण करता यावे, हा त्यामागील उद्देश होता. त्याचप्रमाणे पुष्पक विमानही केवळ संगणकीय दृश्यांच्या मदतीने न दाखवता प्रत्यक्ष मॉडेलच्या स्वरूपात उभारण्यात आले.



## 'कांबळी'... खेळणार मैदानाबाहेरची खेळी

क्रिकेटच्या मैदानावर कधीकाळी आपल्या फलंदाजीने गोलंदाजांची झोप उडवणारा एक खेळाडू, त्याच्या आयुष्यात मात्र अनेक अनपेक्षित वळणांना सामोरा गेला. विक्रम, लोकप्रियता, अपयश, संघर्ष आणि पुन्हा उभे राहण्याची धडपड अशा अनेक रंगांनी सजलेला माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी यांचा जीवनप्रवास आता छोट्या पडद्यावर उलगडणार आहे. 'कांबळी' या आगामी वेब सीरिजमधून त्यांच्या आयुष्यातील अनेक अनोळखी पैलू प्रेक्षकांसमोर येणार आहेत. विशेष म्हणजे, कांबळी यांची भूमिका कोण साकारणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळताजुळता नवा चेहरा शोधण्याचे काम दिग्दर्शक अभिजित देशपांडे यांची टीम करत आहे.

'झी फाइव्ह' या ओटीटी प्लॅटफॉर्मवर ही सीरिज प्रदर्शित होणार आहे. अभिजित देशपांडे दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळत असून, 'सचिन अ बिलिअन ड्रीम्स' या माहितीपटाचे निर्माते रवी भागचंदका यांची निर्मिती आहे. या कथानकावर अभिजित यांनी २०१९ मध्येच लेखन सुरू केले होते. मात्र, कांबळी यांच्या आयुष्याचा सखोल अभ्यास करताना ही गोष्ट एका चित्रपटात मांडणे शक्य नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. क्रिकेटमधील कामगिरीबरोबरच मानवी भावना, नातेसंबंध, यश-अपयश आणि संघर्षाचे विविध पदर या कथेत असल्याने वेब सीरिजचे माध्यम निवडण्यात आले. येत्या नोव्हेंबरमध्ये चित्रीकरण सुरू होण्याची शक्यता असून, तीन ते चार महिन्यांत ते पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विनोद कांबळी यांचा क्रिकेटमधील प्रवासही एखाद्या नाट्यमय पटकथेपेक्षा कमी नाही. १९८८ मध्ये सचिन तेंडुलकरसोबत शालेय क्रिकेटमध्ये ६६४ धावांची नाबाद भागीदारी आणि त्यात कांबळी यांच्या ३४९ धावा, यामुळे ते प्रकाशझोतात आले. पुढे भारतीय संघात डावखुरे आक्रमक फलंदाज म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. मात्र, १९९६ च्या विश्वचषकातील श्रीलंकेविरुद्धच्या उपांत्य सामन्यानंतर त्यांच्या कारकिर्दीला उतरती कळा लागली. अनेकदा पुनरागमन करूनही त्यांना संघातील स्थान टिकवता आले नाही. क्रिकेटनंतर त्यांनी अभिनयक्षेत्रातही नशीब आजमावले. 'अनर्थ', 'पल पल दिल के पास' या चित्रपटांसह 'बिग बॉस'मध्येही ते दिसले. या सगळ्या प्रवासाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी 'कांबळी'मधून मिळणार आहे.



## दिवाळीची खरी गोडी

दिवाळी म्हटली की नवे कपडे, फराळ, रोषणाई आणि घरभर पसरलेला आनंद आठवतो. मात्र, सणाची खरी मजा घराच्या भव्यतेत असते की आपल्याभोवती असलेल्या माणसांच्या सहवासात? हाच साधा, पण मनाला भिडणारा प्रश्न 'दिलवाली दिवाली' हा चित्रपट सहजपणे उपस्थित करतो. अवघ्या तासाभराच्या या कौटुंबिक चित्रपटात मनोज पाहवा, नीलू कोहली आणि मिहिर आहुजा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. रितेश मेनन दिग्दर्शित हा चित्रपट सध्या नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे. सिक्का कुटुंबाची ही गोष्ट आहे. परदेशात स्थायिक झालेला मुलगा अंश दिवाळीसाठी घरी येणार असल्याचे व्हिडिओ कॉलवरून सांगतो आणि कुटुंबाची लगबग सुरू होते. मात्र, त्याने आई-वडिलांसाठी घेतलेल्या आलिशान घरामागे एक वेगळीच कौटुंबिक गोष्ट दडलेली असते. मुलाने दिलेल्या सुखसोयींनी सजलेल्या नव्या घरात राहायला आलेल्या सिक्का कुटुंबाला तिथे आपलेपणाची भावना मात्र मिळत नाही. जुन्या घराची, परिचित परिसराची आणि शेजाऱ्यांच्या सहवासाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नाही. त्यामुळे त्यांनी मुलाच्या नकळत पुन्हा जुन्या, एकमेकांशी घट्ट जोडलेल्या वस्तीत राहायला सुरुवात केलेली असते. दिवाळीसाठी नॉर्वेहून परतलेल्या अंशला हे सत्य समजल्यावर पुढे काय घडते, याभोवती चित्रपटाची कथा फिरते. पटकथा सरळसोट आहे. मोठे नाट्यमय ट्विस्ट किंवा अनपेक्षित वळणे यात नाहीत. मात्र, प्रत्येक गोष्टीत नाट्य शोधण्यापेक्षा साधेपणातून भावना व्यक्त करण्यावर चित्रपटाचा भर आहे. विशेषतः घरापासून दूर राहणाऱ्यांना सणासुदीच्या काळात जाणवणारी ओढ आणि जुन्या आठवणींची हुरहूर यांच्याशी ही कथा सहज जोडली जाते. चित्रपटाची खरी ताकद त्यातील कलाकार आहेत. मनोज पाहवा आणि नीलू कोहली यांनी मुलाला सत्य सांगताना होणारी घालमेल आणि जुन्या जगाशी असलेले भावनिक नाते सहजपणे उभे केले आहे.



# बालांगण

## तलावांचं शहर उदयपूर

सफर शहरांची

राजस्थानमध्ये उदयपूर नावाचं सुंदर शहर आहे. उदयपूर ही एके काळी मेवाड साम्राज्याची राजधानी होती. महाराणा उदयसिंहने हे शहर वसवलं. त्यामुळे या शहराला उदयपूर हे नाव पडलं. उदयपूर हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. उदयपूरमध्ये बरेच तलाव आहेत. हे शहर अरवली पर्वतरांगांनी वेढलेलं आहे. उदयपूरमध्ये बऱ्याच ऐतिहासिक वास्तू आहेत. पिचोला तलाव, उदयपूर सिटी पॅलेस, कुंभलगड किल्ला ही उदयपूरमधली प्रसिद्ध पर्यटनस्थळं आहेत.

उदयपूरला तलावांचं शहर असंही म्हणतात. या तलावांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या शहरातले तलाव एकमेकांशी जोडलेले आहेत. त्यामुळे इथल्या पाण्याची पातळी कधीच कमी होत नाही. याच कारणामुळे उदयपूरचं वातावरणही थंड असतं. फतेहसागर, जयसमंद, बढी, दूधतलाई हे तलावही खूप प्रसिद्ध आहेत. इथल्या तलावांमध्ये नौकाविहाराचा आनंद लुटता येतो.

इथल्या पिछोला नावाच्या तलावात लेक पॅलेस नावाचं हॉटेल आहे. हे हॉटेल खूप सुंदर आहे. इथल्या कुंभलगड किल्ल्याची निर्मिती राणा कुंभाने केली होती. कुंभलगडाची भिंत खूप लांब आहे. चीनची भिंत जगातली सर्वाधिक लांबीची भिंत आहे. या भिंतीची गणना जगातल्या सात आश्चर्यांमध्ये केली जाते. त्यानंतर कुंभलगडच्या भिंतीचा क्रमांक लागतो, असं म्हणतात. ही जगातली दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब भिंत आहे. जयसमंद हा कृत्रिम तलाव आशिया खंडातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा कृत्रिम तलाव आहे. उदयपूर हे खूप शांत शहर आहे. त्यामुळे या शहराला एकदा तरी भेट द्यायला हवी.





## अनोखे वाद्य सरोद

ओळख वाद्यांची

सरोद हे भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अत्यंत महत्त्वाचे तंतुवाद्य आहे. याचा स्वर गंभीर आणि ध्यानसाधनेसारखा असतो. सरोदचा उगम अफगाणिस्तानातील 'रुबाब' या वाद्यापासून झाल्याचे मानले जाते. १८व्या शतकात अफगाणी रुबाब भारतात आला. त्यात काही बदल करून सरोदची निर्मिती झाली. सरोद लाकडापासून बनवली जाते. त्याची ध्वनीपेटी धातूपासून बनवली जातेकिंवा प्राण्यांच्या कातड्याने झाकलेली असते.सरोदला साधारण १७ ते २५ तारा असतात. त्यापैकी काही मुख्य तारांवर राग वाजवला जातो. इतर तारा झंकारासाठी आणि तालासाठी वापरल्या जातात. सरोदला पट्ट्या नसतात. त्यामुळे बोटांच्या नखांनी तारा वाजवल्या जातात. त्यातून मींड किंवा गोड सरकते सूर तयार होतात. सरोदच्या तारा जवा नावाच्या पिकने वाजवल्या जातात. डावा हात तारांवर सरकवून स्वर नियंत्रित केले जातात. सरोदचा वापर प्रामुख्याने हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील राग सादर करण्यासाठी केला जातो. त्यात आलाप, जोड, झाल व गट अशा टप्प्यांतून रचना सादर केली जाते. सरोद एकल वादनासाठी तसेच जुगलबंदीसाठीही वापरले जाते. सरोद म्हटले की पहिले नाव येते ते उस्ताद अमजद अली खान यांचे. त्यांच्याशिवाय उस्ताद अली अकबर खान, उस्ताद हाफिज अली खान यांच्या घराण्यानेही सरोद परंपरेला मोठे योगदान दिले आहे. सरोद भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अनमोल रत्न मानले जाते.




## पर्याय व्होकेशनल अभ्यासक्रमांचा

कोण होणार?

आता करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत डॉक्टर, इंजिनिअर, एमबीए, सीए, सरकारी नोकरी, बँकिंग या क्षेत्रांकडेच विद्यार्थ्यांचा कल असायचा पण आता व्होकेशनल म्हणजे व्यावसायिक अभ्यासक्रम ांचं आकर्षण वाढताना दिसत आहे. पारंपरिक अभ्यासक्रमांऐवजी वेगळ्या वाटा निवडण्याकडे अनेकांचा कल असतो. बारावी किंवा पदवीनंतर अशा अभ्यासक्रमांची निवड करून चांगलं करीअर करता येतं. अशा काही पर्यायांविषयी...

▶ परदेशी भाषा शिकून तुम्ही विविध क्षेत्रांमध्ये मुशाफिरी करू शकता. नोकरीतही परदेशी भाषेचा लाभ होऊ शकतो. पर्यटनाच्या क्षेत्रात चांगला वाव मिळू शकतो. तसंच तुम्ही दुभाषक म्हणूनही काम करू शकता. लेखन क्षेत्रात करीअर करू शकता.



▶ हॉटेल मॅनेजमेंटचा चांगला पर्याय तुमच्यापुढे आहे. खवय्ये असाल किंवा स्वयंपाक येत असेल तर या क्षेत्रात जाता येईल.

▶ ट्रॅव्हल आणि टूरिझमचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पर्यटनाची हौस भागवू शकता. यानंतर सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात नोकरी करता येईल. पुरेशा अनुभवानंतर स्वत:चा व्यवसाय सुरू करता येईल.

▶ सध्या वेगवेगळ्या प्रकारची पादत्राणं तयार केली जातात. प्लास्टिक, रबर, ताग तसंच इतर साहित्य वापरून पादत्राणांची निर्मिती केली जाते. फुटवेअर डिझायनिंग हा करीअरचा उत्तम पर्याय ठरू शकतो.

▶ कलाक्षेत्रात रस आणि कल्पकता असल्यास टेक्सटाईल डिझायनिंग, टूल अँड डाय मेकिंग, टेक्सटाईल डिझाइन, फॅशन डिझाईन, इंटिरिअर डिझाईन अशा पर्यायांकडे वळता येईल.

## दक्षिणगंगा कावेरी

जीवनदायिनी नदी

कावेरी दक्षिण भारतातील अत्यंत महत्त्वाची नदी आहे. तिचा उगम कर्नाटक राज्यातील कोडगू जिल्ह्यातील ब्रह्मगिरी टेकड्यांमधून होतो. कावेरी नदीची लांबी साधारण ८०५ किलोमीटर आहे. ती कर्नाटक आणि तमिळनाडू या राज्यांतून वाहते. शेवटी बंगालच्या उपसागराला मिळते. धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या खूप महत्त्वाची असल्यामुळे कावेरी नदीला ङ्गदक्षिणगंगाफ म्हटले जाते. कावेरी नदीचा प्रवास खूप सुंदर आहे. ती डोंगर, दऱ्या, जंगल आणि मैदानांतून वाहत जाते. या प्रवासात हरंगी, हेमावती, शिम्शा, भवानी आणि अमरावती यासारख्या अनेक उपनद्या तिला मिळतात. पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी कावेरी नदीवर अनेक धरणे आणि कालवे बांधले गेले आहेत. कृष्णराज सागर धरण, मेट्टूर धरण ही महत्वाची धरणे आहेत. या धरणांमुळे केवळ शेतीसाठीच नव्हे तर पिण्यासाठी आणि वीज निर्मितीसाठीही पाणी उपलब्ध होते. धार्मिकदृष्ट्या कावेरी नदीला फार मोठे स्थान आहे. कावेरीला देवी मानले जाते. कावेरीच्या तीरावर अनेक धार्मिक उत्सव आणि मेळावे भरवले जातात. तिरुचिरापल्ली, श्रीरंगम, तलाकावेरी, मयिलाडुथुराई यांसारखी शहरे कावेरीच्या काठी आहेत. कावेरीला पवित्र मानून तिच्या काठावर स्नान व पूजा केली जाते. कर्नाटक आणि तमिळनाडू या दोन्ही राज्यांसाठी कावेरी ही जीवनरेखा आहे. परंतु आज कावेरी नदीसमोर प्रदूषण, जास्त पाणी उपसा आणि हवामानातील बदल ही आव्हाने आहेत. शहरांमधील सांडपाणी, कारखान्यांचा कचरा आणि प्लास्टिक यामुळे नदीचे पाणी दूषित होत आहे. त्यामुळे कावेरी नदीचे रक्षण करणे आणि तिचे पाणी शुद्ध ठेवणे आवश्यक आहे.



## वटवाघळांसाठी फटाक्यांना फाटा

निसर्गभान

रात्रीच्या काळोखात गावातील वडाच्या झाडावर शेकडो पंखांची हालचाल सुरू असते. दिवसभर झाडाच्या फांद्यांवर उलटे लटकून विश्रांती घेणारे वटवाघळांचे थवे सूर्य मावळताच आकाशात झेपावतात. कुणी त्यांना पाहून आश्चर्यचकित होते, तर कुणाला त्यांची भीती वाटते. मात्र, तामीळनाडूमधील काही गावांम ध्ये या निशाचर जीवांसाठी माणसांनी एक अनोखा निर्णय घेतला आहे. दिवाळीचा सण आनंदाने साजरा करायचा, पण फटाक्यांचा मोठा आवाज आणि धूर टाळायचा! पेरांबूर, कळमपाडू, कळझुपेरुम्पक्कम आणि इतर गावांमध्ये अनेक पिढ्यांपासून ही परंपरा जपली जात आहे. कारण या गावकऱ्यांसाठी वटवाघळे केवळ झाडांवर राहणारे प्राणी नाहीत, तर गावाच्या निसर्गपरिवारातील महत्त्वाचे सदस्य आहेत.

वटवाघळांचे निसर्गातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रात्री अन्नाच्या शोधात बाहेर पडणारी फळे खाणारी वटवाघळे विविध झाडांची फळे खातात आणि त्यांच्या विष्ठेतून बिया वेगवेगळ्या ठिकाणी पसरतात. त्यामुळे नवीन झाडे उगवण्यास मदत होते. काही वटवाघळे फुलांमधील मकरंद खाताना परागीभवनाचे कामही करतात. अशा प्रकारे जंगलांचे आणि वनस्पतींचे पुनरुज्जीवन घडवण्यात त्यांचा सहभाग असतो. मात्र, दिवसा झाडांवर विश्रांती घेत असताना फटाक्यांचे मोठे आवाज आणि प्रकाशाचे अचानक होणारे झोत त्यांना घाबरवू शकतात. सततच्या त्रासामुळे ती आपले जुने निवासस्थान सोडून दुसरीकडे जाऊ शकतात. कळझुपेरुम्पक्कममध्ये चिंचेच्या झाडावर येणाऱ्या वटवाघळांना खाऊ घालण्यापासून संरक्षणाची परंपरा सुरू झाली. गावकऱ्यांनी झाडावर पाण्याचे भांडे ठेवले आणि त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारली. पेरांबूरमध्ये शेकडो वटवाघळांचा वावर असलेला वडाचा वृक्ष पवित्र मानला जातो. त्याम ुळे तेथे १०० वर्षांहून अधिक काळ दिवाळीत फटाके फोडले जात नाहीत. या संरक्षणकार्याला आता नव्या पिढीचीही साथ मिळत आहे.



कोईम्बतूरजवळील किट्टाम्पालयम येथील सरकारी माध्यमिक शाळेम ध्ये नोव्हेंबर २०१२ मध्ये पक्षी आणि वटवाघळांच्या संवर्धनाविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी वटवाघळांचे महत्त्व समजून घेतले आणि गावकऱ्यांसोबत जनजागृती फ ेरीत सहभाग घेतला. त्या परिसरातील सुमारे २,००० भारतीय उडते कोल्हे या वटवाघळांच्या संरक्षणासाठी जवळपास ३५० कुटुंबांनी फटाके टाळण्याचा निर्णय घेतला होता. या गावांची शिकवण साधी, पण अत्यंत महत्त्वाची आहे. निसर्गाचे रक्षण करण्यासाठी नेहमी मोठ्या योजना किंवा यंत्रांची गरज नसते. कधी कधी आपल्या आनंदाच्या पद्धतीत केलेला छोटासा बदलही अनेक जीवांचे घर सुरक्षित ठेवू शकतो. दिवाळीचा प्रकाश उजळू दे, आनंदाचे क्षण फुलू देत; पण त्या आनंदामुळे झाडांवरील मुक्या जीवांची शांतता हिरावली जाऊ नये, हीच या गावकऱ्यांची खरी पर्यावरणपूरक शिकवण आहे.

## हॅलोविनची गोष्ट

आयरिश लोककथा

आयर्लंडमधल्या क्लोव्हरविल नावाच्या एका छोट्याशा गावातली गोष्ट. हॅलोविनचा दिवस होता. सगळीकडे भोपळ्याचे दिवे लावले होते. कोळ्याच्या जाळ्यांची आणि चेटकिणीच्या मुखवट्यांची सजावट केली होती. मुले रंगीबेरंगी भुतांचे कपडे घालून घरोघरी जात होती. त्या गावात एक घर होते. तिथे मि सेस मॉर्गन राहायच्या. सगळ्या मुलांना त्यांची भीती वाटायची. कुणी तिकडे गेले की दरवाजा आपोआप बंद व्हायचा. आतून हसण्याचा आवाज यायचा. हू हू हू!

मुले पळतच पुढच्या घरात जायची. मिसेस मॉर्गनच्या घरापाशी कुणीच थांबायचे नाही. लिअमला त्या घराबद्दल खूप कुतूहल वाटायचे. त्या दिवशी लिअम मुळीच ऐकेना. मी तिला भेटणारच! ती जर भूत असेल, तर मी तिला माझ्या गोळ्या देऊन टाकेन! सगळे मित्र हसले. पण लिअम टॉर्च घेऊन त्या घरात गेला. आत गुडुप अंधार होता. कोळ्याची जाळी होती. टेबलावर खूप जुने कपकेक्स ठेवले होते. अगदी दगडासारखे कडक!



अचानक त्याला मागून कोणी तरी म्हणालं, अरे माझे कपकेक्स चोरतोस काय? लिअम घाबरून वळला, तर एक आजीबाई मोठ्ठी टोपी घालून, चमकदार मोजे आणि हॅलोविनचा एप्रन घालून उभी होती! मी भूत नाही. पण दरवर्षी हॅलोविनला मी शूर मुलाची वाट बघते. मला वाटते, की कुणीतरी शूर मुलगा येईल आणि मी त्याला भरपूर खाऊ देईन!

लिअमला आनंद झाला. त्याने त्याच्या सगळ्या मित्रांना बोलावलं. आजीबाईंनी मुलांच्या डोक्यावर चॉकलेट्स आणि गोळ्यांचा पाऊसच पाडला. त्या दिवसापासून क्लोव्हरविलमध्ये मिसेस मॉर्गनच्या घराला कुणी घाबरत नाही. मिसेस मॉर्गन आणि मुले मिळून गाणी गातात. भोपळे सजवतात आणि मजा करतात.



## बिहारच्या गळ्यात जागतिक हार

नॉलेज

असंख्य आठवणी आणि कलावैभवाचा खजिना घेऊन पाटणा शहरात उभे असलेले बिहार संग्रहालय आज जगाचे लक्ष वेधून घेत आहे. २०२६ मध्ये जगातील १०० सर्वोत्तम संग्रहालयांच्या यादीत या संग्रहालयाने थेट नववे स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे, अमेरिकेतील न्यूयॉर्कचे प्रसिद्ध मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट अर्थात 'द मेट' यालाही त्याने मागे टाकले आहे. फ्रान्समधील जगप्रसिद्ध लूव्र संग्रहालयाचा क्रमांक तर ३१ वा आहे. जर्मनीतील म्युनिक येथे कार्यरत असलेल्या 'वर्थ अ जर्नी' या स्वतंत्र पर्यटन मार्गदर्शक संस्थेने ही यादी तयार केली आहे. त्यासाठी पर्यटकांची मते, माहितीचे विश्लेषण आणि प्रत्यक्ष स्थळांची पाहणी अशा विविध बाबींचा विचार करण्यात आला.

२०१५ मध्ये स्थापन झालेले बिहार संग्रहालय १३ एकरांपेक्षा अधिक परिसरात विस्तारलेले आहे. जपानचे वास्तुविशारद फुमिहिको माकी आणि मुंबईतील ओपोलिस आर्किटेक्ट्स यांनी त्याच्या रचनेत योगदान दिले आहे. आधुनिक वास्तुरचना, प्रशस्त दालने, मोकळी अंगणे आणि हिरव्यागार परिसरामुळे येथे इतिहासाचा अनुभव अधिक रंजक बनतो. संग्रहालयामध्ये प्राचीन शिल्पे, पुरातत्त्वीय वस्तू, जुनी नाणी आणि हस्तलिखिते जतन करण्यात आली आहेत. या वस्तूंच्या माध्यमातून बिहारमधील प्राचीन संस्कृती, लोकांचे जीवन, श्रद्धा आणि कलापरंपरांची माहिती मिळते. येथील ऐतिहासिक संग्रहामध्ये प्राचीन काळापासून १७६४ पर्यंतच्या इतिहासाचा वेध घेता येतो. लोककला आणि समकालीन कलेसाठीही स्वतंत्र दालने आहेत.

लहान मुलांसाठी येथे स्वतंत्र बालदालन आहे. प्राणी, लोककला, संस्कृती आणि विज्ञान अशा विषयांमुळे मुलांना खेळकर पद्धतीने नवेज्ञान मिळवण्याची संधी उपलब्ध होते. बिहारम धील लोकांचे राज्याबाहेरील समुदायांशी असलेले सांस्कृतिक संबंध समजून घेण्यासाठी 'डायस्पोरा गॅलरी'ही आहे. संग्रहालयाम ध्ये बिहारी खाद्यपदार्थांची चव चाखण्यासाठी उपाहारगृहदेखील आहे. २०२६ च्या जागतिक क्रमवारीत मेक्सिको सिटीमधील राष्ट्रीय मानववंशशास्त्र संग्रहालय पहिल्या क्रमांकावर, तर स्पेनमधील प्राडो संग्रहालय दुसऱ्या क्रमांकावर आहे. या यादीत आशियातील सर्वोच्च स्थान मिळवणारे आणि पहिल्या १०० मध्ये स्थान मिळवणारे बिहार संग्रहालय हे एकमेव भारतीय संग्रहालय ठरले आहे. या यशामुळे पाटण्याची ओळख जागतिक सांस्कृतिक नकाशावर अधिक ठळक झाली आहे.




## अशी बनते जेली

फन टाईम



जेली हा प्रकार बराच लोकप्रिय आहे. महाराष्ट्रात महाबळेश्वरमध्ये मोठ्या प्रमाणावर जेली तयार होते. ही जेली मस्त लागते. गोल आकाराची, रंगीबेरंगी जेली पाहताच खावीशी वाटते. डेझर्टसोबतही जेली येते. अमेरिकेत जेलीला जेल-ओ असं म्हटलं जातं. तापमानानुसार जेलीचा आकार बदलत जातो. ० ते २० अंश सेल्सियस तापमानात जेली सेट होते. पण हे तापमान थोडंसं वाढलं तरी जेली वितळायला लागते. तापमान कमी झाल्यावर पुन्हा घट्ट होते. जेली सेट करण्यासाठी कोणत्या घटकाचा वापर केला जातो, हे तुम्हाला माहित आहे का? यासाठी जिलेटिनचा वापर केला जातो. जिलेटिन हा जेल बनवणारा घटक आहे. प्राण्यांच्या शरीरातल्या टिश्यूंमध्ये सापडणाऱ्या कोलाजन नामक प्रथिनांचा वापर करून जिलेटिन तयार केलं जातं. प्राण्यांची त्वचा किंवा हाडं पाण्यात उकळल्यानंतर जिलेटिन तयार होतं. प्राण्यांच्या टिश्यूंपासून कोलाजनचे तंतू वेगळे होतात. त्यांची पाण्यासोबत प्रक्रिया घडते आणि जिलेटिन तयार होतं. अगदी एक टक्का कोलाजन पाण्यात वितळवल्यानेही जिलेटिन तयार होऊ शकतं.

जिलेटिनमध्ये प्रथिनांची मोठी साखळी असते. गरम पाण्याशी संपर्क आल्यानंतर त्यांचं रूपांतर सूक्ष्म तंतूंमध्ये होतं. हे तंतू पाण्यातल्या सूक्ष्म कणांना स्वत:कडे आकर्षित करतात. यामुळे पाण्यातल्या सूक्ष्म कणांची संख्या कमी होते. हे मिश्रण थंड झाल्यानंतर पाणीयुक्त सूक्ष्म कण एकमेकांवर आदळतात आणि गुंतून बसतात. उरलेलं पाणी प्रथिनांच्या तंतूंमध्ये एकत्र बांधलं जातं आणि या मिश्रणाचं रूपांतर जेलमध्ये होतं. मार्शमॅलो आणि आईसक्रीममध्येही जिलेटिनचा वापर केला जातो. आजघडीला जिलेटिनऐवजी स्टार्च आणि पेक्टिनचा वापर करूनही पदार्थांना घट्टपणा दिला जातो. स्टार्च आणि पेक्टिन हे साखरेचे प्रकार आहेत. त्यांना गुंतागुंतीची कर्बोदकं असंही म्हटलं जातं.

### दोस्त हे मस्त

#### पर्शियन मांजर



कुत्र्यांप्रमाणे मांजराच्याही वेगवेगळ्या प्रजाती असतात. यापैकी एक म्हणजे पर्शियन प्रजातीचं मांजर. हे मांजर खूप गोंडस असतं. त्याला भरपूर केस असतात. पर्शियन मांजर खूप महाग असतं. मांजराच्या या प्रजातीला बरीच मागणी असते. पर्शियन मांजरांची खूप काळजी घ्यावी लागते. त्यांच्याकडे नीट लक्ष द्यावं लागतं. पर्शियन मांजर १० ते १७ वर्षांपर्यंत जगतं. या मांजराचा थाट राजेशाही असतो! पर्शियन मांजर खूप खेळकर आणि प्रेमळ असतं.

### खादाडी

#### पौष्टिक पालक रायता



थोडे आरोग्यदायी पदार्थ खाणंही गरजेचं आहे. म्हणूनच पालक रायता बनवून बघा. यासाठी दोन कप दही, दोन कप बारीक चिरलेला पालक, पाव चमचा लाल तिखट, अर्धा चमचा जिरेपूड, अर्धा चमचा साखर, अर्धा चमचा मिरपूड असं साहित्य घ्या. मीठ, दोन चमचे तेल, थोडी मोहरी आणि कढीपत्ता असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. त्यात जिरं घाला. यात पालक घालून परतून घ्या. पालक थोडा शिजू द्या. मग गॅस बंद करा. आता एका भांड्यात दही, जिरेपूड, लाल तिखट, मिरपूड आणि मीठ घालून हलवून घ्या. आता छोट्या भांड्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर मोहरी घाला. मग कढीपत्ते घाला. हा तडका दह्यात घाला. मग शिजवलेला पालक घाला. तुमचा पालक रायता तयार आहे.

### स्टडी टिप्स

#### मेंदूला द्या आराम



परीक्षेच्या काळात तुम्हाला टीव्ही बघू दिला जात नाही. जास्त वेळ टीव्ही बघू नका, असंही सांगितलं जातं. टीव्ही बघण्यापेक्षा अभ्यास करणं गरजेचं असलं तरी दिवसभरात थोडा वेळ म्हणजे तासभर टीव्ही बघायला हरकत नाही. आपल्या आवडीचा कार्यक्रम बघितल्यावर मेंदू ताजातवाना होतो आणि तुम्ही अधिक जोमाने अभ्यास करू शकता. त्यामुळे तुम्ही अगदी थोडा वेळ टीव्ही बघू शकता. यामुळे मेंदूला आराम मिळू शकतो.

### योगा टाईम

#### करा मर्कटासन



तुम्हाला वर्गात बराच काळपर्यंत बसावं लागतं. तुम्ही घरी बसून अभ्यास करता. शिवाय स्मार्टफोनमुळे मैदानी खेळांचं प्रमाणही कमी झालं आहे. यामुळे अगदी लहान वयात पाठदुखी, खांदेदुखीसारख्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत. म्हणूनच तुम्ही मर्कटासन करायला हवं. या आसनामुळे शरीर लवचिक होतं. पाठीच्या कण्याला आराम मिळतो आणि पाठदुखीचा त्रास कमी होतो.

# न्यूझीलंडचा २४४ धावांनी विजय

## भारत ८९ वर ऑलआऊट | एकट्या बॉलरने फिरवला सामना



| वेलिंग्टन | वृत्तसंस्था |

चौथ्या वनडे सामन्यात न्यूझीलंड संघाने भारताचा २४४ धावांनी पराभव केला आहे. न्यूझीलंडने पहिल्यांदा फलंदाजी करताना ३३३ धावांचा डोंगर उभा केला होता. विल यंग याच्या शतकी खेळीच्या किवींनी ३०० धावांचा टप्पा पार केला. मात्र या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी उतरलेला भारतीय संघ ८९ धावांवर ऑलआऊट झाला.

मॅट हेन्री याने पहिल्याच ओव्हरमध्ये तीन विकेट घेत बॅकफूटवर ढकलले होते. टॉप ऑर्डरमधील प्रमुख फलंदाज आऊट झाल्यावर भारतीय संघाला पुन्हा कमबॅकच करता आले नाही. आज भारताच्या आठ खेळाडूंना धावसंख्येत दुहेरी आकडाही गाठता आला नाही. भारताकडून ईशन किशन याने सर्वाधिक २७ धावांची खेळी केली. तर अक्षर पटेल आणि नमन धीर यांनी प्रत्येकी २१ धावा केल्या. न्यूझीलंडकडून मॅट हेन्री याने सर्वाधिक ६ विकेट्स घेत संपूर्ण सामना फिरवला. या पराभवासह पाच सामन्यांची मालिका २-१ अशी झाली आहे.

भारताची वनडे क्रिकेटमधील ही सहावी नीचांकी धावसंख्या आहे.

भारतीय संघ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरला तेव्हा पहिल्याच चेंडूवर रोहित शर्माच्या विकेटने भारताला धक्का बसला. विराट कोहली मैदानात उतरल्यावर तो भारताचा डाव सावरेल अशी आशा होती. पण विराटही बोल्ड झाला त्यापाठोपाठ आलेला कॅप्टन श्रेयस अय्यरही पायचीत झाला. या ओव्हरमध्ये दुखापतीनंतर कमबॅक करणाऱ्या मॅट हेन्री याने आपल्या भेदक बॉलिंगने या महत्त्वाच्या तीन विकेट घेतल्याआणि इथेच सामना फिरला. कारण ३३४ धावांचा पाठलाग करताना टॉप ऑर्डरमधील तीन खेळाडू शून्यावर माघारी गेल्याने पूर्ण दबाव इतर फलंदाजांवर आला होता. ईशान किशन याने लढण्याचा प्रयत्न केला पण त्यालाही हेन्रीनेच २७ धावांवर बोल्ड करत आणखीन एक धक्का दिला. अक्षर पटेल २१ धावा आणि नमन धीरही २१ धावा करून शेवटी मोठे फटके मारताना कॅच आऊट झाला. न्यूझीलंडकडून मॅट हेन्रीने ६ विकेट आणि मॅथ्यू फिशर याने ३ विकेट घेतल्या.

न्यूझीलंड संघाकडून सलामीला आलेल्या टिम सायफर्ट आणि विल यंग यांनी ८५ धावांची सलामी दिली. यामध्ये सायफर्ट याने आक्रमक ५८ धावा करत संघाला रनरेट चांगल ठेवला. तो आऊट झाल्यावर दोन जीवनदान मिळालेल्या विल यंग १२५ धावांची शतकी खेळी केली. त्यासोबत फिन ॲलनने ४१ धावा, सँटनर २४ धावा आणि क्लार्क २१ धावा करत संघाला ३३० पार करून दिले होते. भारताकडून गुरनूर, आकीब आणि अक्षर पटेल यांनी २ विकेट घेतल्या.

दरम्यान, भारत आणि न्यूझीलंडमधील पाचवा सामना रविवारी होणार आहे. भारताला अजूनही मालिका जिंकण्याची संधी आहे. कारण सुरूवातीच्या दोन सामन्यात भारताने विजय मिळवल्याने २ -० ने आघाडी होती. पण आता या पराभवामुळे २-१ असे झाले असून भारताने हा सामना जिंकला तर मालिका जिंकतील आणि किवींनी सलग दुसरा विजय मिळवल्यास मालिका बरोबरीत सुटणार आहे.

## निवडक



### विद्यार्थ्यांना मिळाले योगाचे धडे

**कोलाड** : डॉ. सायली मरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड येथील मेघना सिटीमध्ये रोप मल्लखांब व योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.पाच दिवस आयोजित करण्यात आलेल्या शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शारीरिक क्षमता, लवचिकता, संतुलन आणि मानसिक एकाग्रता वाढविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या मुख्य प्रशिक्षक म्हणून डॉ. सायली मरवडे यांनी जबाबदारी सांभाळली. विशेष म्हणजे, डॉ. सायली मरवडे यांनी शैक्षणिक पदवी प्राप्त करूनही त्यांनी क्रीडाक्षेत्रातील आपली आवड आणि जिद्द कायम ठेवली असून त्या स्वतः राज्यस्तरीय खेळाडू आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञानासोबतच क्रीडाक्षेत्रातील अनुभवाचा उपयोग त्यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी केला. रोप मल्लखांबासारख्या साहसी आणि कौशल्यपूर्ण क्रिडा प्रकारा सोबत योगाचे महत्त्वही या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. अशा उपक्रमांमुळे लहान मुलांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, शिस्त आणि खेळाविषयी आवड निर्माण होण्यास निश्चितच मदत होते.पाच दिवसांच्या या शिबिरातून सहभागी विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळाली. स्थानिक स्तरावर अशा क्रीडा व योगविषयक उपक्रमांचे आयोजन होणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे.

### काव्या मारन अडकली विवाहबंधनात

**ग्रीस** : सनरायझर्स हैदराबाद संघाची सहमालकीण काव्या मारन आणि प्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंदर विवाहबंधनात अडकले आहेत. बुधवारी (११ नोव्हेंबर) ग्रीसमध्ये मोजक्या पाहुण्यांच्या उपस्थितीत त्यांचा खासगी विवाहसोहळा पार पडला. विवाहानंतर या नवदाम्पत्याने लग्नाचे पहिले छायाचित्र सोशल मीडियावर शेअर केले असून, त्याची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. अनिरुद्ध आणि काव्या यांनी विवाहसोहळ्यासाठी आयव्हरी रंगाचे पारंपरिक पोशाख परिधान केले होते. पांढऱ्या फ लांनी सजवलेल्या ठिकाणी एकमेकांचा हात हातात घेऊन हसतमुखाने उभ्या असलेल्या या जोडीचे छायाचित्र चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे. अनिरुद्धने इन्स्टाग्रामवर हे छायाचित्र शेअर करत, माझ्या आयुष्यातील एक खास क्षण, जो कायमचा लक्षात राहील ११.११, असे लिहिले आहे. या विवाहसोहळ्याच्या कार्यक्रमांना १० नोव्हेंबरपासून पारंपरिक साखरपुड्याने सुरुवात झाली होती. यावेळी दोन्ही कुटुंबांतील जवळचे सदस्य आणि काही खास पाहुणे उपस्थित होते. अनिरुद्धचे काका आणि सुपरस्टार रजनीकांत, ऐश्वर्या रजनीकांत, तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि उदयनिधी स्टॅलिन यांच्यासह अनेक मान्यवर ग्रीसमध्ये उपस्थित असल्याचे वृत्त आहे.दरम्यान, सन पिक्चर्सनेही एक्सवर या नवदाम्पत्याचे छायाचित्र शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



### नीरज कुमारला ऑलिम्पिक कोटा

**दोहा** : भारताच्या नीरज कुमारने येथे बुधवारी झालेल्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स प्रकारात कांस्यपदक पटकावत ऑलिम्पिकसाठी पात्रता कोटा मिळवला. या स्पर्धेतील भारताचा हा दुसरा ऑलिम्पिक कोटा आहे. यापूर्वी जयपाल मालवीयने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक जिंकून भारताला पहिला कोटा मिळवून दिला होता. अंतिम फेरीत नीरजने ३४६.५ गुणांची कमाई केली. तो रौप्यपदकाच्या शर्यतीत होता. मात्र, ३४व्या प्रयत्नात ९.४ गुणांची नोंद झाल्याने त्याला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. वैयक्तिक तटस्थ खेळाडू दिमित्री पिमेनोव्हने ३६२.८ गुणांसह कनिष्ठ गटातील विश्वविक्रम नोंदवत सुवर्णपदक जिंकले. स्लोव्हाकियाच्या जॅनीने रौप्यपदक मिळवले. या दोघांनीही ऑलिम्पिक कोटा मिळवला. अंतिम फेरीत सहभागी झालेला भारताचा आणखी एक नेमबाज ऐश्वर्य प्रतापसिंग तोमर ३२३.७ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिला. पात्रता फेरीत नीरजने ५९१ गुणांसह अव्वल स्थान मिळवले. ऐश्वर्यने ५८६ गुणांसह चौथे स्थान मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. दोन वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या आणि विश्व अजिंक्यपद स्पर्धेत यापूर्वी रौप्यपदक जिंकलेल्या ऐश्वर्यसाठी अंतिम फेरी आव्हानात्मक ठरली. गुडघ्यावरून नेम साधण्याच्या प्रकारात त्याने १०२.९ गुण मिळवत आघाडीच्या खेळाडूंसोबत बरोबरी साधली होती.



### शिवसेनेकडून कबड्डी खेळाडूंचा सन्मान

**खांब** : रोहा तालुका शिवसेना (उबाठा) गटाकडून वाशी येथील कबड्डी खेळाडूंचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. ३७ वी रायगड जिल्हा किशोर गट निवड चाचणी व अजिंक्य पद धेरंड येथील कब्बडी स्पर्धेत नवतरुण तळाघर हा संघ अंतिम विजेता ठरल्याबद्दल रोठ बुद्रुक सरपंच नितीन वारंगे व शिवसैनिक शशिकांत साळुंके तसेच अन्य शिवसैनिकांनी खेळाडूंचा यथोचित सन्मान केला आहे.दरम्यान वाशी हा संघ रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात एक नावाजलेला संघ म्हणून ओळखला जात आहे.तर कबड्डी खेळात आतापर्यंत वाशी गावामध्ये अनेक कबड्डीपट्टू निर्माण झाले आहेत व त्यांनी वेळोवेळी आपल्या संघाचे नेतृत्व करून गावाचे नाव रोशन केले आहे.तर हाच कबड्डी खेळाचा वारसा नव्या पिढीकडून जपला जात असून विविध स्पर्धेत सातत्याने कामगिरी करताना दिसत आहेत.तर निवड चाचणी व अजिंक्य स्पर्धेतील उज्ज्वल कामगिरी केलेल्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सरपंच नितीन वारंगे व अन्य शिवसैनिकांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होताना दिसत आहे.

### गुरुकृपा प्रतिष्ठान माजगाव किल्ले स्पर्धा

## चार स्पर्धक ठरले प्रथम क्रमांकाचे मानकरी

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

गुरुकृपा प्रतिष्ठान, माजगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ व्या किल्ले स्पर्धा २०२६ मध्ये परिसरातील शेकडो शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

या स्पर्धेत माजगाव येथील सार्थक काठावले याने लोहगडाची प्रतिकृती साकारत प्रथम क्रमांक पटकावला. आंबिवली येथील सक्षम कदम याने प्रतापगडाची आकर्षक प्रतिकृती साकारून प्रथम क्रमांक मिळविला. वारद येथील पौढ विभागातील वेदांत बोराडे याने मुरुड-जंजिरा किल्ल्याच्या प्रतिकृतीसाठी प्रथम क्रमांक मिळविला. तर आदिवासी गटात निकिता वाघे व परी वाघे यांनी मुरुड-जंजिरा किल्ल्याची प्रतिकृती साकारत प्रथम क्रमांकाचा मान मिळविला. स्पर्धेतील द्वितीय व दोन तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांनाही सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. माजगाव परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने स्पर्धेला प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचे आयोजन संदेश पाटील, मनोज पाटील, किरण ढवाळकर, कौस्तुभ ढवाळकर, तेजस ढवाळकर, आदित्य पाटील, विवेक ढवाळकर, राज काठावले व केतन पाटील यांनी केले. तर किल्ले परीक्षक म्हणून मंगेश पाटील, राजू दुर्गे, भूषण पिंगळे व दीपक ठाकूर यांनी काम पाहिले.



## कर्जतमधील किल्ले स्पर्धेचा निकाल जाहीर

| कर्जत | प्रतिनिधी |

दहिवली गाव परिसर विचार मंच यांच्या माध्यमातून दीपावली निमित्त किल्ले स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये मोठा गट व छोटा गट एकूण सात जणांनी ग्रुप व वैयक्तिक भाग घेतला होता.

या किल्ले स्पर्धेसाठी शाहीर गणेश ताम्हाणे व गड दुर्ग संवर्धक समाधान पाटील यांनी परिक्षक म्हणून काम बघितले. या किल्ले स्पर्धेचा निकाल प्राप्त झाला आहे. मोठा गट प्रथम क्रमांक ओंकार नवतरुण मित्र मंडळ, कोकण आळी दहिवली सरसगड किल्ला, द्वितीय क्रमांक शंतनू मालुसरे, आकुर्ले रोड राजमाची ते भिवगड ते लोहगड गड कोट मोहीम, छोटा गट प्रथम क्रमांक शिवमल्हार गट, गुरव आळी तोरणा किल्ला, द्वितीय क्रमांक शिवस्मृती युवा मित्र मंडळ सोनार आळी शिवनेरी किल्ला, उत्तेजनार्थ अर्णव विजय दांडेकर राजगड किल्ला नंदनवन सोसायटी मित्र मंडळ संजय नगर प्रतापगड किल्ला श्रावणी गुप्ता, स्वराली नवले, गुरव आळी पन्हाळा किल्ला यांना गौरविले.

## बोर्ली पंचतन येथे आट्या-पाट्या स्पर्धेला प्रारंभ



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा आट्या-पाट्या संघटना आणि श्रीवर्धन तालुका आट्या-पाट्या असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३७ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी आट्या-पाट्या स्पर्धेला अत्यंत उत्साहात आणि दिमाखात सुरुवात झाली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील तालुका क्रीडा संकुल येथे भव्य राज्यस्तरीय स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचा पारंपारिक आणि मातीतील खेळ असलेल्या

**■ राज्यातील विविध जिल्ह्यांच्या संघांचा उत्स्फूर्त सहभाग**

आट्या-पाट्या स्पर्धेचा थरार अनुभवण्यासाठी संपूर्ण राज्यातून विविध जिल्ह्यांचे ज्युनियर मुलांचे आणि मुलींचे संघ बोर्ली पंचतनमध्ये दाखल झाले आहेत. या ३७ व्या राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेतून पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला जाणार असल्याने खेळाडूंमध्ये मोठा उत्साह आणि चुरस पाहायला मिळत आहे.

### क्रीडाप्रेमींना उपस्थित राहण्याचे आयोजकांचे आवाहन

तालुक्यात प्रथमच इतक्या मोठ्या स्तरावर ३७ व्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. खेळाडूंच्या राहण्याची आणि भोजनाची उत्तम व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे. १४ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या अटीतटीच्या सामन्यांचा आनंद घेण्यासाठी आणि खेळाडूंचा उत्साह वाढवण्यासाठी बोर्ली पंचतन, श्रीवर्धन तालुका तसेच संपूर्ण रायगड जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक श्री चिंचबादेसी देवस्थान ट्रस्ट, जनता शिक्षण संस्था (बोर्ली पंचतन) आणि दिघी सागरी पोलीस ठाणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्य नेमबाजी स्पर्धेला जोरदार प्रतिसाद

| मांद्रे (गोवा) | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची शान उंचावत असलेले महाराष्ट्रातील नेमबाज आज, शुक्रवारी सुरू होणाऱ्या ४१व्या महाराष्ट्र राज्य नेमबाजी स्पर्धेत आपले कसब दाखवतील. महाराष्ट्र राज्य नेमबाजी संघटनेने आयोजित केलेल्या या स्पर्धेत नवोदित नेमबाजांच्या काम गिरीकडे विशेष लक्ष असेल. ही स्पर्धा १९ नोव्हेंबरपर्यंत गोव्यात होणार आहे.

या स्पर्धेत रायफल प्रकारातील २५ गटांत स्पर्धा असेल. त्यासाठी एकूण १,००३ प्रवेशिका आल्या आहेत. त्याचवेळी पिस्तुल विभागातील ३६ गटांसाठी एकूण १,२४४ प्रवेशिका आल्या आहेत. या स्पर्धेतील कडवी चुरस लक्षात घेऊन आयोजक महाराष्ट्र राज्य नेमबाजी संघटनेने सर्व स्पर्धकांच्या साहित्याची नियम नुसार तपासणी करण्याचे ठरवले आहे. या स्पर्धेत तपासणीनंतर वैध ठरलेले साहित्य राष्ट्रीय स्पर्धे तही मान्य ठरणार आहे. एकूण ६१ गटांत स्पर्धा होणार असली, तरी ऑलिम्पिकमध्ये समावेश असलेल्या प्रकारांत सर्वाधिक चुरस असेल. त्यामुळेच १० मीटर एअर पिस्तुल तसेच १० मीटर एअर रायफलमध्ये वरिष्ठ, ज्युनियर आणि युवा गटांत अंतिम फेरीही होईल. त्याचबरोबर ५० मीटर रायफल थ्री पोझिशनच्या पुरुष आणि महिलांच्या स्पर्धेत, तसेच २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तुलच्या महिलांच्या स्पर्धेत अंतिम फेरी होईल. या स्पर्धेसाठी जागतिक नेमबाजी संघटनेचा परवाना असलेले ज्युरी सदस्य नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे स्पर्धेत आंतरराष्ट्रीय नियमांचे काटेकोर पालन होईल. हे सर्व लक्षात घेता, सुमारे एक आठवडा राज्य नेमबाजीतील सर्वोत्तम चुरस अनुभवता येईल.




## आरव यादवचा भेदक फिरकी मारा

**मुंबई** : ऑफ स्पिनर आरव यादवने भेदक गोलंदाजी करताना सात फलंदाजांना तंबूत धाडले. त्यामुळे एम. व्ही. स्पोर्ट्स क्लबने अजित नाईक स्मृती १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत शिवाजी पार्क जिमखान्याला १४३ धावांत गुंडाळले. वरळी स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या या स्पर्धे तील या उपांत्य लढतीत एम. व्ही. स्पोर्ट्स क्लबने पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत १ बाद ४५ अशी मजल मारली.

## फेस्कॉमतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी क्रीडा स्पर्धा

| मुंबई | प्रतिनिधी |

फेडरेशन ऑफ सिनियर सिटिझन्स ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र मुंबई प्रादेशिक विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही वार्षिक कला-क्रीडा स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन करण्यात आले आहे.

६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांच्या सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याला चालना देणे आणि त्यांना आनंदी व्यासपीठ मिळवून देणे, हा या स्पर्धांमागचा मुख्य उद्देश आहे.

यंदा एकूण बुद्धिबळ, एकल नृत्य, समूह नृत्य, कथाकथन, नाट्य अभिवाचन, काव्य वाचन, कराओके गायन, निबंध लेखन, कॅरम, ब्रिज आणि वेशभूषा अशा एकूण ११ स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. यंदाच्या निबंध स्पर्धे साठी युग - संधी, आव्हाने आणि भविष्य, मोबाईल - सोबती की अडचण? आणि अजुन मी यवनात असे नाविन्यपूर्ण व विचारप्रवर्तक विषय देण्यात आले आहेत.

स्पर्धांसाठी प्रवेश शुल्क प्रति स्पर्धा १०० असून फेस्कॉमशी संलग्न संघ विरंगुळा केंद्राचे सभासदत्व असणे बंधनकारक आहे. सर्व स्पर्धा श्रमिक ज्येष्ठ नागरिक संघ, करी रोड आणि ज्येष्ठ नागरिक भवन, नेरूळ येथे २० नोव्हेंबर २०२६ पासून स्पर्धा सुरू होणार असून, फॉर्म जमा करण्याची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर २०२६ आहे. मुंबई, नवी मुंबई आणि पनवेलमधील सर्व ज्येष्ठ नागरिक संघांतील सभासदांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन फेस्कॉम मुंबई प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष सुरेश पोटे यांनी केले आहे.

### अंडर १९ आशिया कप स्पर्धा | पाकिस्तानला चारणार धूळ

# भारताचा अंतिम फेरीत प्रवेश

| ओमान | वृत्तसंस्था |

टीम इंडियाचा माजी फलंदाज वीरेंद्र सेहवाग याचा मुलगा आर्यवीर याने अंडर १९ आशिया कप २०२६ स्पर्धेत आपला तडाखा कायम ठेवत आणखी एक धमाकेदार खेळी साकारली आहे. आर्यवीरने भारताच्या साखळी फेरीतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात दीडशतकी खेळी केली. आर्यवीरने भारतासाठी उपांत्य फेरीच्या हिशोबाने करो या मरो असलेल्या यूएई विरूद्धच्या सामन्यात १६० धावा केल्या होत्या.

आर्यवीरच्या त्या खेळीमुळे भारताला ७० धावांनी विजय मिळवता आला. भारताने त्या विजयासह उपांत्य फेरीत धडक दिली. आर्यवीरने अफगाणिस्तान विरुद्ध सेमी फायनलमध्येही वादळी खेळी केली. आर्यवीरने या महत्त्वाच्या सामन्यात अर्धशतक झळकावलंय.

आर्यवीरने विजयी धावांचा पाठलाग करताना हे अर्धशतक केलंय. अफगाणिस्तानने भारतासमोर २२८ धावांचं आव्हान ठेवलंय. आर्यवीर आणि कर्णधार लक्ष्य रायचंदानी या सलामी जोडीने विजयी धावांचा पाठलाग करताना भारतीय क्रिकेट संघाला अप्रतिम सुरुवात मिळवून दिली. दोघांनी शतकी भागीदारी केली. आर्यवीरने या दरम्यान षटकार लगावत ५० हा आकडा पार केला. भारताच्या डावातील १६ ओव्हर पूर्ण झाल्या. भारताने बिनबाद १११ धावा केल्या. आर्यवीर ४५ धावांवर नाबाद होता. अफगाणिस्तानकडून नूर अली नियाझी भारताच्या डावातील १७ वी ओव्हर टाकायला आला. आर्यवीर नूरने टाकलेल्या पहिल्या ४ चेंडूंत धाव काढण्यात अपयशी ठरला. मात्र आर्यवीरने ओव्हरमधील पाचव्या चेंडूवर खणखणीत षटकार ठोकत अर्धशतक पूर्ण केलं. आर्यवीरने अर्धशतकापर्यंत पोहचण्यात ५६ चेंडूंचा सामना केला. आर्यवीरने त्याच्या अर्धशतकापैकी ४० धावा या फक्त ८ चेंडूत आणि न धावता मिळवल्या. आर्यवीरने अर्धशतकादरम्यान ४ षटकार आणि ४ चौकार लगावले. आर्यवीर आऊट झाल्याने शतकी भागीदारीचा शेवट झाला. लक्ष्य आणि आर्यवीर या दोघांनी १०२ चेंडूंत ११७ धावा जोडल्या. या दोघांनी शतकी भागीदारी करत भारताला जबरदस्त सुरुवात मिळवून दिली आहे. त्यामुळे आता भारताचे फलंदाज उर्वरित धावा किती ओव्हरमध्ये पूर्ण करण्यात यशस्वी ठरतात? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.आर्यवीरने पाकिस्तान विरूद्धच्या सामन्याचा अपवाद वगळता अंडर १९ आशिया कप स्पर्धेतील आतापर्यंत तिन्ही सामन्यांत ५० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. आर्यवीरने नेपाळ विरुद्ध सलामीच्या सामन्यात नाबाद ७० धावा केल्या.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)